**एम. ए. भाग–२ इतिहास सत्र–३ पेपर–MM3 :**
**Contemporary World (1950-1991)**

# घटक १
# शीतयुद्ध (१९५०–१९९१)

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

१.२.१ विभाग १ : शीतयुद्ध

अ. अर्थ

ब. शीतयुद्धाची कारणे

क. सुरक्षा करार

१.२.२ विभाग २ : शीतयुद्धातील संघर्ष

अ. जर्मनी

ब. कोरिया

क. क्युबा

१.२.३ विभाग ३ : शीतयुद्धाचा अंत

अ. शीतयुद्धाच्या समाप्तीमधील महत्त्वाच्या घटना

ब. शीतयुद्धाचे परिणाम

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द

१.५ प्रश्न आणि उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ

## १.० उद्दिष्टे

१. शीतयुद्धाचा अर्थ आणि कारणे समजून घेता येतील.

२. शीतयुद्धातील महत्त्वाच्या सुरक्षा करारांची माहिती मिळेल.

३. जर्मनी, कोरिया आणि क्युबामधील शीतयुद्धकालीन संघर्षांचे विश्लेषण करता येईल.

४. शीतयुद्धकालीन संघर्षाचे जागतिक परिणाम समजून घेता येतील.

५. शीतयुद्धाच्या समाप्तीमधील महत्त्वाच्या घटना आणि त्याचे परिणाम यांची माहिती मिळेल.

६. शीतयुद्धोत्तर जागतिक व्यवस्थेचे मूल्यांकन करता येईल.

## १.१ प्रस्तावना :

शीतयुद्ध हा अमेरिका आणि साम्यवादी रशिया यांच्यातील राजकीय, लष्करी आणि वैचारिक संघर्षाचा प्रदिर्घ काळ होता. तो सन १९४५ मध्ये दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्ती पासून सन १९९१ मध्ये साम्यवादी रशियाच्या विघटनापर्यंत चालू होता. एकमेकांवर मात करण्यासाठी दोन्ही गटांनी निरनिराळे मार्ग, साधने आणि पद्धतींचा वापर केला.

शीतयुद्धाच्या भीतीमुळे पश्चिम युरोपमधील देशांनी संरक्षण व सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून काही महत्त्वाचे लष्करी करार केले. शीतयुद्धाच्या काळात जर्मनी, कोरिया आणि क्युबा येथे अंतर्गत संघर्ष निर्माण होऊन त्याचे जागतिक परिणाम घडून आले.

इ. स. १९८५ नंतर परिस्थिती बदलत गेली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रेगन व रशियाचे राष्ट्राध्यक्ष मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी सामंजस्याची भूमिका घेत शीतयुद्ध संपुष्टात आणण्यासाठी प्रयत्न केले. इ. स. १९८९ नंतर पूर्व युरोपीय देशांमधील साम्यवादी सत्ता संपुष्टात आल्या. साम्यवादी रशियाचे अधिकृतरित्या विघटन झाले. दोन्ही महासत्तांच्या दृष्टिकोनात बदल झाल्यामुळे शीतयुद्ध संपुष्टात आले.

## १.२ विषय विवेचन :

या भागामध्ये 'शीतयुद्ध' या संकल्पनेचा अर्थ आणि वेगवेगळ्या विचारवंतांनी त्या संदर्भात केलेल्या व्याख्या यांची माहिती घेऊ. तसेच शीतयुद्धाची विविध कारणे आणि शीतयुद्धाच्या भीतीने विविध राष्ट्रांमध्ये झालेले संरक्षणात्मक करार समजावून घेऊ.

### १.२.१ विभाग १

### अ. अर्थ व स्वरूप :

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका आणि रशिया यांच्यात तणावाचे संबंध निर्माण झाले. संपूर्ण जग दोन गटात विभागले गेले. एका गटाचे नेतृत्व भांडवलशाही अमेरिकेकडे होते. दुसऱ्या गटाचे नेतृत्व साम्यवादी रशिया करत होता. जगातील सगळ्या समस्या सोडवण्याची क्षमता आपल्या विचारसरणीत आहे, असा दावा दोन्ही गटाकडून केला जात होता. जगातील इतर राष्ट्रांना आपल्या गटात ओढण्याची स्पर्धा त्यांच्यात

लागली. एकमेकांविरुद्धचा आक्रमक प्रचार करणे, एकमेकांच्या कार्यात अडथळे आणणे, आर्थिक दबाव आणणे, आपल्या गटातील राष्ट्रांना आर्थिक मदत करणे, अशी ही स्पर्धा होती. ही स्पर्धा जगाला पुन्हा युद्धाकडे घेऊन जाते की काय अशी आशंका निर्माण झाली होती. दुसरे महायुद्ध नुकतेच संपले होते. त्याच्या भीषणतेचा अनुभव सगळ्यांच्या गाठीला होता. त्यामुळे प्रत्यक्ष युद्ध न होता दोन परस्पर विरुद्ध विचारसरणी असलेल्या गटांमध्ये युद्धसदृश्य परिस्थिती निर्माण झाली. या परिस्थितीलाच 'शीतयुद्ध' असे म्हटले जाते.

शीतयुद्ध हे शांततेच्या काळात शस्त्राविना लढले गेलेले युद्ध होते. सन १९४५ नंतर अमेरिकेच्या नेतृत्वाखालील लोकशाही राष्ट्रांचे मुक्त जग आणि साम्यवादी रशियाच्या नेतृत्वाखालील पूर्व युरोपीय राष्ट्रांचे साम्यवादी जग यांच्यामध्ये शीतयुद्धाला सुरुवात झाली. रशिया साम्यवादी जगताचे स्वप्न सत्यसृष्टीत उतरवू पाहत होता, याउलट अमेरिका जगाला साम्यवादी लाटेपासून थोपवून लोकशाही व भांडवलशाही वाचवू पाहत होती. लोकशाही आणि साम्यवाद ही परस्पर विरोधी तत्त्वज्ञाने परस्परांना नष्ट करण्यासाठी युद्धाच्या पवित्र्यात समोरासमोर उभी राहिली. दोन परस्पर विरोधी तत्वप्रणालींचा हा संघर्ष होता. सकृतदर्शनी त्यांचे एकमेकांशी राजकीय संबंध होते. विविध विषयांवर चर्चा होती. तरीही ते एकमेकांचे खच्चीकरण करण्याच्या संधीची वाट पाहत होते. त्यामुळे त्यांच्यातील संघर्षाला अप्रत्यक्ष युद्धाचे पर्यायाने शीतयुद्धाचे स्वरूप प्राप्त झाले. रशिया हा जागतिक शांततेचा शत्रू आहे व साम्यवाद हा व्यक्ती स्वातंत्र्याचा नाश करतो, असे चित्र अमेरिकेने रंगवले. उलट रशियाने आशिया व आफ्रिकेतील सर्व समस्यांवर साम्यवाद हा एकमेव खात्रीशीर उपाय असल्याचा प्रचार केला.

**व्याख्या :**

अनेक विचारवंतांनी आपापल्या परीने शीतयुद्धाचा अर्थ सांगण्याचा आणि त्याचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे. इंग्लंडचे माजी पंतप्रधान विस्टन चर्चिल यांनी सन १९४६ मध्ये फुल्टन येथील आपल्या भाषणात या वैचारिक संघर्षाचा उल्लेख केला होता. या संघर्षाला 'शीतयुद्ध' हा शब्दप्रयोग सर्वात पहिल्यांदा १६ एप्रिल, १९४७ रोजी अमेरिकन विचारवंत बर्नार्ड बरूच यांनी वापरला होता. सन १९४७ मध्ये वॉल्टर लीपमन या अमेरिकन विचारवंताने याचे वर्णन 'भासमान युद्ध' असे केले होते. 'कोल्ड वॉर' नावाच्या आपल्या पुस्तकातून त्यांनी 'शीतयुद्ध' या शब्दाचा सर्रास वापर त्यांनी सुरू केला.

**फ्लेमिंग** - यांच्या मते, ''हे युद्ध उभय देशांमधील माणसांच्या मनामध्ये लढले गेले.''

**जॉन फॉस्टर डलेस** - यांच्या मते, ''हे युद्ध म्हणजे चांगल्या व वाईट प्रवृत्ती, धर्म व निरीश्वरवाद आणि योग्य व अयोग्य यांच्यामधील धर्मयुद्ध होते.

**लुई हॉल** - यांनी आपल्या 'दि कोल्ड वॉर एँज हिस्टरी' या पुस्तकात ''हे शुद्ध युद्ध म्हणजे दोन राष्ट्रगटां दरम्यानचा अत्यंत कटूतापूर्ण असा तणाव होता आणि तो प्रत्यक्ष शस्त्रांनी लढल्या गेलेल्या युद्धापेक्षाही अधिक धोकादायक होता'', असे म्हटले आहे.

**प्रा. यंग–हूम–किम** – यांच्या मते 'आंतरराष्ट्रीय राजकारणातील हे शीत वास्तवाचे युद्ध राष्ट्रीय संरक्षण, आर्थिक विकास, राजनीति व तत्वविचार यासंबंधी आंतरराष्ट्रीय जीवन स्तरावर लढले गेले,' **एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका** – यातील उल्लेखानुसार 'सन १९४५ नंतर साम्यवादी राष्ट्रीय आणि पाश्चिमात्य भांडवलशाही राष्ट्रीय यांच्यात आणि विशेषतः सोविएत युनियन आणि युनायटेड स्टेट्स यांच्यात राजकीय, वैचारिक आणि कुटनितीच्या पातळीवर जो संघर्ष निर्माण झाला त्याला शीतयुद्ध हे नाव मिळाले'.

शीतयुद्ध या संज्ञेची नक्की व्याख्या करता येत नसली तरी 'मुक्त – अर्थव्यवस्थेचे जग व साम्यवादी जग म्हणजेच अमेरिका व सोव्हिएट रशिया यांच्यातील ताणतणाव व संघर्ष म्हणजे 'शीतयुद्ध' होय.'

**ब. शीतयुद्धाची कारणे :**

**१. दुसऱ्या महायुद्धानंतरची सत्ता पोकळी :**

दुसऱ्या महायुद्धाच्या विध्वंसामुळे अनेक युरोपीय देश राजकीय आणि आर्थिकदृष्ट्या अस्थिर झाले. यामुळे सत्तेची पोकळी निर्माण झाली जी अमेरिका आणि साम्यवादी रशिया भरून काढू पाहत होते. दोन्ही महासत्तांनी युद्धग्रस्त प्रदेशांवर आपला प्रभाव वाढवण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे परस्परविरोधी हितसंबंध आणि स्पर्धा निर्माण झाली.

**२. महासत्तांचा उदय :**

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका आणि रशिया या दोन महासत्तांचा आंतरराष्ट्रीय राजकारणात उदय झाला. महायुद्धानंतर इंग्लंड, फ्रान्सचे सामर्थ्य संपून ती कमकुवत झाली. त्यांच्या वसाहती स्वतंत्र झाल्याने आंतरराष्ट्रीय राजकारणातील त्यांचे महत्त्व कमी होऊ लागले. महायुद्धातील पराभवामुळे जर्मनी, इटली ही राष्ट्रे प्रभावहीन ठरली. अणुबॉम्बच्या धक्क्यामुळे जपानचाही प्रभाव ओसरला. चीनमधील माओच्या राजवटीत चीन आंतरराष्ट्रीय राजकारणापासून दुरावला. आंतरराष्ट्रीय राजकारणावर प्रभाव टाकण्याची क्षमता असलेली अमेरिका आणि रशिया ही दोनच राष्ट्रे उरली. त्यांनी जगातील इतर राष्ट्रांना आपल्या वर्चस्वाखाली आणण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यातून जगाची विभागणी दोन गटांत झाली. आपापल्या गटाचा प्रभाव निर्माण करण्याची स्पर्धा त्यांच्यात सुरू झाली. या स्पर्धेचे रूपांतर नंतर इर्षेत झाले. त्यातून शीतयुद्धाला पोषक वातावरण तयार झाले.

**३. अविश्वासाचे वातावरण :**

दुसरे महायुद्ध सुरू असतानाही रशिया आणि पश्चिमात्य राष्ट्रे यांच्यात परस्परांविषयी कमालीचा अविश्वास व संशय होता. दुसऱ्या महायुद्धात समान शत्रू असलेल्या राष्ट्रांना तोंड देण्यासाठी काळाची गरज म्हणून ते एकत्र आले तरी त्यांच्यात संशयाचे वातावरण होते. युद्धातील डावपेच आखतानाही ते एकमेकांकडे संशयाने पाहत होते. त्यामुळे अनेक गोष्टी गुप्त ठेवल्या गेल्या. अमेरिकेने अणुबॉम्बबाबत कमालीची गुप्तता बाळगली. रशियाला त्याची भनक लागू दिली नाही. त्यामुळे रशियाला धक्का बसला. दुसरे महायुद्ध सुरू असताना हिटलरने रशियावर हल्ला केला. स्टॅलिनने हिटलर विरोधात रशियात आघाडी

उघडण्याची मागणी दोस्त राष्ट्रांकडे केली. परंतु रुझवेल्ट आणि चर्चिल यांनी त्याकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे स्टॅलिनच्या मनात शंका निर्माण झाली. युद्धाच्या शेवटी शेवटी अशी आघाडी उघडली गेली, परंतु तोपर्यंत या युद्धात रशियाचे बरेच नुकसान झाले होते. म्युनिक येथील बैठकीत झेकोस्लोव्हाकियाचे भवितव्य ठरविले गेले; त्यावेळी रशियाला अंधारात ठेवण्यात आले होते. युगोस्लाव्हियामध्ये साम्यवादी नेता मार्शल टिटो रशियाला पाठिंबा देत होता. तेथे इंग्लंडने साम्यवादाच्या विरोधातील पक्षांना पाठिंबा दिला. या सर्व घडामोडींमुळे रशियाच्या मनात अमेरिका, इंग्लंडच्या हेतूबाबत संशय निर्माण झाली. हे अविश्वासाचे, संशयाचे वातावरण शीतयुद्धाला जबाबदार ठरले.

**४. अण्वस्त्रांची शर्यत व तांत्रिक स्पर्धा :**

अमेरिका आणि साम्यवादी रशिया या दोन्ही देशांनी प्रचंड अण्वस्त्रे विकसित केली, ज्यामुळे अशी परिस्थिती निर्माण झाली की प्रत्येक बाजूकडे दुसऱ्याचे विनाशकारी नुकसान करण्याची क्षमता होती. तसेच अण्वस्त्रे आणि वितरण प्रणाली (आंतरखंडीय बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे) मधील तांत्रिक श्रेष्ठतेचा पाठपुरावा हा शीतयुद्धाचा मध्यवर्ती पैलू बनला. तांत्रिक प्रगतीच्या बाबतीत एकमेकांना मागे टाकण्याचे उद्दिष्ट प्रत्येक बाजूचे होते, ज्यामुळे शस्त्रास्त्रांची स्पर्धा सुरू झाली. त्यामध्ये केवळ अण्वस्त्रेच नव्हे तर प्रगत लष्करी तंत्रज्ञानाचाही समावेश झाला.

**५. वैचारिक मतभेद :**

औद्योगिक क्रांतीनंतर युरोपमध्ये भांडवलशाही अर्थव्यवस्था निर्माण झाली. त्यातून कामगारांचे शोषण करणारी व्यवस्था उदयास आली. एकोणिसाव्या शतकात कार्ल मार्क्सने मार्क्सवादी विचारांच्या माध्यमातून भांडवलशाहीचे दुष्परिणाम जगासमोर मांडले. मार्क्सच्या विचारांवर आधारित साम्यवादी राज्यक्रांती रशियामध्ये घडून आली. रशियाने जगभरात साम्यवादाचा पुरस्कार करण्यास सुरुवात केली. पाश्चिमात्य राष्ट्रे आणि अमेरिका खुल्या अर्थव्यवस्थेची आणि भांडवलशाहीची पुरस्कर्ती असल्याने त्यांना साम्यवादाचा धोका वाटू लागला. साम्यवाद ही भांडवलशाही नष्ट करू पाहणारी एक जागतिक चळवळ आहे, असे त्यांना वाटत होते. भांडवलशाही राष्ट्रांना नाझी जर्मनीपेक्षा साम्यवादी रशियाची अधिक भीती वाटत होती. महायुद्धानंतर भांडवलशाही पाश्चिमात्य जग आणि साम्यवादी रशिया हे दोघेही आपापल्या विचारसरणीचा पुरस्कार करू लागले. त्यातून वैचारिक मतभेद निर्माण होऊन शीतयुद्धास पोषक वातावरण तयार झाले.

**६. विस्तारवादी धोरणे :**

साम्यवादी रशियाने आपली साम्यवादी विचारसरणी जागतिक स्तरावर पसरविणे, विविध देशांतील साम्यवादी चळवळी आणि राजवटींना पाठिंबा देणे हे उद्दिष्ट ठेवले. साम्यवादाच्या प्रसारामुळे जगभरातील लोकशाही संस्था आणि आर्थिक व्यवस्था कमकुवत होऊ शकतात, अशी भीती बाळगणाऱ्या अमेरिका आणि त्याच्या मित्रराष्ट्रांनी याकडे थेट धोका म्हणून पाहिले.

रशियाच्या विस्तारवादाला प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेने नियंत्रणाचे धोरण स्वीकारले, साम्यवादी प्रभावाला विरोध करणाऱ्या या सरकारांना आणि चळवळींना पाठिंबा देऊन साम्यवादाचा प्रसार रोखणे हे या धोरणाचे उद्दीष्ट होते, ज्यामुळे जगभरात हस्तक्षेप आणि संघर्ष निर्माण झाले.

**७. आर्थिक स्पर्धा :**

अर्थव्यवस्था स्थिर करणे आणि साम्यवादाचा प्रसार रोखणे या उद्देशाने अमेरिकेने युरोपच्या आर्थिक पुनरुज्जीवनास मदत करण्यासाठी मार्शल योजना अंमलात आणली. त्याला प्रत्युत्तर म्हणून साम्यवादी रशियाने साम्यवादी राष्ट्रांमधील आर्थिक संबंध दृढ करण्यासाठी आणि पाश्चिमात्य प्रभावाचा प्रतिकार करण्यासाठी कौन्सिल फॉर म्युच्युअल इकॉनॉमिक असिस्टन्स (कॉमेकॉन) ची स्थापना केली.

**८. विविध तह व करार :**

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका आणि रशिया या दोन्ही राष्ट्रांनी जगातील छोट्या – मोठ्या राष्ट्रांवर आपले वर्चस्व निर्माण केले. त्यांना लष्करी आणि आर्थिक मदत देऊ केली. एकमेकांना शह देण्यासाठी त्या राष्ट्रांशी विविध राजकीय व लष्करी करार केले. त्यातून पूर्व युरोपमध्ये रशियाचा प्रभाव निर्माण झाला तर पश्चिम युरोपमध्ये भांडवलशाही राष्ट्रांचा प्रभाव निर्माण झाला. संपूर्ण जगाची सुद्धा दोन गटांत विभागणी झाली. ही विभागणी शीतयुद्धास जबाबदार ठरली.

**९. प्रचार, चुकीची माहिती आणि हेरगिरी :**

दोन्ही महासत्ता आपापल्या विचारसरणीला चालना देण्यासाठी आणि एकमेकांची विश्वासार्हता कमी करण्यासाठी व्यापक प्रचार मोहिमा राबवत होत्या. अमेरिका आणि साम्यवादी रशियाने आपले वैचारिक श्रेष्ठत्व दाखवण्यासाठी आणि विरोधी पक्षाला खलनायक ठरवण्यासाठी माध्यमे, साहित्य आणि सार्वजनिक विधाने यांचा वापर केला. तसेच गुप्तचर माहिती गोळा करणे आणि हेरगिरी हे शीतयुद्धाचे महत्त्वाचे घटक बनले. माहिती गोळा करण्यासाठी, एकमेकांच्या कारवायांमध्ये अडथळा आणण्यासाठी आणि विविध देशांमधील राजकीय परिणामांवर प्रभाव पाडण्यासाठी दोन्ही पक्ष गुप्त कारवायांमध्ये गुंतले.

**१०. रशियाकडून याल्टा आणि बाल्कन कराराचा भंग :**

सन १९४५ मध्ये रशियाने रुझवेल्ट, स्टॅलिन व चर्चिल यांनी केलेल्या याल्टा कराराचा भंग केला आणि पोलंडच्या ल्युबनिन सरकारवर आपला प्रतिनिधी लादण्याचा प्रयत्न केला. हंगेरी, बल्गेरिया, रूमानिया व झेकोस्लोव्हाकिया येथे आपल्या मर्जीतील सरकारे स्थापन केली. दोस्त राष्ट्रांना सैबेरिया येथे लष्करी तळ स्थापन करण्यास विरोध केला. ऑक्टोबर, १९४४ मध्ये रशियाने पूर्व युरोपचे विभाजन करण्यासंदर्भात चर्चिल यांच्या बाल्कन योजनेला मान्यता दिली होती. त्यानुसार बल्गेरिया व रुमानिया येथे रशियाचे नियंत्रण राहणार होते. हंगेरी व युगोस्लोवियावर ब्रिटन – रशियाचे संयुक्त नियंत्रण असणार होते. मात्र रशियाने त्याकडे दुर्लक्ष करून या सर्व देशांमध्ये साम्यवादी रशियाचे वर्चस्व निर्माण केले. या सर्व घडामोडींमुळे दोस्त राष्ट्रे नाराज झाली. त्यातून शीतयुद्धास पोषक परिस्थिती निर्माण झाली.

**११. रशियाचे इराण संबंधी धोरण :**

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात विविध कारणांनी अमेरिका, इंग्लंड व रशिया यांचे सैन्य इराणमध्ये ठेवण्यात आले होते. महायुद्धाच्या समाप्तीनंतर २ मार्च, १९४६ पर्यंत वरील सर्व राष्ट्रांनी इराणमधून आपले सैन्य माघारी घ्यावे, असे पोटसडॅम येथे झालेल्या परिषदेत ठरवण्यात आले होते. त्यानुसार इंग्लंड अमेरिकेने आपले सैन्य इराण मधून माघारी घेतले. पण रशियाने मात्र आपले सैन्य इराणमध्येच ठेवले. पुढे १ मे, १९४६ पर्यंत रशियन सैन्य इराणमधून काढून घेण्यात आले. रशियाचा इराणवर प्रभाव राहू नये, म्हणून इंग्लंड – अमेरिकेने प्रयत्न केले. त्यामुळे रशिया – अमेरिका यांचे संबंध बिघडले.

**१२. तुर्कस्थानवर वर्चस्वाचा प्रश्न :**

तुर्कस्तानच्या परिसरातील काळ्या समुद्रातील बास्फोरस व दार्दानेल्स या समुद्रधुन्या आपल्या ताब्यात असाव्यात, अशी रशियाची महत्त्वकांक्षा होती. त्यास इंग्लंड – अमेरिकेने विरोध केला. त्यामुळे त्यांच्यातील मतभेद वाढत गेले.

**१३. ग्रीसचा प्रश्न :**

ऑक्टोबर १९४४ मध्ये इंग्लंड आणि रशिया यांच्यात झालेल्या करारानुसार ग्रीसवर इंग्लंडचे नियंत्रण रशियाने मान्य केले होते. डिसेंबर १९४६ मध्ये इंग्लंड समर्थक सत्तेविरुद्ध ग्रीसमध्ये बंड झाले. त्या बंडाला रशिया मदत करत आहे, असा आरोप केला गेला. त्यामुळे इंग्लंड – रशिया संबंध दुरावले.

वरील सर्व कारणांमुळे शीतयुद्धास पोषक वातावरण तयार झाले. त्यातून अमेरिका विरुद्ध रशिया असा गट तयार होऊन त्यांच्या शीतयुद्धाला सुरुवात झाली.

**शीतयुद्ध लढण्याचे विविध मार्ग :**

एकमेकांवर मात करण्यासाठी दोन्ही गटांनी निरनिराळे मार्ग, साधने आणि पद्धतींचा वापर केल्याचे दिसून येते. त्या पुढील प्रमाणे :

**१. प्रचार तंत्र :** आपल्या राज्यात शत्रूराष्ट्राबद्दल सतत विषारी प्रचार, प्रसार करणे. त्यासाठी रेडिओ, टेलिव्हिजन वाक् युद्ध यांचा वापर करणे.

**२. आभासचित्रण :** आपल्या देशातील राहणीमान किती उच्च दर्जाचे आहे, याचे खोटे चित्र निर्माण करणे. वृत्तपत्रे, आकाशवाणी, टेलिव्हिजन यांचा वापर करून आपल्या देशाची सर्व क्षेत्रात कशी प्रगती होत आहे, याचे मोठे चित्र निर्माण करणे.

**३. हेरगिरी :** दुसऱ्या देशात गुप्तहेर पाठवून त्या देशाची अद्ययावत माहिती मिळवणे.

**४. आर्थिक युद्ध :** दुसऱ्या गटातील देशांमध्ये औद्योगिक उत्पादनांमध्ये खंड पडेल असे वातावरण निर्माण करणे. आपल्या गटात येणाऱ्या देशांना आर्थिक मदत, व्यापारी सवलत उपलब्ध करून देणे.

**५. स्थानिय युद्धे घडवून आणणे :** इतर देशांच्या स्थानिक संघर्षामध्ये सहभागी होणे, तेथे संशय, भीती निर्माण करणे. स्थानिक संघर्ष जास्तीत जास्त टिकेल यासाठी प्रयत्न करणे.

**६. घातपाती कारवाया :** आपणास नको असलेली शासनाने उलथवून पाडण्यासाठी घातपाती कारवाया तसेच इतर प्रयत्न करणे उदा. उत्तर कोरिया – दक्षिण कोरिया, उत्तर व्हियेतनाम दक्षिण व्हियेतनाम संघर्ष

**७. असहकार :** संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्वसाधारण सभेमध्ये, सुरक्षा समितीच्या बैठकांमध्ये वादविवादाचे, तणावाचे आणि मतभेदाचे वातावरण निर्माण करणे.

**८. लष्करी करार :** एखाद्या देशाला आर्थिक किंवा लष्करी मदत हवी असल्यास ती त्यांना त्वरित देणे आणि अशा राज्यांशी कायमचे लष्करी करार करून त्यांना आपल्या गटात सामील करून घेणे.

**शीतयुद्धाची वाटचाल :**

इ. स. १९४५ नंतर म्हणजेच दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर शीतयुद्धाला सुरुवात झाली, असे मानण्यात येते. शीतयुद्धाच्या सुरुवातीच्या काळात अमेरिकेत साम्यवाद विरोधी वातावरण तिव्र होते. जगातील कोणत्याही भागांमध्ये साम्यवादाचा प्रसार होऊ द्यायचा नाही, असा अमेरिकेचा दृढनिश्चय होता. जगातील कोणत्याही राष्ट्रात साम्यवादाचा प्रसार होऊ नये आणि तिथल्या लोकशाही राष्ट्राला साम्यवादी राष्ट्रांनी धोका उत्पन्न करू नये, म्हणून अशा ठिकाणी अमेरिका आपल्या शस्त्रसामर्थ्याने हस्तक्षेप करू शकते, अशी घोषणा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रुमन यांनी १२ मार्च, १९४७ रोजी केली. या घोषणेलाच 'ट्रुमन सिद्धांत' असे म्हणतात. ट्रूमन घोषणेमुळे लोकशाहीवादी तसेच भांडवलशाहीवादी राष्ट्रांचे नेतृत्व करण्याचे अमेरिकेचे धोरण स्पष्ट झाले. साम्यवादाच्या विरोधात अनेक राष्ट्रांना आर्थिक मदत देणारी योजना मार्शल नावाच्या अमेरिकन मंत्र्याने तयार केली. त्या योजनेला 'मार्शल योजना' असे म्हणतात. एखाद्या राष्ट्राच्या आर्थिक दुर्बलतेचा फायदा घेऊन साम्यवादी राष्ट्रांनी त्या ठिकाणी आपले वर्चस्व प्रस्थापित करू नये, हा मार्शल योजनेमागील हेतू होता. युरोपमधील एकूण १४ राष्ट्रांनी मार्शल योजनेखाली आर्थिक मदतीचा स्वीकार केला होता.

रशियानेही अमेरिका व इंग्लंड यांच्या विरोधात उघड पवित्रा घेतला. मार्शल योजनेवर रशियाने हल्ला केला. एवढेच नव्हे तर ऑक्टोबर १९४८ मध्ये कॉमिन्फॉर्मची स्थापना केली. मार्शल योजना उधळून लावणे हा कॉमिन्फॉर्मचा उद्देश होता. कॉमिन्फॉर्मने झेकोस्लोव्हाकियातील लोकशाही संपुष्टात आणून तेथे साम्यवादांची हुकूमशाही स्थापन केली. इ. स. १९५३ ते १९५७ या कालखंडात अमेरिकेने साम्यवादी रशियाभोवती अनेक लष्करी ठाणी प्रस्थापित करून रशियाला वेढा देण्याचा प्रयत्न केला. साम्यवादी रशियानेही पूर्वीय युरोपियन राष्ट्रांबरोबर परस्पर संरक्षणाचा करार केला. त्यालाच 'वॉर्सा करार' असे म्हटले जाते. इ. स. १९५७ ते १९६२ या काळात दोन्ही गटांनी सह–अस्तित्वाचे तत्व मान्य केले. भांडवलशाही राष्ट्रांबरोबर युद्ध अनिवार्य नाही, असे रशियन राष्ट्राध्यक्ष कृष्चेव्ह यांनी जाहीर केले. त्यामुळे शीतयुद्धाची तीव्रता कमी झाली असे वाटू लागले. दरम्यान अमेरिकेचे 'यु – टू' नावाचे हेरगिरी करणारे विमान रशियाच्या हद्दीत दोन हजार किलोमीटर आतमध्ये शिरले. ते रशियाने पाडले आणि अमेरिकेवर हेरगिरीचा आरोप केला. रशियाने क्यूबाला केलेली लष्करी मदत आणि क्यूबामध्ये क्षेपणास्त्रांचा उभारलेला तळ यामुळे दोन्ही गटांमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले. रशियाने क्युबा मधून सैनिक तळ काढून घेतला. त्यामुळे

शीतयुद्धात काहीसे शैथिल्य निर्माण झाले. आंतरराष्ट्रीय परिस्थितीही थोडी सुधारली. रशिया आणि अमेरिका यांच्या राष्ट्राध्यक्षांनी केलेल्या वाटाघाटीतून हा प्रश्न सामोपचाराने सोडवला गेला. इ. स. १९६३ मध्ये अमेरिका, इंग्लंड आणि रशिया यांच्यात अवकाशा संबंधित तसेच समुद्रातील अणु परीक्षणांवर प्रतिबंध घालण्यासाठी एक करार करण्यात आला. यावेळी 'आंतरराष्ट्रीय तणाव कमी करण्यासाठी व शांतता प्रस्थापित करण्यासाठी उचललेले हे एक महत्त्वाचे पाऊल आहे' अशी महत्त्वाची घोषणाही करण्यात आली. अमेरिका व रशिया यांच्यात अडीअडचणीच्या काळात त्वरित संपर्क करता यावा, या उद्देशाने दोन्ही देशांमध्ये हॉटलाइन निर्माण करण्यात आली.

याच काळात साम्यवादी जगतात सैद्धांतिक विचारांबाबत रशिया व चीन यांच्यातील मतभेद पराकोटीला गेले. त्यातून त्यांचे संबंध बिघडले. त्याचा शीतयुद्धावर परिणाम झाला. सन १९६४ नंतर व्हिएतनाममध्ये अमेरिकेच्या आक्रमक कारवाईचा निषेध रशियाने केला. सन १९६७ मध्ये अरब इस्रायल संबंधात तणाव निर्माण झाला. यामध्ये रशियाने इस्रायलच्या विरोधात अरब राष्ट्रांची बाजू घेतली. त्यामुळे अमेरिका रशिया यांच्यातील तणाव वाढत जाऊन प्रत्यक्ष युद्ध होण्याची भीती निर्माण झाली. जून १९६७ मध्ये ग्लासबरो येथे शिखर परिषद भरविण्यात येऊन अमेरिका व रशिया यांच्या शासनाध्यक्षांमध्ये चर्चा होऊन वातावरण निवळण्यास मदत झाली. इ. स. १९६८ मध्ये दोन्ही राष्ट्रांनी Non-Proliferation Treaty या तहावर सह्या केल्या. एखाद्या देशावर अण्वस्त्रांचा मारा झाल्यास आपण त्या देशाच्या मदतीकरिता धावून जाऊ असे इंग्लंड, रशिया आणि अमेरिका या राष्ट्रांनी जाहीर केले. इ. स. १९६८ मध्ये रशियाने झेकोस्लोवाकियावर आक्रमण करून त्यांच्या सार्वभौमत्वावर गदा आणली. इ. स. १९७२ मध्ये अमेरिकन राष्ट्राध्यक्ष निक्सन यांनी मास्कोला भेट दिली. यावेळी अमेरिकेने रशियाबरोबर दोन महत्त्वाचे करार केले. त्यापैकी एक करार क्षेपणास्त्रांच्या मर्यादित उपयोगाबद्दल (Treaty on the Limitation of Anti-Ballistic Missile System) होता. तर दुसरा करार आक्रमक शस्त्रास्त्रांच्या मर्यादित उपयोगाबद्दल होता. (Interim Agreement on Certain Measures with respect to the Limitation of strategic offensive Arms).

**क. सुरक्षा करार :**

दुसऱ्या महायुद्धानंतर रशियाच्या वाढत्या प्रभुत्वाला आणि साम्यवादाला रोखण्यासाठी युरोपीय देशांनी एकत्र येण्याची गरज भासू लागली. शीतयुद्धाच्या भीतीमुळे पश्चिम युरोपमधील देशांनी संरक्षण व सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून काही महत्त्वाचे करार केले. ते पुढील प्रमाणे :

**१. डंकर्क करार :**

मार्च, १९४७ मध्ये इंग्लंड आणि फ्रान्स यांच्यात ५० वर्ष मुदतीचा हा करार करण्यात आला होता. या करारानुसार जर्मनीने आक्रमण केल्यास दोन्ही देशांनी एकमेकांना लष्करी व आर्थिक सहाय्य करावे, असे ठरले. इ. स. १९४८ मध्ये बेल्जियम, नेदरलँड व लेक्झेंबर्ग या देशांना समाविष्ट करून डंकर्क कराराची व्याप्ती वाढवण्यात आली.

## २. ब्रुसेल्स करार :

इंग्लंड, बेल्जियम, फ्रान्स लेक्झेंबर्ग व हॉलंड या देशांनी बेल्जियममधील ब्रुसेल्स येथे एकत्र येऊन एक संयुक्त लष्करी करार केला. त्यामध्ये आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक सहकार्य अपेक्षित होते. तसेच करारात सहभागी असलेल्या कोणत्याही देशावर लष्करी आक्रमण झाल्यास इतर देश त्या देशाला लष्करी व इतर सहाय्य करणार होते. सन १९५४ मध्ये या करारात जर्मनी आणि इटली सहभागी झाले. तेव्हापासून या संघटनेस 'पश्चिम युरोपीय संघटना' असे म्हटले जाऊ लागले. सर्व सभासद देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांची एक सल्लागार समिती बनवली गेली. त्याचे 'उच्च संचालनव्यवस्था' आणि 'सूत्रसंचालनव्यवस्था' असे दोन उपविभाग होते. संस्थेचे नियोजन व अर्थव्यवहार पाहण्यासाठी एक 'अर्थसमिती' नेमली गेली.

## ३. उत्तर अटलांटिक करार संघटना / नॉर्थ अटलांटिक ट्रीटी ऑर्गनायझेशन (NATO) :

रशियन साम्यवादाच्या वाढत्या विस्ताराला रोखण्यासाठी पश्चिमात्य राष्ट्रांनी नॉर्थ अटलांटिक ट्रीटी ऑर्गनायझेशन (नाटो) या राष्ट्रसंघटनेची स्थापना अमेरिकेच्या पुढाकाराने करण्यात आली. या करारालाच 'अँटीकॉमिंनटर्न पॅक्ट' असेही म्हणण्यात येते. ४ एप्रिल, १९४९ रोजी वॉशिंग्टनमध्ये अमेरिका, कॅनडा आणि दहा पश्चिम युरोपीय देशांनी लष्करी सहकार्याचा करार केला. या कराराची मुदत २० वर्षे इतकी होती. बेल्जियम, कॅनडा, डेन्मार्क, फ्रान्स, आइसलँड, इटली, लेक्झेंबर्ग, नेदरलँड, नॉर्वे, पोर्तुगाल, इंग्लंड आणि अमेरिका या देशांचा त्यात सहभाग होता. इ. स. १९५१ मध्ये त्यात ग्रीस, तुर्कस्तान, इ. स. १९५५ मध्ये पश्चिम जर्मनी आणि इ. स. १९५७ मध्ये त्यात स्पेन  सहभागी झाले. सुरुवातीला वीस वर्षांसाठी असणारा हा करार इ. स. १९६९ मध्ये आणखी वीस वर्षांसाठी वाढवण्यात आला. त्यानंतर इ. स. १९८९ पासून दर दहा वर्षांनी त्याचा पुनर्विचार करण्यात येतो. 'आक्रमक साम्राज्यवादी शक्तींची संघटना' अशा शब्दात रशियाने नाटोचा धिक्कार करून त्यास विरोध केला होता.

नाटोचा एक जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला होता. त्यामध्ये उत्तर अटलांटिक महासागराच्या दोन्ही किनाऱ्यावरील देशांच्या शांततेचे, सुरक्षिततेचे व स्वातंत्र्याचे संरक्षण करणे, हे नाटोचे उद्दिष्ट असल्याचे म्हटले होते. पश्चिम युरोपच्या संस्कृतीचे व सार्वभौमत्वाचे रक्षण करणे, हा नाटोचा उद्देश होता. कोणत्याही सभासद देशावर झालेले आक्रमण हे इतर सर्व सभासद देशांवरील आक्रमण मानण्यात येईल, आणि सर्व सभासद राष्ट्रे शांतता व सुरक्षितता टिकवण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न करतील, असे ठरवण्यात आले होते.

नाटो ही पूर्णपणे लष्करी संघटना असून तिने पश्चिम युरोपमधील सर्व देशांमध्ये मोठमोठे लष्करी व क्षेपणास्त्र तळ स्थापन केले आहेत. या करारामुळे कोणत्याही देशावर हल्ला झाल्यास अमेरिका त्यांच्या मदतीला धावून जाणार होती. पश्चिम युरोपीय देशांना संरक्षक छत्र पुरवले गेले. युरोपीय देशांना मदतीसाठी अमेरिका सतत व जय्यत तयारीत राहिली.

पोलंड, हंगेरी व झेक प्रजासत्ताक यांना अलीकडेच नाटोमध्ये प्रवेश देण्यात आला आहे. नाटोचे मुख्यालय ब्रुसेल्स येथे आहे. नाटोमध्ये सरचिटणीसपदाची निर्मिती करण्यात आली असून त्यांच्या

नेतृत्वाखाली कायमस्वरूपाचा कर्मचारी वर्ग देण्यात आला आहे. नाटोच्या लष्करी कार्यवाहीसाठी 'सुप्रीम अलाईड कमांडर, युरोप' हा सर्वोच्च अधिकारी असून त्याचे कार्यालय फ्रान्समध्ये रॉकेनकोर्ट या ठिकाणी आहे. 'सुप्रीम हेडक्वार्टर्स अलाईड पावर, युरोप' (SHAPE) हे त्याच्या कार्यालयाचे नाव आहे. नाटोची 'युरोपियन कमांड', 'अटलांटिक ओशन कमांड', 'चॅनेल कमांड' व 'कॅनडा – युनायटेड स्टेट्स प्लॅनिंग ग्रुप' अशी चार लष्करी केंद्रे आहेत. प्रतिनिधी सभा, उपप्रतिनिधींची सभा, संरक्षण समिती आणि लष्करी समिती ही नाटोची चार प्रमुख अंगे आहेत.

**प्रतिनिधी सभा :** सर्व सदस्य देशांचे मंत्री यामध्ये असतात. सर्व सदस्यांमधून दरवर्षी अध्यक्षांची निवड केली जाते. अध्यक्षाच्या नेतृत्वाखाली दरवर्षी एक दोन वेळा बैठका होतात. नाटोचा मुख्य सचिव हा तिचा प्रमुख असतो.

**उपप्रतिनिधींची सभा :** सर्व सभासद देशांचे राजनैतिक अधिकारी यामध्ये असतात. ही सभा नाटोच्या हितासाठी नेमून दिलेले कार्य करते.

**संरक्षण समिती :** सभासद देशांचे संरक्षण मंत्री यामध्ये असतात. संरक्षणासंबंधी रणनीती आखणे व प्रतिनिधी सभेने घेतलेल्या संरक्षक विषयक निर्णयांचा विचार करणे, हे या समितीचे कार्य आहे.

**लष्करी समिती :** प्रतिनिधी सभा आणि संरक्षण समिती यांना सल्ला देणे, सभासद देशांच्या लष्कर प्रमुखांच्या कार्याचे समन्वय करणे, नाटोच्या योजना व धोरणांची अंमलबजावणी करणे, हे या समितीचे कार्य आहे.

२४ ते २६ एप्रिल, १९९९ मध्ये नाटोने आपला पन्नासावा वर्धापन दिन साजरा केला. तसेच जगातल्या कोणत्याही भागांमध्ये युद्धाची आघाडी उघडण्याचे नवीन धोरण स्वीकारले आहे.

या संघटनेमुळे युरोपातील राष्ट्रांनी एकत्र येऊन एकमेकांशी सहकार्य वाढवले. त्यांना आपला आर्थिक व राजकीय विकास साधणे शक्य झाले. नाटोची एकूण १३० लष्करी, नाविक आणि हवाई तळे उभारण्यात आली होती. परंतु याच संघटनेमुळे जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर ढकलले गेले. अमेरिका व रशिया या दोन महासत्तांच्या राष्ट्रगटांमध्ये संपूर्ण जग विभागले गेले. मात्र इ. स. १९८९ मध्ये सोव्हिएट रशियाचे विघटन झाल्यानंतर नाटोचे महत्व कमी होत गेले.

### ४. युरोपियन डिफेन्स कम्युनिटी (EDU):

पूर्व व पश्चिम युरोपियन सैन्यांचे एकीकरण करण्याची योजना फ्रान्सने मांडली. त्याला 'युरोपियन डिफेन्स कम्युनिटी' (इडीसी) असे नाव देण्यात आले. मे,१९५२ मध्ये फ्रान्स, बेल्जियम, इटली, नेदरलँड्स, लेक्झेंबर्ग आणि पश्चिम जर्मनीच्या परराष्ट्रमंत्र्यांनी यासंबंधीच्या करारावर सह्या केल्या. परंतु फ्रान्सच्या कायदेमंडळाने या योजनेस मान्यता न दिल्यामुळे ती प्रत्यक्षात आणता आली नाही.

### ५. वेस्टर्न युरोपियन युनियन (WEU):

ऑक्टोबर, १९५४ मध्ये लंडन येथे भरलेल्या एका परिषदेत वेस्टर्न युरोपियन युनियनची स्थापना करण्यात आली. या संघटनेने पश्चिम जर्मनीला नाटोमध्ये सामील होण्यास सांगण्याचा प्रस्ताव मांडला. पश्चिम जर्मनीने स्वतःच आपल्या शस्त्रास्त्र व दारूगोळ्याच्या उत्पादनावर स्वेच्छेने नियंत्रण ठेवण्याचे मान्य केले.

### ६. सेन्टो करार (CENTO : Central Treaty Organisation) :

मध्यपूर्वेतील खनिज तेलाचे प्रदेश, रशियावर मारा करण्यासाठी अत्यंत सोयीस्कर असणारे क्षेत्र यामुळे पाश्चात्त्य राष्ट्रांना तसेच अमेरिकेला तेथे लष्करी नियंत्रण असणे आवश्यक वाटत होते. इस्राएल – पॅलेस्टाईन संघर्षात पाश्चात्त्य राष्ट्रांची भूमिका, अरब राष्ट्रांतील तंत्रज्ञानाचा अभाव, अरबांचा प्रखर राष्ट्रवाद यामुळे मध्यपूर्वेतील पाश्चात्त्य राष्ट्रांच्या हितसंबंधांचे रक्षण करणे कठीण बनले होते. तुर्कस्तान नाटो संघटनेचा सभासद असून त्याचे भौगोलिक स्थान महत्त्वपूर्ण होते. अमेरिकेकडून पाकिस्तानला लष्करी व आर्थिक मदत मिळत होती. या दोन्ही देशांमध्ये समेट घडवून त्यांच्यात एप्रिल, १९५४ मध्ये परस्पर संरक्षणाचा लष्करी करार करण्यात आला. तसेच फेब्रुवारी, १९५५ मध्ये तुर्कस्तान आणि इराक या राष्ट्रांनी बगदाद करार केला. इंग्लंड व पाकिस्तान ही दोन राष्ट्रे बगदाद करारात सामील झाली. सप्टेंबर, १९५५ मध्ये इराणसुद्धा बगदाद करारात सामील झाले. अमेरिका या करारात सामील झाली नाही. पण तिने या लष्करी गटाला आर्थिक मदत पुरवली. १४ जून, १९५८ रोजी इराकमध्ये लष्करी क्रांती झाल्यानंतर इराक बगदाद करारातून बाहेर पडला. त्यानंतर मात्र अमेरिका या करारात सामील झाली. बगदाद कराराचेच पुढे सेन्टो करारात रूपांतर करण्यात आले. मध्यपूर्वेमध्ये रशियन साम्यवादाला आळा घालणे हा सेन्टो कराराचा मुख्य उद्देश होता. इराण आणि पाकिस्तान सेन्टो करारातून बाहेर पडल्यानंतर हा करार संपुष्टात आला.

### ७. सिएटो करार (SEATO : South East Asia Treaty Organisation) :

आग्नेय आशियातील साम्यवादाच्या प्रसाराला आळा घालणे आणि तेथील लोकशाही राष्ट्रांचे संघटन करणे, या हेतूने आग्नेय आशियामधील राष्ट्रांची लष्करी संघटना उभारणे अमेरिकेला गरजेचे वाटत होते. सप्टेंबर, १९५४ मध्ये मनीला येथे पाश्चात्य व आशियाई राष्ट्रांच्या प्रतिनिधींची परिषद भरवण्यात आली. त्या परिषदेत ८ सप्टेंबर, १९५४ रोजी 'साऊथ – ईस्ट एशिया ट्रीटी ऑर्गनायझेशन' हा संरक्षक करार करण्यात आला. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया, थायलंड, न्यूझीलंड, पाकिस्तान आणि फिलिपाईन्स ही राष्ट्रीय त्यात सहभागी झाली. या करारात सहभागी असणाऱ्या कोणत्याही राष्ट्रावर हल्ला झाल्यास त्याला सर्व प्रकारची मदत करण्याचे आश्वासन अमेरिकेने एका घोषणेद्वारे दिले. असे आक्रमण झाल्यास ते आक्रमण सर्व सभासद राष्ट्रांविरोधातील आक्रमण मानण्यात येऊन त्या आक्रमणाचा सामूहिक प्रतिकार करणे सिएटो करारामध्ये अपेक्षित होते. सर्व सभासद राष्ट्रांच्या प्रतिनिधींचे एक नियंत्रक मंडळ स्थापन करण्यात आले. बँकॉक येथे या संघटनेचे मध्यवर्ती कार्यालय स्थापन करण्यात आले. भारतासह अन्य आशियाई राष्ट्रे त्यात सामील झाली नाहीत. भारताने तसेच अलिप्ततावादी चळवळीच्या बांडुंग परिषदेने या कराराचा धिक्कार केला.

व्हिएतनाममुळे अमेरिकेला बसलेला जबरदस्त हादरा, फ्रान्सची इंडोचायनातून माघार, सन १९७३ नंतर पाकिस्तानची सिएटो करारातून माघार यामुळे हा करार नाममात्र राहिला.

**८. वॉर्सा करार / ईस्ट युरोपियन ट्रीटी ऑर्गनायझेशन :**

अमेरिकेने केलेल्या नाटो, सिएटो, सेन्टो या करारांना प्रत्युत्तर म्हणून रशियाने साम्यवादी देशांशी वॉर्सा करार केला. ११ ते १४ मे, १९५५ रोजी सर्व साम्यवादी देशांची परिषद वॉर्सा येथे भरवण्यात आली होती. या परिषदेत अल्बानिया, बल्गेरिया, झेकोस्लोव्हाकिया, पूर्व जर्मनी, हंगेरी, पोलंड, रूमानिया आणि रशिया या देशांनी भाग घेतला होता. या सर्व देशांनी वीस वर्षे मुदतीचा मैत्री व सहकार्याचा करार केला. साम्राज्यवादी आणि भांडवलशाही आक्रमणाला तोंड देणे, हा या कराराचा उद्देश होता. सभासद देशांपैकी कोणावरही आक्रमण झाल्यास त्याला इतर सर्व देश मदत करतील, अशी तरतूद त्यात होती. तसेच सभासद देशांना आर्थिक राजकीय सामाजिक आणि सांस्कृतिक सहकार्य केले जाईल, असेही या करारात होते. या करारात सहभागी झालेल्या सर्व राष्ट्रांचे सार्वभौमत्व, प्रत्येकाला राष्ट्रीय धोरण ठरवण्याचे स्वातंत्र्य, करारातील कोणत्याही राष्ट्राच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप होणार नाही, याची ग्वाही देण्यात आली होती. परस्परांबरोबर मैत्री, सहकार्य, सहजीवन या तत्त्वांच्या आधारे शांततामय मार्गाने आपापसातील सर्व प्रश्न सोडवण्याचे वॉर्सा संघटनेतील राष्ट्रांनी मान्य केले होते. प्रत्येक देशाचा एक प्रतिनिधी असलेली राजकीय सल्लागार समिती निर्माण करण्यात आली होती. या समितीची वर्षातून दोन वेळा बैठक होत असे. याचे सभासदत्व सर्व देशांना खुले करण्यात आले होते. या संघटनेचे मध्यवर्ती कार्यालय मास्को येथे होते. संघटनेच्या संयुक्त लष्कराचा सरसेनापती म्हणून रशियाच्या मार्शल कोनेव्ह याची नियुक्ती करण्यात आली होती. १ जुलै, १९९१ रोजी वॉर्सा करार रद्द करण्यात आला.

**९. कौन्सिल ऑफ म्युच्युअल इकॉनॉमिक असिस्टन्स :**

एप्रिल, १९४९ मध्ये बल्गेरिया, पोलंड, हंगेरी, रूमानिया, झेकोस्लोव्हाकिया व रशिया या देशांनी याची स्थापना केली. पुढे अल्बानिया, पूर्व जर्मनी, मंगोलिया व युगोस्लाव्हिया हे देश त्यात सहभागी झाले. 'कॉमेकॉन' या संक्षिप्त नावाने ही संघटना ओळखली जाते. १९७० नंतर सभासद देशांचे आर्थिक एकीकरण करण्याच्या प्रक्रियेला वेग आला. त्यामुळे त्यांचे राष्ट्रीय उत्पन्न २ टक्क्यांनी वाढले.

**१०. कम्युनिस्ट इन्फॉर्मेशन ब्युरो :**

युरोपमध्ये सर्वसाधारण साम्यवादी धोरणांची अंमलबजावणी करणे हे या संघटनेचे मुख्य उद्दिष्ट होते. पूर्व युरोपातील साम्यवादी सरकार दृढ करणे आणि त्यांना साम्यवादी कार्यानितीमध्ये प्रशिक्षित करणे यात संघटनेने मोलाची भूमिका पार पाडली. 'कॉमिन्फॉर्म' या संक्षिप्त नावाने ही संघटना ओळखली जाते.

**११. अमेरिकन राज्य संघटना (OAS) :**

कोलंबिया येथील वेगोष्ठा या शहरात सन १९४८ मध्ये अमेरिकन राज्यांचे अधिवेशन भरवण्यात आले. त्यामध्ये अमेरिकन खंडात ही क्षेत्रीय संघटना स्थापन करण्यात आली.

**१२. युरोपची महासमिती :**

फ्रान्स, इंग्लंड इत्यादी राष्ट्रांनी जानेवारी १९४९ मध्ये युरोपची महासमिती निर्माण केली. त्यामध्ये फ्रान्स, इंग्लंड, बेल्जियम, इटली, नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क, आयलँड इत्यादी राष्ट्रे सहभागी झाली. या महासमितीने सांस्कृतिक व आर्थिक संबंध दृढ करण्याचे कार्य केले.

**स्वयं अध्ययन प्रश्न–१**

अ) योग्य पर्याय निवडा.

१. 'शीतयुद्ध' हे नामाभिधान ............ याने केले.

अ) चर्चिल ब) वॉल्टर लीपमन क) रुजवेल्ट ड) बर्नार्ड बरूच

२. शीतयुद्धामुळे जगाचे ........... असे द्विध्रुवीकरण झाले.

अ) साम्यवादी आणि भांडवलशाही ब) साम्यवादी आणि समाजवादी

क) भांडवलशाही आणि हुकुमशाही ड) साम्यवादी आणि हुकूमशाही

३. अमेरिकेचा अध्यक्ष ट्रुमन याने........... रोजी ट्रुमन सिद्धांताची घोषणा केली.

अ) १२ मार्च, १९४७ ब) १२ मार्च, १९४६

क) १२ मार्च, १९४२ ड) यापैकी नाही

४. जोड्या जुळवून योग्य पर्याय निवडा.

| गट–१ | गट–२ |
|---|---|
| १. डंकर्क करार | अ) सप्टेंबर, १९५४ |
| २. नाटो (NATO) करार | ब) एप्रिल, १९४९ |
| ३. सेन्टो करार (CENTO) | क) एप्रिल, १९५४ |
| ४. सिएटो करार (SEATO) | ड) मार्च, १९४७ |

अ) १–ब, २–ड, ३–अ, ४–अ ब) १–क, २–अ, ३–ड, ४–ब

क) १–ड, २–ब, ३–क, ४–अ ड) १–अ, २–ब, ३–क, ४–ड

५. खालील विधानांच्या संदर्भात योग्य पर्याय निवडा.

विधान–१ : शीतयुद्ध हा साम्यवादी व भांडवलशाही या दोन परस्पर विरोधी तत्त्वप्रणालींचा संघर्ष होता.

विधान–२ : शीतयुद्ध हा अमेरिका आणि साम्यवादी रशिया यांच्यातील राजकीय, लष्करी आणि वैचारिक संघर्षाचा प्रदिर्घ काळ होता.

अ) विधान एक सत्य/योग्य तर विधान दोन असत्य/अयोग्य आहे.

ब) विधान एक असत्य/अयोग्य तर विधान दोन सत्य/योग्य आहे.

क) दोन्ही विधाने सत्य/योग्य आहेत.

ड) दोन्ही विधाने असत्य/अयोग्य आहेत.

### १.२.२ विभाग २ : शीतयुद्धातील संघर्ष

शीतयुद्धकाळात जगाच्या विविध भागांमध्ये अनेक संघर्ष उद्भवले, ज्यांमध्ये जर्मनी, कोरिया आणि क्युबा हे प्रमुख केंद्रबिंदू ठरले. या संघर्षांनी दोन महासत्तांमधील तणाव प्रत्यक्षात अनुभवला आणि जागतिक शांततेला धोका निर्माण केला. या घटनांचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे, कारण त्यांनी न केवळ संबंधित देशांवर, तर संपूर्ण आंतरराष्ट्रीय राजकारणावर दीर्घकालीन प्रभाव टाकला. या तीन प्रकरणांचे तुलनात्मक विश्लेषण आपल्याला शीतयुद्धाच्या गुंतागुंतीची व्याप्ती समजून घेण्यास मदत करेल.

**अ. जर्मनी :**

द्वितीय महायुद्धानंतर जर्मनीचे पूर्व आणि पश्चिम असे दोन भागांत विभाजन झाले. पूर्व जर्मनी (जर्मन लोकशाही प्रजासत्ताक) हे साम्यवादी रशियाच्या प्रभावाखाली साम्यवादी राज्य बनले, तर पश्चिम जर्मनी (संघीय प्रजासत्ताक जर्मनी) हे अमेरिका, ब्रिटन आणि फ्रान्सच्या प्रभावाखाली लोकशाही राज्य बनले.

ऑगस्ट, १९४५ मध्ये पॉटसडॅम येथे झालेल्या बैठकीनंतर जर्मनीची चार स्वतंत्र विभागात विभागणी करण्यात आली. त्यावर रशिया, फ्रान्स, इंग्लंड व अमेरिका यांचे स्वतंत्र नियंत्रण होते. इंग्लंड, फ्रान्स आणि अमेरिका यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या तिन्ही भागांचे एकत्रीकरण करण्यात आले. पश्चिम जर्मनीवर दोस्त राष्ट्रांचे आणि पूर्व जर्मनीवर रशियाचे वर्चस्व होते. पश्चिम जर्मनी मध्ये सप्टेंबर १९४८ मध्ये घटना समिती बोलावली गेली. तेथे निवडणुका होऊन संघराज्याच्या धर्तीवर मध्यवर्ती सरकार स्थापन करण्यात आले. कोंराड ऑडेनॉर हा पश्चिम जर्मनीचा चान्सलर बनला. रशियाच्या पुढाकाराने इ. स. १९४६ मध्ये पूर्व जर्मनीत निवडणुका होऊन 'जर्मन डेमोक्रॅटिक रिपब्लिक'ची स्थापना झाली. विल्हेम पीक हा अध्यक्ष आणि ऑटो ग्रोटेवाल हा चान्सलर बनला. जर्मनीची फाळणी करून जर्मनीचे खच्चीकरण केले गेले. जर्मन जनतेच्या राष्ट्रीय भावनांना पायदळी तुडवण्यात आले. दोस्त राष्ट्रांना आणि साम्यवादी रशियाला जर्मनीची फाळणी सोयीची असल्यामुळे ती टिकवून धरली गेली.

आर्थिक ऐक्यावरून झालेल्या मतभेदानंतर रशियाने पश्चिम बर्लिन शहाराची मार्च, १९४७ मध्ये नाकेबंदी केली. ४ मे १९४९ रोजी फ्रान्स, इंग्लंड आणि अमेरिकेने रशियाबरोबर समझोता केला. त्यानंतर रशियाकडून ही नाकेबंदी उठवण्यात आली.

जर्मनीच्या एकीकरणाच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी विन्स्टन चर्चिल यांनी पुढाकार घेऊन एक बैठक आयोजित केली. २५ जानेवारी ते १८ फेब्रुवारी, १९५४ या कालावधीत बर्लिन येथे ही परिषद घेण्यात आली. या परिषदेमध्ये इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका व रशिया या राष्ट्रांचे परराष्ट्रमंत्री उपस्थित होते. सर्वांना मान्य होईल असा तोडगा न निघाल्याने ही परिषद अपयशी ठरली. १८ जुलै, १९५५ रोजी जिनिव्हा येथे

भरलेल्या शिखर परिषदेत जर्मनीच्या एकीकरणाचा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करण्यात आला. १८ जुलै ते २५ जुलै, १९५५ या दरम्यान झालेल्या चर्चेत दोन्ही गटांना मान्य होईल अशी तडजोड झाली नाही, त्यामुळे जर्मनीचे एकीकरण होऊ शकले नाही. इ. स. १९५९ मध्ये जर्मनीच्या एकीकरणाचा प्रश्न सोडवण्याचा पुन्हा प्रयत्न केला गेला. परंतु मतभेदांमुळे जर्मन प्रश्नाची सोडवणूक होऊ शकली नाही.

बर्लिन शहराचे पूर्व व पश्चिम असे भाग करणारी भिंत ऑगस्ट, १९६१ मध्ये रशियाला उभारावयाची होती. पश्चिम बर्लिन दोस्त राष्ट्रांकडे तर पूर्व बर्लिन रशियाकडे देण्यात आले. अमेरिकेने त्यास विरोध केला.

इ. स. १९८९ मध्ये प्रागने पश्चिम जर्मनी बरोबरची सीमा खुली केली त्यानंतर हजारो पूर्व जर्मन नागरिक रस्त्यावर आले व त्यांनी स्वातंत्र्याची मागणी केली. साम्यवादी राजवटी विरोधात, स्वातंत्र्य आणि साम्यवादाचा शेवट यासाठी ऑक्टोबर, १९८९ मध्ये पूर्व जर्मनीत प्रचंड निदर्शने होऊ लागली. १८ मार्च, १९९० रोजी पूर्व जर्मनीमध्ये खुल्या निवडणुका घेण्यात आल्या. त्यात सोशल डेमोक्रॅट या पक्षाच्या आघाडीचे सरकार सत्तेवर आले. इगोन क्रेन्झ पूर्व जर्मनीचा अध्यक्ष आणि कम्युनिस्ट पक्षाचा सरचिटणीस बनला. ९ नोव्हेंबर, १९८९ रोजी बर्लिनची भिंत पूर्व जर्मनीमधील इगोन क्रेंझच्या साम्यवादी सरकारने पाडून टाकली. त्यामुळे बर्लिन शहराचे एकीकरण होऊन दोन्ही जर्मनींचे एकीकरण करणे सोपे झाले. जर्मनीच्या एकीकरणास गोर्बाचेव्हचा पाठिंबा आणि सक्रिय मदत होती. इगोन क्रेझच्या जागी ग्रेगोर ग्यसी हा पूर्व जर्मनीचा अध्यक्ष बनला. त्याने पूर्व जर्मनीतील कम्युनिस्ट पक्षाच्या हक्कांचा व अधिकारांचा म्हणजेच राजकीय मक्तेदारीचा त्याग केला. मार्च, १९९० मध्ये पूर्व जर्मनीत खुल्या निवडणुका घेण्यात आल्या. या निवडणुकांमध्ये पश्चिम जर्मनीचा चान्सलर कोहल याच्या पक्षाला निर्विवाद बहुमत मिळाले. पूर्व जर्मनीत त्याच्या पक्षाचे हंगामी सरकार स्थापन झाले. या हंगामी सरकारने पूर्व व पश्चिम जर्मनीचे एकीकरण करण्यासाठी घटनात्मक तरतुदींची पूर्तता केली. त्यास रशिया व अमेरिकेने मान्यता दिली. ३ ऑक्टोबर, १९९० रोजी ४५ वर्षानंतर पूर्व व पश्चिम जर्मनीचे विलीनीकरण झाले आणि जर्मनीचे एकीकरण पूर्ण झाले. १ जुलै, १९९० रोजी दोन्ही देशांसाठी डॉश्श मार्क हे एकच चलन स्वीकारण्यात आले. डिसेंबर, १९९० मध्ये जर्मनीत खुल्या निवडणुका घेण्यात आल्या. या निवडणुकांमध्ये कोहलच्या नेतृत्वाखालील पक्षाने बहुमत प्राप्त केले. हेल्मुट कोहल हे एकत्रित जर्मनीचे पहिले पंतप्रधान बनले. २० जून, १९९१ रोजी बर्लिन ही नव्या जर्मनीची राजधानी बनली.

या काळात जर्मनीने आपल्या पूर्वीच्या दोन भागांमधील आर्थिक आणि सामाजिक फरक दूर करण्यासाठी मोठे प्रयत्न केले. एकीकृत जर्मनीने युरोपीय संघाचा महत्त्वाचा सदस्य म्हणून आपली भूमिका बजावली आणि जागतिक राजकारणात एक प्रमुख शक्ती म्हणून उदयास आली. आज जर्मनी युरोपमधील सर्वात मोठी अर्थव्यवस्था आणि जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे, जी तिच्या औद्योगिक क्षमता आणि निर्यात-आधारित अर्थव्यवस्थेसाठी ओळखली जाते.

**ब. कोरिया :**

शीतयुद्धाच्या काळात झालेल्या महत्त्वाच्या संघर्षांपैकी कोरियाई युद्ध हे एक होते. हे युद्ध सन १९५० ते १९५३ या काळात झाले आणि त्यामध्ये उत्तर कोरिया आणि दक्षिण कोरिया यांच्यात संघर्ष झाला. या युद्धामुळे कोरिया द्विपकल्पाचे दोन भागांत विभाजन झाले आणि आजही ते कायम आहे. या युद्धामध्ये अमेरिका आणि सोव्हिएत युनियन यांचा अप्रत्यक्ष सहभाग होता, ज्यामुळे शीतयुद्धाचा तणाव वाढला.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात कोरियाला जपानने जबरदस्तीने आपल्या अधीन केले. कोरियावर जपानचे आधिपत्य ३५ वर्षे राहिले. या काळात जपानने कोरियाच्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर मोठा परिणाम केला.

**शीतयुद्धकालीन कोरिया**

**कोरियाचे विभाजन आणि वैचारिक संघर्ष:**

दुसऱ्या महायुद्धानंतर कोरियावरील जपानचा ताबा संपला. शीतयुद्धामुळे कोरिया ३८ व्या समांतर रेषेवर विभागले गेले.कोरिया उत्तर आणि दक्षिण अशा दोन भागांमध्ये विभाजित झाले. उत्तर कोरिया कम्युनिस्ट राज्यव्यवस्थेखाली येऊन त्यावर साम्यवादी रशियाचा प्रभाव वाढू लागला, तर दक्षिण कोरिया अमेरिकेच्या प्रभावाखाली येऊन तेथे भांडवलशाही व्यवस्था रुजली. त्यामुळे कोरियन राष्ट्र दोन भागांमध्ये विभागलं गेलं.हे विभाजन केवळ भौगोलिक नव्हते, तर वैचारिक देखील होते. दोन्ही भागांमध्ये परस्परविरोधी राजकीय, आर्थिक आणि सामाजिक व्यवस्था विकसित झाल्या.

**महासत्तांचा प्रभाव आणि हस्तक्षेप (१९५०-१९५३):**

अमेरिका आणि साम्यवादी रशिया या दोन महासत्तांनी आपापल्या प्रभावक्षेत्रात कोरियाचे भाग आणले. अमेरिकेने दक्षिण कोरियाला आर्थिक व लष्करी मदत पुरवली, तर साम्यवादी रशियाने उत्तर कोरियाला पाठिंबा दिला. या महासत्तांच्या धोरणांमुळे कोरियाचे अंतर्गत प्रश्न आंतरराष्ट्रीय राजकारणाचा भाग बनले.

**कोरियन युद्धाचे दूरगामी परिणाम:**

सन १९५० ते १९५३ दरम्यान उत्तर व दक्षिण कोरियात युद्ध होऊन या युद्धाने देशाची विभागणी अधिक ठळक केली. देशाची मोठ्या प्रमाणावर हानी झाली.सुमारे ५ दशलक्ष लोक मृत्युमुखी पडले. २७ जुलै, १९५३ रोजी युद्धविराम करार झाला.

युद्धानंतर दोन्ही भागांमध्ये परस्पर अविश्वास आणि शत्रुत्व वाढले. लष्करीकरण वाढले आणि सीमा अधिक कडक झाल्या.

**राजकीय विकास:**

उत्तर कोरियात किम इल-सुंग हे सन १९४८ ते १९९४ या संपूर्ण कालावधीत उत्तर कोरियाचे सर्वोच्च नेते होते. त्यांनी 'जुचे' (स्वावलंबन) तत्त्वज्ञानावर आधारित कम्युनिस्ट शासन चालवले. त्यांनी आपला मुलगा किम जाँग-इल यांना उत्तराधिकारी म्हणून तयार केले.

दक्षिण कोरियात सन १९६० मध्ये लष्करी उठाव होऊन जनरल पार्क चुंग-ही सत्तेवर आले.

सन १९७९ मध्ये त्यांची हत्या होऊन नवीन लष्करी शासन आले.सन १९८७ मध्ये लोकशाही संक्रमण होऊन रो तै-वू पहिले निवडून आलेले राष्ट्राध्यक्ष बनले.

**आर्थिक धोरणे आणि विकासाचे वेगवेगळे मार्ग:**

शीतयुद्धकाळात दक्षिण कोरियाने मुक्त बाजारपेठ धोरण स्वीकारले. त्यांनी निर्यात-केंद्रित धोरणांवर भर दिला, ज्यामुळे आर्थिक वृद्धीला चालना मिळाली. उलटपक्षी, उत्तर कोरियाने केंद्रीय नियोजित अर्थव्यवस्था स्वीकारली. त्यांनी 'जुचे' (स्वावलंबन) या तत्त्वज्ञानावर आधारित आर्थिक धोरण राबवले. या भिन्न दृष्टिकोनांमुळे दोन्ही देशांच्या आर्थिक विकासात मोठी तफावत निर्माण झाली.

**सामाजिक आणि सांस्कृतिक परिणाम:**

शीतयुद्धामुळे कोरियन समाजात मोठे बदल घडले. दक्षिण कोरियात पाश्चिमात्य संस्कृतीचा प्रभाव वाढला, तर उत्तर कोरियाने स्वतःला बाह्य प्रभावांपासून अलग ठेवले. दक्षिण कोरियात व्यक्तिस्वातंत्र्य आणि लोकशाही मूल्यांना महत्त्व मिळाले, तर उत्तर कोरियात सामूहिक विचारसरणी आणि नेत्याची व्यक्तिपूजा प्रस्थापित झाली.

शैक्षणिक आणि वैज्ञानिक विकास:

शीतयुद्धकाळात दोन्ही कोरियांनी शिक्षण आणि विज्ञान क्षेत्रात प्रगती केली, परंतु त्यांचे उद्दिष्ट वेगवेगळे होते. दक्षिण कोरियाने तंत्रज्ञान आणि नवोपक्रम क्षेत्रात भर दिला, तर उत्तर कोरियाने लष्करी संशोधन आणि अणुकार्यक्रमावर लक्ष केंद्रित केले.

**मानवी हक्क आणि व्यक्तिस्वातंत्र्य:**

शीतयुद्धाच्या काळात दोन्ही कोरियांमध्ये मानवी हक्कांची स्थिती वेगवेगळी होती. दक्षिण कोरियात हळूहळू लोकशाही प्रक्रिया सुरू झाली आणि नागरी स्वातंत्र्यात वाढ झाली. उलटपक्षी, उत्तर कोरियात कडक नियंत्रण आणि व्यक्तिस्वातंत्र्यावर मर्यादा राहिल्या.

**माध्यमे आणि सांस्कृतिक अभिव्यक्ती:**

शीतयुद्धाने माध्यमे आणि सांस्कृतिक अभिव्यक्तीवर मोठा प्रभाव टाकला. दक्षिण कोरियात हळूहळू माध्यम स्वातंत्र्य वाढले आणि K-pop, कोरियन सिनेमा यांसारख्या सांस्कृतिक अभिव्यक्तींना चालना मिळाली. उत्तर कोरियात माध्यमे आणि कला सरकारी नियंत्रणाखाली राहिली आणि प्रचारासाठी वापरली गेली.

**शीतयुद्धोत्तर काळातील आव्हाने:**

शीतयुद्धाच्या समाप्तीनंतरही त्याचे परिणाम कोरियावर कायम राहिले. उत्तर कोरियाला आर्थिक आणि राजकीय एकाकीपणाचा सामना करावा लागला, तर दक्षिण कोरियाने जागतिक अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान मिळवले. दोन्ही देशांमधील संबंध सुधारण्याचे प्रयत्न सुरू झाले, परंतु अनेक आव्हाने कायम राहिली.

अशा प्रकारे, शीतयुद्धाने कोरियाच्या इतिहासाला, समाजाला आणि अर्थव्यवस्थेला आकार दिला. त्याच्या परिणामांमुळे निर्माण झालेली परिस्थिती आजही कोरियाई द्वीपकल्पावर प्रभाव टाकत आहे.

**क. क्यूबा :**

शीतयुद्धाच्या काळात क्यूबाने अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. अमेरिका आणि साम्यवादी रशिया दोन्ही महाशक्तींनी क्यूबावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे शीतयुद्धात गंभीर परिस्थिती निर्माण झाली.

अमेरिकेच्या फ्लोरिडा राज्यापासून फक्त ९० मैल अंतरावर असल्याने क्यूबाचे भौगोलिक स्थान अमेरिकेसाठी एक मोठा धोका समजले जात होते. मागील अनेक वर्षांपासून क्युबा अमेरिकन साम्राज्यवादाचा बळी ठरला होता. त्याच्या आर्थिक जीवनावर अमेरिकेचा एकाधिकार होता.

अमेरिकन राष्ट्राध्यक्ष जॉन एफ. केनेडी यांच्या कारकिर्दीत क्युबा शीतयुद्धाचे महत्त्वपूर्ण केंद्र बनले. इ. स. १९५९ मध्ये क्युबात राज्यक्रांती होऊन फिडेल कॅस्ट्रो हे क्युबाचे अध्यक्ष बनले. त्यांचा समाजवादी व्यवस्थेवर विश्वास होता. ते अमेरिकेचे विरोधक होते. त्यांनी आपल्या देशात समाजवादी व्यवस्था लागू केली. साम्यवादी रशियाबरोबर अधिक जवळीक निर्माण केली.

अमेरिकन राष्ट्राध्यक्ष आयसेनहॉवर यांनी क्यूबाला आर्थिक मदत देऊ केली. परंतु फिडेल कॅस्ट्रो यांनी ती आर्थिक मदत नाकारली. फिडेल कॅस्ट्रोने क्युबातील गरीब व गरजू शेतकऱ्यांना, शेतमजुरांना शेतजमिनी वाटून दिल्या. चे गवेरा या साम्यवादी विचारसरणीच्या क्रांतिकारकास मंत्रिमंडळात समाविष्ट केले. कॅस्ट्रोच्या भांडवलशाहीविरोधी धोरणामुळे त्याला अमेरिकेतून विरोध होऊ लागला. क्युबातील कॅस्ट्रोच्या शासनामुळे अमेरिका खंडात साम्यवादी विचारसरणीची लाट येण्याचा धोका दिसू लागताच अमेरिकन सरकार धास्तावले. इ. स. १९६० च्या सुरुवातीस राष्ट्राध्यक्ष आईसेनहॉवर याने क्युबातून अमेरिकेला होणारी साखरेची निर्यात बंद केली. अमेरिकेच्या या दडपशाही धोरणामुळे कॅस्ट्रो अजिबात डगमगला नाही. त्याने फेब्रुवारी, १९६० मध्ये रशियाशी व्यापारी करार करून अमेरिकेला चोख प्रतिउत्तर दिले. तसेच क्यूबाची राजधानी असलेल्या हवाना येथील अमेरिकन वकिलातीतील कर्मचाऱ्यांची संख्या ३०० वरून ११ वर आणावी, अशी मागणी कॅस्ट्रोने केली. त्या मागणीला अनुसरून अमेरिकन राष्ट्राध्यक्ष आयसेनहॉवर यांनी जानेवारी, १९६१ मध्ये क्यूबाशी असलेले राजनैतिक संबंध तोडले.

क्यूबातील डॉ. फिडेल कॅस्ट्रो यांचे शासन उलटवून पाडण्याचे कट सी. आय. ए. ही अमेरिकेची गुप्तहेर संघटना आखू लागली. अमेरिकेतील धनिक क्युबन नागरिक, कॅस्ट्रोने हद्दपार केलेले लोक आणि क्युबातील कॅस्ट्रोविरोधी नागरिक यांच्याशी सी. आय. ए. ने संपर्क साधला. १५०० क्युबन नागरिकांना ग्वाटेमाला येथे लष्करी प्रशिक्षण दिले गेले. १७ एप्रिल, १९६१ रोजी अमेरिकेने पुरवलेल्या जहाजातून हे १५०० क्युबन बंडखोर क्युबानजीकच्या पिग्ज उपसागरात येऊन पोहोचले. क्युबाच्या लष्कराने हे बंड मोडून काढले. सर्व बंडखोरांना अटक करण्यात आली. त्याचबरोबर क्युबामध्ये दोन लाख संशयीतांना राष्ट्रद्रोहाच्या आरोपाखाली अटक केली गेली. हे बंड फसल्यामुळे अमेरिकेच्या पदरी नामुष्की आली. फिडेल कॅस्ट्रोने संयुक्त

राष्ट्रसंघाच्या महासभेत या बंडामागे अमेरिकेचा हात असल्याचे पुराव्यानिशी सिद्ध केले. त्यामुळे जगात अमेरिकेची नाचक्की झाली. क्यूबाच्या संरक्षणाची निकड कॅस्ट्रोला जाणू लागल्याने त्याने रशियाकडे मदत मागितली. रशियाच्या मदतीमुळे क्यूबाचे सुसज्ज सैन्य उभे राहिले.

सन १९६२ मध्ये रशियाने क्युबामध्ये अण्वस्त्र तळ उभारण्याचा प्रयत्न केला. त्यास अमेरिकेने विरोध केला आणि क्युबा मधून पश्चिम गोलार्धामधील कोणत्याही देशावर क्षेपणास्त्र डागल्यास ते अमेरिकेवर केलेले प्रत्यक्ष आक्रमण समजण्यात येईल, असे जाहीर केले. २२ ऑक्टोबर, १९६२ रोजी अमेरिकन नौदलाने क्युबाची आरमारी नाकेबंदी केली. त्यातून युद्धाला तोंड फुटून तिसरे महायुद्ध घडून येण्याची शक्यता निर्माण झाली. पण ते कोणालाच नको होते. त्यामुळे अमेरिकन राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडीने संयुक्तराष्ट्र संघटनेचे महासचिव ऊ थांट यांना मध्यस्थी करण्याची विनंती केली. त्यांच्या मध्यस्थीमुळे आणि राष्ट्राध्यक्ष केनेडी व रशियन पंतप्रधान कृष्चेव्ह यांच्यातील चर्चेमुळे शेवटी रशियाने आपला क्षेपणास्त्र तळ तेथून हलवण्याचे ठरवले. त्यामुळे हा प्रश्न सुटला.

**क्यूबा आणि शीतयुद्धाचा प्रभाव :**

क्यूबा क्षेपणास्त्र संकट ही शीतयुद्धातील सर्वात गंभीर घटना होती. या संकटामुळे दोन्ही महाशक्तींना समजले की परमाणु युद्धाचे परिणाम विनाशकारी असतील. यामुळे दोन्ही देशांमध्ये शस्त्र नियंत्रण करार करण्याची प्रक्रिया सुरू झाली.

शीतयुद्धाचा क्यूबाच्या इतिहासावर दीर्घकालीन परिणाम झाला आहे. क्यूबाच्या बाबतीत, शीतयुद्धामुळे क्यूबाची अर्थव्यवस्था खराब झाली. अमेरिकेने क्यूबावर व्यापार प्रतिबंध लादले आणि त्यामुळे क्यूबाची अर्थव्यवस्था संघर्ष करू लागली. आजही क्यूबाची अर्थव्यवस्था संघर्ष करत आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न–२**

अ) योग्य पर्याय निवडा.

१. जर्मनीच्या एकीकरणास ............ यांचा पाठिंबा आणि सक्रिय मदत होती.

अ) चर्चिल ब) गोर्बाचेव्ह क) स्टॅलिन ड) ट्रूमन

२. २० जून, १९९१ रोजी ............ ही नव्या जर्मनीची राजधानी बनली.

अ) बर्लिन ब) हॅम्बुर्ग क) म्युझिक ड) फ्रँकफर्ट

३. सन १९६२ मध्ये ............ ने क्युबामध्ये अण्वस्त्र तळ उभारण्याचा प्रयत्न केला.

अ) चीन ब) रशिया क) अमेरिका ड) फ्रान्स

४. जोड्या जुळवून योग्य पर्याय निवडा.

| गट-१ | गट-२ |
|---|---|
| १. पश्चिम जर्मनीची राजधानी | अ) हवाना |
| २. क्युबाची राजधानी | ब) बॉन |
| ३. पूर्व जर्मनीची राजधानी | क) बर्लिन |
| ४. दक्षिण कोरियाची राजधानी | ड) सेऊल |

अ) १-ड, २-ब, ३-अ, ४-क  ब) १-ब, २-अ, ३-क, ४-ड

क) १-ड, २-क, ३-ब, ४-अ  ड) १-अ, २-ब, ३-क, ४-ड

५. खालील विधानांच्या संदर्भात योग्य पर्याय निवडा.

विधान-१ : दुसऱ्या महायुद्धानंतर दक्षिण कोरिया अमेरिकेच्या प्रभावाखाली येऊन तेथे भांडवलशाही व्यवस्था रुजली.

विधान-२ : दुसऱ्या महायुद्धानंतर उत्तर कोरिया कम्युनिस्ट राज्यव्यवस्थेखाली येऊन त्यावर साम्यवादी रशियाचा प्रभाव वाढू लागला.

अ) विधान एक सत्य/योग्य तर विधान दोन असत्य/अयोग्य आहे.

ब) विधान एक असत्य/अयोग्य तर विधान दोन सत्य/योग्य आहे.

क) दोन्ही विधाने सत्य/योग्य आहेत.

ड) दोन्ही विधाने असत्य/अयोग्य आहेत.

## १.२.३ विभाग ३ : शीतयुद्धाचा अंत

शीतयुद्धामुळे जगामध्ये भीतीचे, दहशतीचे वातावरण निर्माण झाले. प्रत्येक क्षेत्रात दोन्ही गटांनी एकमेकांची नाकेबंदी करण्याचा कसोशीने प्रयत्न केला. या काळात शस्त्रास्त्र स्पर्धेला व अण्वस्त्र स्पर्धेला प्रचंड प्रोत्साहन मिळाले. संयुक्त राष्ट्रसंघाचे खच्चीकरण झाले. अणुयुद्धाची शक्यता मोठ्या प्रमाणात वाढली आणि राष्ट्राराष्ट्रांमधील लष्करी करारांच्या संख्येत मोठी वाढ झाली.

मार्च, १९५३ मध्ये रशियाचा सर्वेसर्वा स्टॅलिन याचे निधन झाले. त्यामुळे रशियाच्या धोरणातील ताठरपणा कमी होऊ लागला. आंतरराष्ट्रीय राजकारणातील तणाव नाहीसा व्हावा आणि अमेरिकेसोबत प्रत्यक्ष युद्ध होऊ नये, असे मालेंकोव्ह, बुल्गानीन, निकिता कृश्चेव्ह या रशियन नेत्यांना वाटत होते. इ. स. १९७० नंतर अमेरिका आणि रशिया यांच्यातील संबंधांमध्ये सुधारणा झाली. धमक्या, इशारे, संघर्ष यांची जागा परस्परांच्या देशांना भेटी देणे, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि व्यापारी करारांनी घेतली. १९८० च्या दशकात मात्र या प्रयत्नांना धक्का बसला दोन्ही देशांमध्ये पुन्हा विविध कारणांनी अविश्वासाचे, तणावाचे वातावरण निर्माण झाले. इ. स. १९८५ नंतर पुन्हा परिस्थिती बदलत गेली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रेगन व रशियाचे राष्ट्राध्यक्ष मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी सामंजस्याची भूमिका घेत शीतयुद्ध संपुष्टात आणले.

इ. स. १९८९ नंतर पूर्व युरोपीय देशांमधील साम्यवादी सत्ता संपुष्टात आल्या. रशियामध्ये गंभीर आर्थिक व राजकीय पेचप्रसंग निर्माण झाले. त्यामुळे ३१ डिसेंबर, १९९१ रोजी साम्यवादी रशियाचे अधिकृतरित्या विघटन झाले. रशियन राष्ट्राध्यक्ष मिखाईल गोर्बाचेव्ह यांची धोरणे आणि दोन्ही महासत्तांच्या दृष्टिकोनातील बदल या कारणांमुळे शीतयुद्ध संपुष्टात आले.

**अ. शीतयुद्धाच्या समाप्तीमधील महत्त्वाच्या घटना :**

१. नोव्हेंबर, १९८५ मध्ये जिनिव्हा येथे झालेल्या चर्चेमध्ये दोन्ही महासत्तांनी शस्त्रास्त्र कपात, अण्वस्त्र कपात, सांस्कृतिक, शैक्षणिक, वैज्ञानिक व आर्थिक देवाण-घेवाण यासाठी मान्यता दिली.

२. सप्टेंबर, १९८७ मध्ये अमेरिका आणि रशिया यांच्यात संरक्षण दृष्ट्या महत्त्वाच्या माहितीची देवाण-घेवाण करण्याचे मान्य करण्यात आले होते.

३. डिसेंबर १९८७ मध्ये अमेरिका व रशियाने आय. एन. एफ. आर. करारावर स्वाक्षऱ्या केल्या. त्याद्वारे मध्यम व दूर पल्ल्याची क्षेपणास्त्रे नष्ट करण्याचे मान्य करण्यात आले.

४. जून, १९८८ मध्ये मास्को येथे रेगन व गोर्बाचेव्ह यांच्यात एक परिषद संपन्न झाली. त्यामध्ये भूगर्भातील अणुचाचण्यांची संयुक्त तपासणी, आंतरखंडीय क्षेपणास्त्रांच्या उपयोगाबद्दल माहितीची देवाणघेवाण व सांस्कृतिक सहकार्य वाढवण्याचे मान्य करण्यात आले.

५. डिसेंबर, १९८८ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्वसाधारण सभेत पूर्व युरोपातील देशांमधून पाच लाख सैनिक काढून घेण्याची व पारंपारिक शास्त्रास्त्रांमध्ये कपात करण्याची घोषणा गोर्बाचेव्ह यांनी केली.

६. डिसेंबर, १९८९ मध्ये रशियन परराष्ट्र मंत्र्यांनी युरोपियन आर्थिक समुदायांबरोबर व्यापारात वाढ करण्याच्या दहा वर्षे मुदतीचा करार केला.

७. ९ नोव्हेंबर, १९८९रोजी बर्लिनची भिंत पाडण्यात आली. त्यामुळे दोन्ही जर्मनींचे एकीकरण सोपे झाले. ३ ऑक्टोबर, १९९० रोजी ४५ वर्षानंतर पूर्व व पश्चिम जर्मनीचे एकीकरण पूर्ण झाले.

८. ५ व ६ जुलै, १९९० रोजी लंडन येथे भरलेल्या नाटो राष्ट्रांच्या शिखर परिषदेत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश यांनी शीतयुद्ध संपल्याची घोषणा केली.

९. १९ नोव्हेंबर, १९९० रोजी पॅरिस येथे नाटो व वॉर्सा करार संघटनांच्या सदस्य-देशांच्या उपप्रमुखांनी एका ऐतिहासिक करारावर सह्या करून पारंपारिक शस्त्रास्त्रांवर मर्यादा घालण्यास संमती दिली.

१०. १ जुलै, १९९१ रोजी रशियाने वॉर्सा करार संपुष्टात आल्याची घोषणा केली.

११. ३१ जुलै, १९९१ रोजी मास्को येथे बुश आणि गोर्बाचेव्ह यांनी 'स्टार्ट' करारावर स्वाक्षऱ्या करून आपापल्या अण्वस्त्रांच्या साठ्यांमध्ये ३० टक्के कपात करत असल्याची घोषणा केली.

वरील घटनांबरोबरच अमेरिका आणि रशिया यांच्या दृष्टिकोनात झालेला फरक हेही शीतयुद्ध समाप्त होण्याचे एक महत्त्वाचे कारण होते. अशा रीतीने दुसऱ्या महायुद्धानंतर ४५ वर्षे सुरू असलेले शीतयुद्ध संपुष्टात आले.

**ब. शीतयुद्धाचे परिणाम :**

शीतयुद्धामुळे जागतिक राजकारणावर फार दूरगामी परिणाम घडवून आले. ते पुढीलप्रमाणे :

१. शीतयुद्धामुळे जगाचे द्वि – ध्रुवीकरण झाले.

२. शीतयुद्धामुळे सतत युद्धाची तांगती तलवार राहिली. त्यामुळे शांततेने जीवन जगण्याचे स्वप्न धुळीस मिळाले.

३. शीतयुद्धामुळे तिसरे महायुद्ध केव्हाही उद्भवू शकते असे परिस्थिती निर्माण केली गेली.परिणामी संपूर्ण जगावरील महायुद्धाचे रंग गडद झाले.

४. परस्पर संशयाच्या, द्वेषाच्या वातावरणामुळे अनेक राष्ट्रांनी एकमेकांशी स्वसंरक्षणविषय अनेक लष्करी करार केले. नाटो, सीटो, सेन्टो, वॉर्सा ही त्याची उदाहरणे आहेत. दोन्ही परस्परविरोधी गटांनी जगातल्या बहुतांशी राष्ट्रांना या करारांच्या साखळीत ओढून घेतले. कित्येक राष्ट्रांनी त्यापासून वेगळे राहत तटस्थ राष्ट्रांचा एक गट निर्माण केला. या करारांमुळे अनेक प्रदेशांना युद्धभूमीचे स्वरूप प्राप्त झाले.

५. शीतयुद्धामुळे दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेली संयुक्त राष्ट्र संघटना कुचकामी ठरली. दोन्ही गटांचे एकमेकांबद्दल असणारे गैरसमज दूर करण्यातच संयुक्त राष्ट्रसंघटनेची शक्ती खर्ची पडू लागली.

६. दोन महासत्तांमध्ये सुरू झालेल्या या संघर्षातून जीवघेणी शस्त्रास्त्र स्पर्धा सुरू झाली. दुसऱ्या गटातील देशांजवळ असणाऱ्या शस्त्रास्त्रांपेक्षा आपल्या जवळील शस्त्रास्त्रे जास्त मारक व परिणामकारक असली पाहिजेत, अशा स्पर्धेला प्रारंभ झाला. या शस्त्रास्त्र स्पर्धेचे पर्यवसन तिसऱ्या महायुद्धात होऊन जगाचा सर्वनाश तर होणार नाही ना या धास्तीमुळे सर्वसामान्य जनता जीव मुठीत घेऊन जगत होती.

७. शस्त्र निर्मितीवर होणारा प्रचंड खर्च त्या राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम करत होता. त्यामुळे आपल्या राष्ट्रातील गंभीर समस्यांना तोंड देऊन प्रगती साधने त्यांना कठीण जात होते.

८. शस्त्रास्त्रांवर केल्या जाणाऱ्या खर्चातून अनेक देशांमध्ये विविध विकासाची कामे करता आली असती. पण ती न झाल्याने सर्वसामान्य जनतेचे प्रचंड नुकसान झाले.

९. शीतयुद्धामुळे विज्ञान हे शांततेसाठी नसून विनाशासाठी आहे यावर जगाचा विश्वास बसू लागला. अणूचा उपयोग विध्वंस निर्माण करण्यासाठी होऊ लागला.

१०. शीतयुद्धामुळे असंलग्नतावादी राष्ट्रांचा म्हणजेच तिसऱ्या जगाचा उदय झाला. आशिया व आफ्रिका खंडातील देशांनी अमेरिका किंवा रशिया या कुठल्याच गटात सामील न होण्याचे ठरविले.

११. भारत, इजिप्त, यूगोस्लाव्हिया या देशांच्या पं. जवाहरलाल नेहरू, नासर व मार्शल जोसेफ टिटो या नेत्यांनी अमेरिका व साम्यवादी रशिया या दोन्ही महासत्तांच्या कह्यात न जाता अलिप्त राहून राष्ट्रविकास घडवून आणण्याच्या धोरणावर भर दिला. त्यासाठी सन १९५५ पासून अलिप्त राष्ट्रांची संघटना (Non-aligned Nations Group) उभारली.

१२. आंतरराष्ट्रीय राजकारणात अलिप्ततावादी चळवळीचा जन्म झाला. सन १९७६ च्या कोलंबो येथील शिखर परिषदेत अलिप्ततावादास जागतिक पाठिंबा मिळाला. या चळवळीने शीतयुद्धाचे वातावरण सौम्य करण्याचा सातत्याने प्रयत्न केला. दोन महासत्तांच्या धोरणावर काही प्रमाणात दबाव आणण्याचे कार्य या चळवळीने केले.

**स्वयं अध्ययन प्रश्न–३**

अ) योग्य पर्याय निवडा.

१. डिसेंबर............मध्ये अमेरिका व रशियाने आय. एन. एफ. आर. करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

अ) १९८६ ब) १९८७ क) १९८८ ड) १९८९

२. १ जुलै, १९९१ रोजी ............या देशाने 'वॉर्सा करार' संपुष्टात आल्याची घोषणा केली.

अ) अमेरिका ब) चीन क) जर्मनी ड) रशिया

३. ३१ जुलै, १९९१ रोजी ............ येथे बुश आणि गोर्बाचेव्ह यांनी 'स्टार्ट' करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

अ) सेंट पीटर्सबर्ग ब) मास्को क) कझान ड) व्लादिमीर

४. जोड्या जुळवून योग्य पर्याय निवडा.

| गट–१ | गट–२ |
|---|---|
| १. आय. एफ. एन. करार | अ) नोव्हेंबर १९८९ |
| २. जर्मनीचे एकीकरण | ब) अमेरिका व रशिया |
| ३. शीतयुद्ध समाप्तीची घोषणा | क) जुलै १९९० |
| ४. अलिप्त राष्ट्रांची संघटना | ड) सन १९५५ |

अ) १–ड, २–ब, ३–अ, ४–क ब) १–ब, २–अ, ३–क, ४–ड

क) १–ड, २–क, ३–ब, ४–अ ड) १–अ, २–ब, ३–क, ४–ड

५. खालील विधानांच्या संदर्भात योग्य पर्याय निवडा.

विधान–१ : भारत, इजिप्त, यूगोस्लाव्हिया या देशांनी अमेरिका व साम्यवादी रशिया या दोन्ही महासत्तांच्या कह्यात न जाता अलिप्त राहून राष्ट्रविकास घडवून आणण्याच्या धोरणावर भर दिला.

विधान-२ : अलिप्ततावादी चळवळीने शीतयुद्धाचे वातावरण सौम्य करण्याचा सातत्याने प्रयत्न केला.

अ) विधान एक सत्य/योग्य तर विधान दोन असत्य/अयोग्य आहे.

ब) विधान एक असत्य/अयोग्य तर विधान दोन सत्य/योग्य आहे.

क) दोन्ही विधाने सत्य/योग्य आहेत.

ड) दोन्ही विधाने असत्य/अयोग्य आहेत.

## १.३ सारांश

शीतयुद्ध हा द्वितीय महायुद्धानंतर सुरू झालेला अमेरिका आणि साम्यवादी रशिया यांच्यातील तणावपूर्ण काळ होता. या काळात प्रत्यक्ष युद्ध न होता, दोन्ही महासत्तांमध्ये राजकीय, आर्थिक आणि वैचारिक स्पर्धा होती. भांडवलशाही विरुद्ध साम्यवाद अशी ही वैचारिक लढाई होती तशीच जागतिक प्रभुत्वाचीही स्पर्धा होती. या काळात नाटो, वॉर्सा करार यांसारखे सुरक्षा करार झाले.

शीतयुद्धादरम्यान अनेक देशांमध्ये संघर्ष उद्भवले. जर्मनीचे पूर्व आणि पश्चिम असे विभाजन झाले. कोरिया युद्धात उत्तर आणि दक्षिण कोरिया यांच्यात संघर्ष झाला. क्युबन क्षेपणास्त्र संकट हे शीतयुद्धातील एक महत्त्वाचे प्रकरण होते.

१९८०च्या दशकाच्या अखेरीस शीतयुद्धाचा अंत होऊ लागला. बर्लिनची भिंत पडणे, साम्यवादी रशियाचे विघटन, पूर्व युरोपीय देशांमध्ये लोकशाही क्रांती या महत्त्वाच्या घटना घडल्या. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर जागतिक राजकारणात मोठे बदल झाले. अमेरिकेचे वर्चस्व वाढले आणि एकध्रुवीय जगव्यवस्था अस्तित्वात आली.

## १.४ पारिभाषिक शब्द

- **शीतयुद्ध** - प्रत्यक्ष युद्ध न होता दोन परस्पर विरुद्ध विचारसरणी असलेल्या गटांमध्ये युद्धसदृश्य परिस्थिती निर्माण होणे.
- **भांडवलशाही** - मुक्त बाजार अर्थव्यवस्था
- **साम्यवाद** - समाजवाद (काही प्रमाणात)
- **मार्क्सवाद** - कार्ल मार्क्सचा सिद्धांत
- **अलिप्ततावाद** - तटस्थतावाद

## १.५ स्वयं - अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

स्वयं अध्ययन प्रश्न - १

अ) १. ड) बर्नार्ड बरूच २. ब) राष्ट्र राष्ट्रांमधील युद्धजन्य परिस्थिती

३. अ) साम्यवादी आणि भांडवलशाही

४. क) १-ड, २-ब, ३-क, ४-अ

५. क) दोन्ही विधाने सत्य/योग्य आहेत.

स्वयं अध्ययन प्रश्न - २

अ) १. ब) गोर्बाचेव्ह २. अ) बर्लिन ३. क) उत्तर

४. ब) १-ब, २-अ, ३-क, ४-ड

५. अ) दोन्ही विधाने सत्य/योग्य आहेत.

स्वयं अध्ययन प्रश्न - ३

अ) १. ब) १९८७ २. ड) रशिया ३. ब) मास्को

४. ब) १-ब, २-अ, ३-क, ३-ड

५. क) दोन्ही विधाने सत्य/योग्य आहेत.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय :

अ) टीपा लिहा.

१. नाटो करार

२. बर्लिनची भिंत

३. फिडेल कॅस्ट्रो

४. कोरियन समस्या

ब) थोडक्यात उत्तरे लिहा.

१. शीतयुद्धाच्या व्याख्या विशद करा.

२. सेन्टो कराराची माहिती लिहा.

३. जर्मनीचे एकीकरण कसे झाले ते स्पष्ट करा.

४. अलिप्ततावादी चळवळीचे महत्त्व स्पष्ट करा.

क) सविस्तर उत्तरे लिहा.

१. दुसऱ्या महायुद्धानंतर शीतयुद्ध निर्माण होण्याची पार्श्वभूमी विशद करा.

२. शीतयुद्धाच्या संघर्षात जर्मनीच्या विभाजनाचा कसा हातभार लागला?

३. शीतयुद्धामुळे क्यूबात निर्माण झालेली क्रांती स्पष्ट करा.

४. शीतयुद्धाच्या समाप्तीतील महत्त्वाच्या घटना स्पष्ट करा.

५. शीतयुद्धाचे परिणाम स्पष्ट करा.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ :

मराठी

१. डॉ.आठल्ये विभा, आधुनिक जगाचा इतिहास, संजय ठाकरे सर साहित्य केंद्र, नागपूर, प्रथम आवृत्ती २०१०

२. कदम य.ना., द्वितीय महायुद्धानंतरचे जग (१९४७ ते १९९७), श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९७

३. डॉ. आचार्य धनंजय, विसाव्या शतकातील जग, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, दुसरी आवृत्ती - १२ एप्रिल, २०११

४. काळे अनिल (अनु.), आधुनिक जगाचा इतिहास (१५०० - २०००), के'सागर पब्लिकेशन, पुणे, पहिली आवृत्ती : २६ जाने., २००६

५. डॉ. कोलारकर श. गो., आधुनिक जगाचा इतिहास (इ. स. १८७१-१९६५), श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, सहावी आवृत्ती, २६ जानेवारी, २००५

हिंदी

१. कुमार विनायक, आधुनिक विश्व का इतिहास, कुमार प्रकाशन, न्यू दिल्ली, २०१५

२. लोचन राजीव, विश्व इतिहास के आधार, राजकमल प्रकाशन, न्यू दिल्ली, २०१२

३. हरि शंकर, आधुनिक युग का इतिहास, आई.आई.टी. प्रकाशन,न्यू दिल्ली, २००८

४. कृष्ण कुमार, विश्व का इतिहास, नॅशनल पब्लिशिंग हाऊस, न्यू दिल्ली, २०१०

English

1. Chhabra H.K., History of Modern World Since 1914, Surjit Publication, Delhi, 2003

2. Chandra Satish, The Modern World, Har Anand Publications, New Delhi, 2006

3. Dev Arjun, World History since 1945, Vikas Publishing House, New Delhi, 2011

❑❑❑

# घटक २
# निर्वसाहतीकरण आणि नवीन राष्ट्रांचा उदय

**अनुक्रमणिका**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

२.२.१ द्वितीय विश्वयुद्धानंतरचे निर्वसाहतीकरण - आफ्रिका आणि आशिया

२.२.२ आफ्रिकेतील चळवळी आणि नेते - गमाल अब्दुल नासेर (इजिप्त), नेल्सन मंडेला (दक्षिण आफ्रिका)

२.२.३ आशियातील चळवळी आणि नेते- हो ची मिन्ह (व्हिएतनाम), आंग सान स्यू की (बर्मा)

२.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

२.४ स्वयं अध्ययन प्रश्न आणि उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

## २.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास -

- दुसऱ्या महायुद्धानंतर घडून आलेल्या निर्वसाहतीकरणाबद्दल माहिती जाणून घेता येईल.
- दुसऱ्या महायुद्धानंतर आशिया खंडात घडून आलेल्या विविध चळवळींतील प्रमुख नेत्यांविषयी सविस्तर माहिती जाणून घेता येईल.
- दुसऱ्या महायुद्धानंतर आफ्रिका खंडात घडून आलेल्या विविध चळवळींतील प्रमुख नेत्यांविषयी सविस्तर माहिती जाणून घेता येईल.
- आशिया व आफ्रिका खंडातील चळवळीमधील प्रमुख नेत्यांच्या योगदानामुळे घडून आलेले बदल अभ्यासता येतील.

## २.१ प्रस्तावना

वसाहतवादातून मुक्त होऊन नव्या राष्ट्रांची स्थापना म्हणजेच निर्वसाहतीकरण होय. दुसऱ्या महायुद्धानंतर जगभरात मोठे राजकीय बदल झाले. अमेरिका आणि रशिया यांनी निर्वसाहतीकरणासाठी दबाव टाकायला सुरुवात केली. युरोपीयन राष्ट्रे कमजोर झाली आणि राष्ट्रवादी चळवळी बळकट झाल्या. संयुक्त राष्ट्रांसारख्या संस्थांनी स्व-शासनाला प्रोत्साहन दिले. आफ्रिकेत इजिप्तचे गमाल अब्दुल नासेर आणि दक्षिण आफ्रिकेत नेल्सन मंडेला यांनी वसाहतवादी शक्तींविरोधात नेतृत्व केले आणि आपल्या लोकांना स्वातंत्र्यासाठी प्रेरित केले. आशियात व्हिएतनामचे हो ची मिन्ह आणि बर्माच्या आंग सान स्यू की यांनी राष्ट्रीय सार्वभौमत्व व लोकशाही स्वराज्यासाठी महत्त्वाचे योगदान दिले. यामुळे आशिया, आफ्रिका, आणि लॅटिन अमेरिकेतील अनेक देशांनी स्वातंत्र्यासाठी लढा दिला. ब्रिटन, फ्रान्स, पोर्तुगाल, स्पेन यांसारख्या युरोपीय देशांनी शतकानुशतके अनेक देशांवर सत्ता गाजवली होती.

या संघर्षात भारत, घाना, नायजेरिया, अल्जेरिया, व्हिएतनाम यांसारख्या देशांनी मोठे योगदान दिले. विविध समाजसुधारक, नेते आणि क्रांतिकारकांच्या प्रयत्नांमुळे वसाहती देशांत स्वातंत्र्य चळवळी उभ्या राहिल्या. महात्मा गांधी, क्वामे एन्क्रुमा, नेल्सन मंडेला यांसारख्या नेत्यांनी अहिंसात्मक पद्धतीने संघर्ष केला.

स्वातंत्र्यानंतरही या नव्या राष्ट्रांसमोर अनेक आव्हाने होती. त्यांना आपली स्वतंत्र ओळख तयार करायची होती आणि शासकीय व्यवस्थेत सुधारणा करायच्या होत्या. त्यांच्या पुढे राजकीय स्थैर्य, आर्थिक प्रगती, आणि सामाजिक समता या समस्याही होत्या. परंतु, या देशांनी आपल्या विकासासाठी प्रयत्न करून आंतरराष्ट्रीय पातळीवर आपली ओळख निर्माण केली.

थोडक्यात वसाहतवाद्यांचे वसाहतींवरील वर्चस्व संपुष्टात येणे आणि त्यांनी वसाहतींमधील स्थानिक लोकांच्या हाती सत्ता सुपूर्त करणे म्हणजे निर्वसाहतीकरण होय. निर्वसाहतीकरण ही प्रक्रिया म्हणजे स्वातंत्र्याची लढाई आणि नव्या राष्ट्रांचा उगम होय.वसाहतवादाला विरोध, स्वातंत्र्यालढा आणि वसाहतींना मिळालेले स्वातंत्र्य हे निर्वसाहतीकरणाचे तीन टप्पे आहेत.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ द्वितीय विश्वयुद्धानंतरचे निर्वसाहतीकरण – आफ्रिका आणि आशिया :

#### २.२.१.१. आफ्रिकेतील निर्वसाहतीकरण:

द्वितीय महायुद्धानंतर आफ्रिकेतील वसाहतवाद समाप्त होणे ही घटना महत्त्वपूर्ण होती. तीने आफ्रिका खंडाच्या राजकीय परिस्थितीत मोठा बदल घडवून आणला. सन १९४५ मध्ये दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर जागतिक राजकीय वातावरण बदलले आणि युरोपीय वसाहतवादी साम्राज्यांची सत्ता वेगाने कमी झाली. आफ्रिकन राष्ट्रांनी स्वातंत्र्याच्या हक्कासाठी संघर्ष करायला सुरुवात केली. त्यामुळे पुढील काही दशकांत वसाहतवादाचा अंत झाला.

**दुसऱ्या महायुद्धाचा वसाहतवादावर प्रभाव:**

दुसऱ्या महायुद्धाचा आफ्रिकन खंडावर खोलवर परिणाम झाला. हजारो आफ्रिकन नागरिकांनी ब्रिटन आणि फ्रान्ससारख्या युरोपीयन शक्तीशाली राष्ट्रांसाठी युद्धात भाग घेतला. या अनुभवामुळे अनेकांना लोकशाही, स्वातंत्र्य आणि राष्ट्रवाद यासारख्या नवीन राजकीय कल्पनांचा परिचय झाला. या कल्पनांनी त्यांना आपल्या देशांमध्ये स्वातंत्र्यासाठी प्रेरित केले. याचबरोबर, या युद्धानंतर युरोपीय राष्ट्रे आर्थिकदृष्ट्या कमजोर झाली, ज्यामुळे त्यांना वसाहतीचा ताबा राखणे अवघड झाले.

सन १९४५ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना झाली. या घटनेचा वसाहतवादाच्या समाप्तीवर मोठा प्रभाव पडला. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेनुसार सर्व लोकांना स्व-निर्णयाचा अधिकार देण्याची शिफारस केली होती. यामुळे आफ्रिकन राष्ट्रवादी नेत्यांमध्ये जागरुकता निर्माण झाली. आंतरराष्ट्रीय दबाव आणि स्थानिक स्तरावरील स्वातंत्र्याच्या मागण्यांमुळे वसाहतवादी शक्तींना आपल्या सत्तेबद्दल पुनर्विचार करावा लागला.

**आफ्रिकेत राष्ट्रवादाचा उदय:**

२० व्या शतकाच्या सुरुवातीपासूनच आफ्रिकेत राष्ट्रवादी चळवळींचा उदय होऊ लागला. दुसऱ्या महायुद्धानंतर या चळवळींनी जोर पकडला. आफ्रिकन नेते, विद्वान आणि कार्यकर्ते, राजकीय पक्ष, कामगार संघटना, आणि सामाजिक चळवळी इत्यादींना संघटित करू लागले. त्यांनी वसाहतवादाच्या विरोधात आवाज उठवला आणि स्वातंत्र्याची मागणी केली. अनेक नेते युरोपियन विद्यापीठांमध्ये शिकले होते. तिथे त्यांना राष्ट्रवाद, समाजवाद, आणि स्वशासनाच्या कल्पना समजल्या.

पश्चिम आफ्रिकेत, **क्वामे एनक्रुमा** हे सर्वात प्रमुख राष्ट्रवादी नेते म्हणून उदयास आले. त्यांनी घानाला (गोल्ड कोस्ट) सन १९५७ मध्ये स्वातंत्र्य मिळवून दिले. घाना आफ्रिकेत स्वातंत्र्य मिळवणारे पहिले राष्ट्र होते. एनक्रुम यांच्या यशामुळे इतर आफ्रिकन नेत्यांनाही स्वातंत्र्यासाठी संघर्ष करण्याची प्रेरणा मिळाली. **जोमो केन्याटा** (केनिया), **लियोपोल्ड सेदार सेंगेर** (सेनेगल), आणि **जुलियस नायरेरे** (टांझानिया) हे प्रमुख नेते होते. त्यांनी आपापल्या देशांना स्वातंत्र्य मिळवून दिले.

स्वातंत्र्याचा मार्ग नेहमीच शांततामय नव्हता. काही वेळा साम्राज्यवादी शक्तींनी आपले प्रदेश सोडण्यास नकार दिला. त्यामुळे हिंसक संघर्ष झाले. उदाहरणार्थ, **अल्जेरियामध्ये**, सन १९५४ ते १९६२ यादरम्यान फ्रेंच साम्राज्याविरुद्ध मोठे स्वातंत्र्ययुद्ध लढले गेले. त्याचप्रमाणे, **केनियामध्ये**, सन १९५२ ते १९६० या काळात ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध **माऊ माऊ उठाव** झाला. या संघर्षांनंतर, सन १९५० आणि १९६० च्या दशकात अनेक आफ्रिकन देशांनी स्वातंत्र्य मिळवले.

**आफ्रिकेतील निर्वसाहतीकरणास कारणीभूत प्रमुख घटक:**

**१. दुसऱ्या महायुद्धाचा प्रभाव:** या महायुद्धामुळे युरोपीय वसाहतवादी शक्ती आर्थिक आणि लष्करीदृष्ट्या कमकुवत झाल्या. वसाहतींवर नियंत्रण ठेवण्याची त्यांची क्षमता कमी झाली.

**२. राष्ट्रवादाचा उदय:** आफ्रिकन नेते आणि चळवळींनी स्थानिक परिस्थिती आणि जागतिक वसाहतविरोधी भावना या दोन्हींमुळे प्रेरित होऊन स्वातंत्र्यासाठी प्रयत्न केले.

**३. आंतरराष्ट्रीय दबाव:** युनायटेड नेशन्स व युनायटेड स्टेट्स आणि सोव्हिएत युनियन सारख्या उदयोन्मुख महासत्तांनी व्यापक साम्राज्यवादी विरोधी धोरणांचा भाग म्हणून निर्वसाहतीकरणाचा पुरस्कार केला.

**४. पॅन-आफ्रिकनवाद:** पॅन-आफ्रिकन चळवळीने आफ्रिकन राष्ट्रे आणि लोकांमध्ये एकता वाढवली. एक संयुक्त आणि स्वतंत्र आफ्रिकेच्या कल्पनेला चालना दिली.

**प्रमुख देश आणि नेते:**

- **घाना (१९५७):** घाना हे ब्रिटनपासून स्वातंत्र्य मिळवणारे पहिले आफ्रिकन राष्ट्र होते. क्वामे एनक्रुमा हे बृहत-आफ्रिकन चळवळीतील एक प्रमुख नेते होते. ते घानाचे पहिले पंतप्रधान आणि नंतर राष्ट्रपती झाले. एनक्रुमाच्या एकसंध आणि स्वतंत्र आफ्रिकेच्या दृष्टिकोनामुळे राष्ट्रवादी चळवळींना प्रेरणा मिळाली.
- **केनिया (१९६३):** ब्रिटिश राजवटीविरुद्ध झालेल्या दीर्घकाळाच्या आणि हिंसक संघर्षानंतर केनियाला सन १९६३ मध्ये स्वातंत्र्य मिळाले. जोमो केन्याटा हे केनियाचे पहिले राष्ट्रपती झाले.त्यांनी देशाच्या सुरुवातीच्या विकासात मोठी भूमिका बजावली.
- **अल्जेरिया (१९६२):** अल्जेरियातील स्वातंत्र्ययुद्ध हे आफ्रिकेच्या वसाहतवादाविरोधाच्या इतिहासातील सर्वात रक्तरंजित संघर्षांपैकी एक होते. राष्ट्रीय मुक्तता मोर्चाने (FLN) फ्रेंच राजवटीविरुद्ध मोठा लढा दिला. त्यात दोन्ही बाजूंची मोठी जीवितहानी झाली. पण अखेरीस अल्जेरियाने सन १९६२ मध्ये स्वातंत्र्य मिळवले.
- **काँगो (१९६०):** काँगोला बेल्जियमपासून सन १९६० मध्ये स्वातंत्र्य मिळाले. या देशाची स्वातंत्र्यानंतरची सुरुवातीची काही वर्षे राजकीय अस्थिरता आणि हिंसाचाराने भरलेली होती. पॅट्रिस लुमुंबा, देशाचे पहिले पंतप्रधान झाले. ते स्वातंत्र्याच्या लढाईतील प्रमुख नेते होते. पण सन १९६१ मध्ये त्यांची हत्या झाली. त्यामुळे काँगोमध्ये अनेक दशकांपर्यंत गृहसंघर्ष चालू राहिला.
- **टांझानिया (१९६१):** जुलियस नायरेरे यांनी टांझानियाला ब्रिटनपासून स्वातंत्र्य मिळवून दिले. नायरेरे यांनी आफ्रिकन समाजवाद आणि आत्मनिर्भरतेचा प्रचार केला. ते आफ्रिकन राजकारणातील एक प्रमुख नेते बनले.

**स्वातंत्र्यानंतरच्या आव्हानांचा सामना:**

स्वातंत्र्य चळवळींनी आफ्रिकन देशांना राजकीय स्वातंत्र्य मिळवून दिले. पण नवीन स्वतंत्र राष्ट्रांसमोर अनेक आव्हाने उभी राहिली. अनेक देशांत कमजोर अर्थव्यवस्था, प्रशासकीय संरचना आणि मर्यादित

राजकीय अनुभवाचा अभाव होता. साम्राज्यवादी सत्तांनी आखलेल्या सीमा अनेकदा जातीय, भाषिक आणि सांस्कृतिक विभाजनांचे भान न ठेवता आखल्या गेल्या होत्या. त्यामुळे देशांतर्गत संघर्ष झाले.

आर्थिक विविधतेचा अभाव हा एक मोठा मुद्दा होता. अनेक आफ्रिकन अर्थव्यवस्था मुख्यत्वे एकाच उत्पादनावर अवलंबून होत्या, जसे की कोको, कॉफी, किंवा खनिजे इत्यादी.त्यामुळे जागतिक बाजारपेठेतील चढउतारांचा त्यांच्यावर मोठा परिणाम झाला. याशिवाय, या देशांतील शिक्षण आणि आरोग्य व्यवस्था खराब अवस्थेत होत्या. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर त्यांचा विकास खुंटला.

राजकीय अस्थिरता हा अनेक नव्याने स्वतंत्र झालेल्या आफ्रिकन देशांना शाप ठरला. सत्तेसाठीच्या संघर्षामुळे लष्करी उठाव, गृहयुद्धे आणि हुकूमशाही राजवटी उदयास आल्या. उदाहरणार्थ, नायजेरियामध्ये सन १९६० मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अनेक लष्करी उठाव झाले. काँगोमध्ये पॅट्रिस लुमुंबाच्या हत्येनंतर वर्षानुवर्षे संघर्ष सुरू राहिला. शीतयुद्धाने ही परिस्थिती अधिकच गुंतागुंतीची केली. अमेरिका आणि सोव्हिएत संघ आफ्रिकन राष्ट्रांमधील सरकारांना आपला प्रभावाखाली आणण्याचा प्रयत्न करत होते.

**साम्राज्यवादाच्या समाप्तीचा वारसा:**

आफ्रिकेत दुसऱ्या महायुद्धानंतरचे निर्वसाहतीकरण म्हणजे सन १९४० आणि १९७० च्या दशकाच्या मध्यातील कालखंड आहे. यादरम्यान अनेक आफ्रिकन देशांना युरोपियन वसाहतवादी शक्तींपासून स्वातंत्र्य मिळाले. हा काळ विविध घटकांद्वारे चालविलेल्या महत्त्वपूर्ण राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनांमुळे ओळखला जातो. आफ्रिकेत वाढलेली राष्ट्रवादी चळवळ, आंतरराष्ट्रीय दबाव आणि बदलती जागतिक परिस्थिती यांचा हा परिणाम आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर आफ्रिकेत सन १९४० ते १९७० या काळात निर्वसाहतीकरण झाले. या काळात अनेक आफ्रिकन देशांनी युरोपियन वसाहतवादातून स्वातंत्र्य मिळवले. हा काळ महत्त्वपूर्ण बदलांनी भरलेला होता. राजकीय, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रांत मोठे परिवर्तन झाले. वाढत्या राष्ट्रवादी चळवळींनी या प्रक्रियेला गती दिली. आंतरराष्ट्रीय दबाव आणि बदलत्या जागतिक परिस्थितीमुळेही निर्वसाहतीकरण घडले. अशा विविध घटकांमुळे आफ्रिकन देशांनी स्वातंत्र्य मिळवण्याचा हा एक मोठा टप्पा ठरला.

**आफ्रिकेतील काही निवडक देशांच्या स्वातंत्र्य तारखा:**

१. घाना : ६ मार्च, १९५७

२. अल्जेरिया : ५ जुलै, १९६२

३. केनिया : १२ डिसेंबर, १९६३

४. काँगो : ३० जून, १९६०

५. नायजेरिया : १ ऑक्टोबर, १९६०

६. टांझानिया : ९ डिसेंबर, १९६१ (टांगानिका), २६ एप्रिल, १९६४ (झांझिबारचे संघटन)

**आंतरराष्ट्रीय प्रभाव आणि समर्थन:**

**१. युनायटेड नेशन्स:** संयुक्त राष्ट्रसंघाने (UN) निर्वसाहतीकरणाचे समर्थन करण्यात आणि नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांचे समर्थन करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

**२. शीतयुद्धाचा परिणाम:** अमेरिका आणि सोव्हिएत युनियन या दोघांनीही आफ्रिकन राष्ट्रांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या व्यापक भू-राजकीय धोरणांचा भाग म्हणून विविध चळवळी आणि सरकारांना त्यांनी पाठिंबा दिला.

**३. अलिप्ततावादी चळवळ:** अनेक आफ्रिकन राष्ट्रे शीतयुद्धातील शक्ती गटांपासून अलिप्त राहण्यासाठी अलिप्ततावादी चळवळीत सामील झाली.

**दीर्घकालीन परिणाम:**

**१. आफ्रिकन युनियनची निर्मिती:** सन १९६३ मध्ये स्थापन झालेली आफ्रिकन युनिटी (OAU) संघटना,सन २००२ मध्ये आफ्रिकन युनियन (AU) मध्ये विकसित झाली. या संघटनेचे उद्दिष्ट संपूर्ण आफ्रिका खंडात राजकीय आणि आर्थिक एकात्मतेला चालना देण्याचे आहे.

**२. आर्थिक स्वातंत्र्यासाठी सतत संघर्ष:** आफ्रिकन राष्ट्रांनी पूर्वीच्या वसाहतवादी शक्तींवरील आपले अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि आर्थिक स्वयंपूर्णता साध्य करण्यासाठी कार्य करणे सुरू ठेवले आहे.

### २.२.१.२. आशियातील निर्वसाहतीकरण:

दुसऱ्या महायुद्धानंतरची निर्वसाहतीकरण प्रक्रिया (Post-World War II Decolonization) ही एक महत्वाची घटना होती. दुसरे महायुद्ध (१९३९-१९४५) संपल्यानंतर जगातील राजकीय आणि सामाजिक परिस्थिती बदलली. युद्धामुळे युरोपीय साम्राज्यांची शक्ती कमी झाली, आणि आशियातील देशांना स्वातंत्र्य मिळवण्यासाठी योग्य वेळ मिळाला. साम्राज्यवादी राष्ट्रांमध्ये नव्या जगाच्या विचारांनुसार राज्य करण्याचे बळ कमी होत गेले. त्यामुळे आशियातील अनेक राष्ट्रांनी ब्रिटन, फ्रान्स, नेदरलँड्स यांसारख्या साम्राज्यांपासून स्वातंत्र्य मिळवले. या काळात आशियातील राष्ट्रांना त्यांच्या स्वातंत्र्याच्या लढ्यात यश मिळवण्यासाठी अनेक संघर्ष करावे लागले.

**आशियातील काही प्रमुख राष्ट्रांचा संक्षिप्त स्वातंत्र्यलढा:**

**१. भारत:**

भारत हा ब्रिटनच्या ताब्यात असलेला प्रमुख देश होता. महात्मा गांधी आणि इतर नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली भारताने अनेक वर्षे स्वातंत्र्यासाठी लढा दिला. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात ''चले जाव'' चळवळीने जोर धरला, आणि सन १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले. भारताचे भारत आणि पाकिस्तान असे फाळणीमुळे दोन देशांमध्ये विभाजन झाले.

**२. पाकिस्तान:**

भारताच्या विभाजनातून पाकिस्तानचा जन्म झाला. मुस्लीम लीगने हिंदू-मुस्लिम तणाव वाढवत पाकिस्तानची मागणी केली. सन १९४७ मध्ये भारताच्या फाळणीनंतर पाकिस्तान एक स्वतंत्र मुस्लिम राष्ट्र बनले.

**३. श्रीलंका:**

श्रीलंका (सिलोन) हा ब्रिटनच्या अधिपत्याखाली असलेला देश होता. दुसऱ्या महायुद्धानंतर श्रीलंकेतील नेत्यांनी स्वातंत्र्यासाठी दबाव वाढवला. सन १९४८ मध्ये ब्रिटनने श्रीलंकेला स्वातंत्र्य दिले. सन १९७२ मध्ये श्रीलंका लोकतांत्रिक घटनात्मक गणराज्य बनले.

**४. बर्मा (म्यानमार):**

बर्मा हा ब्रिटनच्या अधिपत्याखालील देश होता. दुसऱ्या महायुद्धादरम्यान जपानने बर्मा ताब्यात घेतले. पण युद्ध संपल्यानंतर ब्रिटनने पुन्हा बर्मावर ताबा मिळवला. अँग्लो-बर्मी युद्धांनंतर ब्रिटनला बर्मावर ताबा मिळवता आला. सन १९४८ मध्ये बर्माला स्वातंत्र्य मिळाले.

**५. इंडोनेशिया:**

इंडोनेशिया हा नेदरलँड्सच्या ताब्यात होता. द्वितीय महायुद्धादरम्यान जपानने इंडोनेशिया ताब्यात घेतले होते. युद्ध संपल्यानंतर, नेदरलँड्सने परत इंडोनेशियावर ताबा मिळवण्याचा प्रयत्न केला. पण इंडोनेशियन लोकांनी स्वातंत्र्यासाठी जोरदार संघर्ष केला. अखेरीस सन १९४९ मध्ये नेदरलँड्सने इंडोनेशियाचे स्वातंत्र्य मान्य केले.

**६. व्हिएतनाम:**

व्हिएतनाम हा फ्रान्सच्या ताब्यात असलेला देश होता. दुसऱ्या महायुद्धादरम्यान जपानने व्हिएतनाम ताब्यात घेतले होते. पण युद्धानंतर फ्रान्सने पुन्हा व्हिएतनामवर ताबा मिळवण्याचा प्रयत्न केला. हो चि मिन्ह यांच्या नेतृत्वाखाली व्हिएतनामने स्वतंत्र होण्यासाठी लढा दिला. सन १९५४ मध्ये फ्रेंचांना पराभव पत्करावा लागला आणि व्हिएतनामचे उत्तर व्हिएतनाम आणि दक्षिण व्हिएतनाम असे दोन भाग पडले.

**७. फिलिपिन्स :**

फिलिपिन्स हा अमेरिकेच्या ताब्यात असलेला देश होता. द्वितीय महायुद्धादरम्यान जपानने फिलिपिन्सवर आक्रमण केले. युद्ध संपल्यानंतर अमेरिकेने फिलिपिन्सला सन १९४६ मध्ये स्वातंत्र्य दिले. फिलिपिन्स हा आशियातील पहिल्या काही स्वतंत्र देशांपैकी एक बनला.

**७. मलेशिया:**

मलेशिया हा ब्रिटनच्या ताब्यात होता. दुसऱ्या महायुद्धादरम्यान जपानने मलेशिया ताब्यात घेतले होते. युद्धानंतर ब्रिटनने मलेशियावर पुन्हा ताबा मिळवला, पण मलेशियन लोकांनी स्वातंत्र्यासाठी संघर्ष केला. सन १९५७ मध्ये मलेशियाला स्वातंत्र्य मिळाले.

### ८. कोरिया:

कोरिया हा जपानच्या ताब्यात असलेला देश होता. दुसरे महायुद्ध संपल्यानंतर कोरियाला स्वातंत्र्य दिले गेले. पण देशाच्या उत्तर आणि दक्षिण भागात संघर्ष निर्माण झाला. उत्तर कोरिया आणि दक्षिण कोरियामध्ये शीतयुद्धाचा प्रभाव पडला आणि दोन्ही भाग वेगवेगळ्या विचारसरणीच्या राजकीय व्यवस्थांमध्ये विभाजित झाले.

**आशियातील निर्वसाहतीकरणाची (स्वातंत्र्याची) कारणे:**

- **युरोपियन शक्तींचे कमकुवत होणे:** दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपातील शक्ती आर्थिक आणि राजकीय दृष्ट्या कमकुवत झाल्या.
- **राष्ट्रवादाचा उदय:** आशियातील अनेक देशांमध्ये राष्ट्रवादाच्या विचारांचा उदय झाला. या देशांतील लोकांनी आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढा दिला.
- **युद्धामुळे असंतोष:** युद्धामुळे आशियातील लोकांमध्ये असंतोष वाढला होता. त्यांना आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळावे असे वाटू लागले.
- **आंतरराष्ट्रीय दबाव:** युद्धानंतर जगातील अनेक देशांनी, विशेषतः अमेरिकेने स्वातंत्र्याच्या विचारांना पाठिंबा दिला.

**निर्वसाहतीकरणाचे परिणाम:**

वसाहतवादाच्या मुक्ततेमुळे आशियात नवे देश निर्माण झाले. स्वातंत्र्यानंतर अनेक देशांनी राज्यघटनेवर आधारित आपले सरकार स्थापन केले, तर काहींनी हुकूमशाही स्वीकारली. आशियातील काही देशांत स्वातंत्र्यानंतरही राजकीय अस्थिरता राहिली. काही देशांनी झपाट्याने विकास साधला.

दुसऱ्या महायुद्धानंतर आशियातील देशांची वसहतवादातून मुक्तता ही एक ऐतिहासिक घडामोड होती. यातून अनेक आशियाई देशांनी आपले स्वातंत्र्य मिळवले आणि ते स्वतःचे भविष्य ठरवू लागले. पण या स्वातंत्र्यलढ्यांनी जागतिक राजकारणावर दीर्घकालीन परिणाम केले. त्यामध्ये आशिया हा महत्त्वाचा भूभाग बनला.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – १ :**

अ) रिकाम्या जागा योग्य पर्यायासह भरा.

१. दुसरे महायुद्ध संपल्यानंतर, आफ्रिकेत .............. हा मोठा बदल घडला.

अ) वसाहतवादाचा विस्तार | ब) वसाहतवादाचा अंत

क) औद्योगिकीकरणाचा आरंभ | ड) लोकशाहीचा विस्तार

२. द्वितीय महायुद्धानंतर आफ्रिकन नेत्यांना .............. या नव्या राजकीय कल्पनांमुळे प्रेरणा मिळाली.

अ) लोकशाही, स्वातंत्र्य आणि राष्ट्रवाद  ब) राजेशाही, साम्यवाद आणि एकाधिकार

क) तंत्रज्ञान, विज्ञान आणि धर्म  ड) व्यापार, कृषी आणि संस्कृती

३. ............. हा आफ्रिकेत स्वातंत्र्य मिळवणारा पहिला देश होता.

अ) केनिया  ब) अल्जेरिया  क) घाना  ड) नायजेरिया

४. अल्जेरियाने ............. पासून स्वातंत्र्य मिळवण्यासाठी युद्ध केले.

अ) ब्रिटन  ब) फ्रान्स  क) नेदरलँड्स  ड) स्पेन

५. आफ्रिकन युनिटी (OAU) ही संघटना सन ............. मध्ये स्थापन झाली.

अ) १९५०  ब) १९६३  क) १९७०  ड) १९८५

६. आफ्रिकन समाजवादाचा प्रचार करणारे ............. हे टांझानियाचे पहिले नेते होते.

अ) पॅट्रिस लुमुंबा  ब) जोमो केन्याटा  क) क्वामे एनक्रुमा  ड) जुलियस नायरेरे

७. ............. या देशाने नेदरलँड्सपासून सन १९४९ मध्ये स्वातंत्र्य मिळवले.

अ) बर्मा  ब) इंडोनेशिया  क) व्हिएतनाम  ड) श्रीलंका

ब) जोड्या जुळवून योग्य पर्याय निवडा.

१)

| गट १ | गट २ |
|---|---|
| १) घाना | अ. १९६३ |
| २) केनिया | ब. १९६० |
| ३) अल्जेरीया | क. १९६२ |
| ४) काँगो | ड. १९५७ |

अ) १-ब, २- अ, ३ -क, ४- ड  ब) १-अ, २- ब, ३ -क, ४- ड

क) १-ड, २- अ, ३ -ब, ४- क  ड) १-ब, २- ड, ३ -क, ४- अ

२)

| गट १ | गट २ |
|---|---|
| १) भारत | अ. १९४८ |
| २) इंडोनेशिया | ब. १९४७ |

३) श्रीलंका क. १९४९

४) व्हियतनाम ड. १९५४

अ) १-ब, २- क, ३ -अ, ४- ड ब) १-अ, २- ब, ३ -क, ४- ड

क) १-क, २- अ, ३ -ब, ४- ड ड) १-ब, २- ड, ३ -क, ४- अ

क) योग्य पर्याय निवडा.

विधान १ : दुसऱ्या महायुद्धामुळे युरोपीय वसाहतवादी शक्ती आर्थिक आणि लष्करीदृष्ट्या सक्षम झाल्या.

विधान २ : इंडोनेशियाने सुकार्णो यांच्या नेतृत्वाखाली १७ ऑगस्ट, १९४५ रोजी ब्रिटीश वसाहतवादी राजवटीपासून आपले स्वातंत्र्य घोषित केले.

१) पहिले विधान बरोबर, दुसरे विधान चुकीचे.

२) दुसरे विधान बरोबर, पहिले विधान चुकीचे.

३) दोन्ही विधाने बरोबर.

४) दोन्ही विधाने चुकीची.

**२.२.२ आफ्रिकेतील चळवळी आणि नेते – गमाल अब्दुल नासेर (इजिप्त), नेल्सन मंडेला (दक्षिण आफ्रिका) :**

विसाव्या शतकात, जगभर अनेक देशांनी वसाहतवादी सत्तांच्या विरोधात संघर्ष केला. आफ्रिका खंडात या संघर्षाने वेगळीच दिशा घेतली. वसाहतवादी साम्राज्यांच्या शोषणातून मुक्त होण्याची आस आणि स्वायत्त राष्ट्र बनवण्याची प्रेरणा या संघर्षाच्या मुळाशी होती. आफ्रिकेतील विविध देशांनी स्वातंत्र्य मिळवण्यासाठी मोठ्या प्रमाणात आंदोलन केले, ज्याला महत्त्वपूर्ण नेत्यांच्या नेतृत्वाने दिशा मिळाली.

गमाल अब्दुल नासेर हे त्या काळातील महत्त्वाचे नेते होते. त्यांनी इजिप्तमध्ये स्वातंत्र्याच्या लढाईत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांनी पाश्चिमात्य सत्तांच्या वर्चस्वाला आव्हान देत स्वदेशी आर्थिक धोरणांचा पुरस्कार केला. नासेर यांची भूमिका केवळ इजिप्तपुरती मर्यादित नव्हती, तर आफ्रिका आणि अरब जगतातील अनेक देशांच्या स्वातंत्र्य चळवळींसाठी प्रेरणादायक ठरली.

दक्षिण आफ्रिकेत, नेल्सन मंडेला हे आणखी एक अग्रणी नेते होते. त्यांनी वर्णद्वेषी शासनाच्या अन्यायाविरुद्ध आणि दक्षिण आफ्रिकेतील कृष्णवर्णीय लोकांच्या स्वातंत्र्यासाठी संघर्ष केला. अनेक वर्षांच्या तुरुंगवासानंतरही मंडेला यांनी आपल्या ध्येयाशी तडजोड केली नाही. त्यांचा संघर्ष अहिंसक असला तरी त्यांनी निर्धाराने जगभरात स्वातंत्र्य, समानता आणि माणुसकीसाठी लढा दिला.

गमाल अब्दुल नासेर आणि नेल्सन मंडेला हे दोन नेते त्यांच्या स्वतंत्र संघर्षासाठी प्रसिद्ध झाले. त्यांनी आफ्रिकेतील जनतेला प्रेरित केले आणि वसाहतवाद्यांच्या विरोधात उभे राहण्याचे धैर्य दिले. त्यांच्या नेतृत्वाखाली आफ्रिकेतील अनेक देशांनी स्वातंत्र्य मिळवले आणि नवी राष्ट्रे निर्माण झाली.

### २.२.२.१ गमाल अब्दुल नासेर (इजिप्त)

**गमाल अब्दुल नासेर (इजिप्त) आणि आफ्रिकेतील वसाहतवादविरोधी चळवळी:**

गमाल अब्दुल नासेर हे इजिप्तचे महत्त्वाचे राजकीय नेते होते. त्यांनी केवळ इजिप्तच नव्हे, तर आफ्रिकेतील वसाहतवादाविरुद्धच्या संघर्षात महत्त्वाची भूमिका बजावली. वसाहतवादी सत्तांच्या दबावाखालील आफ्रिका खंडातील देशांना स्वातंत्र्य देण्याच्या चळवळींना त्यांनी प्रेरणा दिली. नासेर यांच्या नेतृत्वाखाली इजिप्तने स्वतःचे भवितव्य ठरविण्याचा निर्णय घेण्याचा अधिकार मिळवला. त्यांच्या कार्यामुळे संपूर्ण आफ्रिका खंडात नव्या राष्ट्रांची निर्मिती झाली.

**प्रारंभिक जीवन:**

गमाल अब्दुल नासेर यांचा जन्म १५ जानेवारी, १९१८ रोजी इजिप्तमध्ये झाला. ते एका मध्यमवर्गीय मुस्लिम कुटुंबातील होते. नासेर यांचे बालपण सामान्य कुटुंबात व्यतीत झाले. पण त्यांच्या मनात लहानपणापासूनच वसाहतवादाच्या विरोधात संघर्ष करण्याची प्रेरणा होती. शिक्षण घेत असतानाच त्यांच्यावर वसाहतवाद्यांचा दबाव आणि इजिप्तच्या जनतेच्या अन्यायकारक परिस्थितीचा मोठा परिणाम झाला. त्यातून त्यांच्या मनात देशासाठी काहीतरी करण्याची तळमळ वाढत गेली.

**सैन्य कारकीर्द आणि राजकीय वाटचाल:**

नासेर यांनी सन १९३७ मध्ये इजिप्तच्या सैन्यात प्रवेश केला. सैन्यातील सेवेमुळे त्यांना इजिप्तमध्ये आणि इतर वसाहतवादी राष्ट्रांमध्ये काय चालले आहे, याची जाणीव झाली. त्यावेळी इजिप्त ब्रिटिशांच्या ताब्यात होते. ब्रिटिशांचा प्रभाव संपवण्यासाठी नासेर यांनी आपल्या सहकाऱ्यांसह गुप्तपणे 'फ्री ऑफिसर्स' नावाची संघटना स्थापन केली. या संघटनेने इजिप्तमधील राजकीय क्रांतीची तयारी केली.

**इजिप्तमधील राजकीय क्रांती:**

सन १९५२ मध्ये नासेर यांच्या नेतृत्वाखाली 'फ्री ऑफिसर्स' संघटनेने इजिप्तमध्ये लष्करी बंड केले. या बंडामुळे इजिप्तमधील राजवट कोसळली आणि राजा फारुक यांना पदच्युत केले गेले. ही इजिप्तच्या स्वातंत्र्याची सुरुवात होती. या क्रांतीनंतर नासेर यांनी इजिप्तमधील लोकशाही व्यवस्थेची पुनर्बांधणी करण्याचा प्रयत्न केला.

**राष्ट्रपतीपद आणि स्वातंत्र्य चळवळ:**

सन १९५४ मध्ये गमाल अब्दुल नासेर हे इजिप्तचे राष्ट्रपती बनले. राष्ट्रपतीपदाची सूत्रे हातात घेताच त्यांनी ब्रिटिश सैन्याला इजिप्तमधून बाहेर काढण्याचे धाडसी पाऊल उचलले. त्याचवेळी त्यांनी स्वदेशी

धोरणांचा पुरस्कार केला. नासेर यांचा मुख्य उद्देश वसाहतवाद्यांच्या हातून इजिप्तची अर्थव्यवस्था आणि राजकीय व्यवस्था मुक्त करणे हा होता.

सन १९५६ मध्ये नासेर यांनी 'सुएझ कालवा' राष्ट्रीयकरण करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. हा कालवा ब्रिटिश आणि फ्रेंच कंपन्यांच्या ताब्यात होता. नासेर यांच्या या निर्णयाने जागतिक स्तरावर खळबळ माजवली. पण त्यांनी इजिप्तच्या हितासाठी हा निर्णय घेतला. या घटनेने इजिप्तमधील राष्ट्रवादी चळवळीला बळ दिले.

**पॅन-आफ्रिकानिझमचे समर्थक:**

नासेर यांचे नेतृत्व केवळ इजिप्तपुरते मर्यादित नव्हते. त्यांनी संपूर्ण आफ्रिका खंडाच्या स्वातंत्र्य चळवळीला पाठिंबा दिला. त्यांनी पॅन-आफ्रिकानिझम या संकल्पनेचा प्रचार केला. पॅन-आफ्रिकानिझम म्हणजे सर्व आफ्रिकन देशांनी एकत्र येऊन वसाहतवादाच्या विरोधात लढा देणे. नासेर यांचा विश्वास होता की, आफ्रिका खंडातील देशांनी एकत्र येऊन स्वातंत्र्य मिळवणे आणि आपले राष्ट्र घडवणे गरजेचे आहे.

नासेर यांनी आफ्रिकेतील इतर नेत्यांशी संपर्क साधून या विचाराचा प्रसार केला. त्यांचे नेतृत्व आफ्रिकेतील अनेक देशांसाठी प्रेरणादायी ठरले. आफ्रिका खंडातील स्वातंत्र्य चळवळींना नवी दिशा देण्याचे काम नासेर यांनी केले.

**अरब राष्ट्रवाद आणि नासेर यांची भूमिका:**

नासेर यांनी फक्त आफ्रिकन स्वातंत्र्यलढ्याचा नव्हे तर अरब राष्ट्रवादाचाही प्रचार केला. अरब देशांनी एकत्र येऊन वसाहतवादी सत्तांना विरोध करावा, हा त्यांचा विचार होता. त्यांनी अरब जगताला एकता आणि सत्ताकेंद्रीकरणाचे आवाहन केले. नासेर यांच्या नेतृत्वाखाली 'युनायटेड अरब रिपब्लिक'ची स्थापना करण्यात आली, ज्यामध्ये इजिप्त आणि सीरिया यांचा समावेश होता. हा प्रयोग जास्त काळ टिकला नाही. पण त्यातून अरब जगतामध्ये एकतेचे महत्त्व वाढले.

**सुएझ संकट:**

सुएझ कालव्याच्या राष्ट्रीयकरणामुळे सन १९५६ मध्ये एक मोठे राजकीय संकट निर्माण झाले. ब्रिटन, फ्रान्स आणि इस्रायल यांनी इजिप्तवर आक्रमण केले. या संघर्षात नासेर यांनी दृढ भूमिका घेतली. त्यांचा हा निर्णय आफ्रिका आणि अरब जगतातील राष्ट्रवादी विचारांना बळकटी देणारा ठरला. अखेर अमेरिकेच्या मध्यस्थीनंतर हा संघर्ष संपुष्टात आला आणि इजिप्तला सुएझ कालव्यावर पूर्ण अधिकार मिळाला.

**आर्थिक आणि सामाजिक सुधारणा:**

नासेर यांनी आपल्या राष्ट्राध्यक्षपदाच्या काळात इजिप्तमध्ये अनेक आर्थिक आणि सामाजिक सुधारणा केल्या. त्यांनी जमीन सुधारणांचा कार्यक्रम राबवून गरीब शेतकऱ्यांना जमीन उपलब्ध करून दिली. उद्योग आणि शेती क्षेत्रात स्वदेशी धोरणांचा अवलंब करून इजिप्तची आर्थिक स्वावलंबनाची दिशा निश्चित केली.

त्यांनी शिक्षण आणि आरोग्यसेवा क्षेत्रात सुधारणा केल्या आणि सामान्य जनतेसाठी अनेक सुविधा निर्माण केल्या.

**इजिप्तच्या आधुनिकीकरणाची प्रक्रिया:**

गमाल अब्दुल नासेर यांनी इजिप्तच्या आधुनिकीकरणाची प्रक्रिया सुरू केली. त्यांनी कारखाने, रस्ते, धरणे, शाळा आणि रुग्णालये यांसारख्या मूलभूत सुविधांची उभारणी केली. यामुळे इजिप्तची अर्थव्यवस्था अधिक मजबूत झाली. नासेर यांची धोरणे गरीब आणि मध्यमवर्गीय लोकांसाठी फायदेशीर ठरली.

**नासेर यांचे नेतृत्व आणि वारसा:**

गमाल अब्दुल नासेर यांचे नेतृत्व इजिप्त आणि आफ्रिका खंडाच्या वसाहतवादविरोधी संघर्षात मोलाचे होते. त्यांनी इजिप्तला स्वातंत्र्य मिळवून दिले आणि त्याचवेळी आफ्रिकेतील इतर देशांच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी प्रेरणा दिली. त्यांच्या नेतृत्वाने आफ्रिका खंडात नव्या राष्ट्रांची निर्मिती होण्यास मदत झाली. त्यांच्या मृत्यूनंतरही त्यांचा वारसा कायम आहे. त्यांनी आफ्रिकन आणि अरब राष्ट्रांना एकत्र आणण्याचे काम केले. त्यांची कार्यतत्परता, राष्ट्रवादी विचारसरणी, आणि स्वातंत्र्य चळवळीतील योगदान आजही अनेक नेत्यांना प्रेरित करते.

गमाल अब्दुल नासेर हे आफ्रिका खंडातील स्वातंत्र्य चळवळीमधील महान नेते होते. त्यांच्या नेतृत्वाखाली इजिप्तने स्वातंत्र्य मिळवले आणि आफ्रिका खंडातील अनेक देशांनी वसाहतवादाच्या विरोधात उभे राहण्याचे धैर्य मिळवले. त्यांच्या राष्ट्रवादी विचारसरणीने जागतिक स्तरावर एक नवी लाट आणली, जी वसाहतवादाच्या विरोधात एकजुटीचे प्रतीक ठरली.

२.२.२.२ **नेल्सन मंडेला (दक्षिण आफ्रिका) :**

**नेल्सन मंडेला (दक्षिण आफ्रिका) आणि वसाहतवादविरोधी चळवळ:**

नेल्सन मंडेला हे दक्षिण आफ्रिकेतील वसाहतवादविरोधी चळवळीचे प्रमुख नेते होते. त्यांनी दक्षिण आफ्रिकेमधील वर्णद्वेषी धोरणांविरुद्ध दीर्घकाळ संघर्ष केला. मंडेला यांचा लढा फक्त दक्षिण आफ्रिकेपुरता सीमित नव्हता; त्यांनी संपूर्ण जगाला समानता, स्वातंत्र्य आणि मानवतेचे संदेश दिले. त्यांच्या नेतृत्वाखाली दक्षिण आफ्रिकेने वसाहतवादी शक्तींना तोंड देत अखेर स्वातंत्र्य मिळवले.

**प्रारंभिक जीवन:**

नेल्सन मंडेला यांचा जन्म १८ जुलै, १९१८ रोजी दक्षिण आफ्रिकेमधील म्वोजो येथे झाला. त्यांचे खरे नाव रोलीलाहला मंडेला होते. ते थेम्बू राजघराण्यात जन्मलेले होते. लहानपणापासूनच त्यांना न्याय, समानता आणि स्वातंत्र्याच्या मूल्यांचा आदर होता. शालेय शिक्षण घेतल्यानंतर मंडेला यांनी फोर्ट हरे विद्यापीठात प्रवेश घेतला तेथे त्यांनी कायद्याचे शिक्षण घेतले.

**वर्णद्वेषी धोरणांचा विरोध:**

दक्षिण आफ्रिकेमध्ये त्या काळात अपार्थाइड म्हणजेच वर्णद्वेषी धोरण अस्तित्वात होते. या धोरणानुसार गोऱ्या आणि कृष्णवर्णीय लोकांमध्ये भेदभाव केला जात होता. कृष्णवर्णीयांना कोणत्याही प्रकारचे राजकीय, सामाजिक किंवा आर्थिक अधिकार दिले जात नव्हते. हे पाहून मंडेला यांचा विद्रोह वाढला. त्यांनी आपल्या शिक्षणाच्या काळातच वर्णद्वोषी धोरणांचा विरोध करण्यास सुरुवात केली.

**आफ्रिकन नॅशनल काँग्रेसमध्ये (ANC) प्रवेश:**

सन १९४३ मध्ये नेल्सन मंडेला यांनी आफ्रिकन नॅशनल काँग्रेस (ANC) या संघटनेत प्रवेश केला. आफ्रिकन नॅशनल काँग्रेस (ANC) ही दक्षिण आफ्रिकेमधील प्रमुख राजकीय संघटना होती. तीचा उद्देश कृष्णवर्णीय लोकांच्या हक्कांसाठी लढा देणे हा होता. मंडेला यांनी आफ्रिकन नॅशनल काँग्रेसच्या (ANC) युवक शाखेची स्थापना केली आणि वर्णद्वेषविरोधी चळवळीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली.

**शांततामय प्रतिकार आणि सविनय कायदेभंग:**

नेल्सन मंडेला यांच्यावर म.गांधीजींच्या अहिंसात्मक प्रतिकाराच्या विचारसरणीचा प्रभाव पडला. त्यांनी शांततेच्या मार्गाने वर्णद्वेषी धोरणांचा प्रतिकार करण्यास सुरुवात केली. त्यांनी सविनय कायदेभंगाच्या मार्गाने सरकारच्या अन्यायकारक कायद्यांना विरोध करण्याचा निर्णय घेतला. सन १९५२ मध्ये त्यांनी 'डिफायन्स कॅम्पेन' या आंदोलनाचे नेतृत्व केले, ज्यामध्ये अन्यायकारक कायद्यांचे पालन न करण्याचे आवाहन त्यांनी जनतेला केले.

**शार्पव्हिल नरसंहार आणि बदललेली भूमिका :**

सन १९६० मध्ये शार्पव्हिल येथे झालेल्या नरसंहाराने मंडेला यांच्या राजकीय भूमिकेत बदल घडवला. शार्पव्हिल येथे शांततेने आंदोलन करणाऱ्या लोकांवर पोलिसांनी गोळीबार केला आणि त्यात शेकडो लोकांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर मंडेला यांनी अहिंसेचा मार्ग सोडून सशस्त्र संघर्ष करण्याचा विचार केला. त्यांनी आफ्रिकन नॅशनल काँग्रेसच्या (ANC) सशस्त्र गटाची स्थापना केली, ज्याचे नाव 'उमखोंतो वे सिझवे' (राष्ट्राचे भाले) असे ठेवले.

**तुरुंगवास आणि संघर्ष:**

सन १९६२ मध्ये मंडेला यांना अटक करण्यात आली आणि त्यांच्यावर देशद्रोहाचा आरोप ठेवण्यात आला. सन १९६४ मध्ये रिवोनिया खटल्यामध्ये त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना रॉबेन आयलंड तुरुंगात ठेवण्यात आले. मंडेला यांनी तुरुंगात २७ वर्षे घालवली. या काळात त्यांनी आपल्या लढ्याला कधीही हरु दिले नाही. त्यांच्या संघर्षामुळे जगभरातून त्यांना पाठिंबा मिळाला.

**आंतरराष्ट्रीय समर्थन:**

नेल्सन मंडेला यांच्या संघर्षामुळे जगभरातून दक्षिण आफ्रिकेतील वर्णद्वेषी धोरणांचा विरोध होऊ लागला. अनेक देशांनी दक्षिण आफ्रिकेवर आर्थिक निर्बंध लादले. आंतरराष्ट्रीय पातळीवर मंडेला यांना

स्वातंत्र्य आणि समानतेचे प्रतीक मानले जाऊ लागले. त्यांच्या सोडवणुकीसाठी जगभरात आंदोलन सुरू झाले.सन १९९० मध्ये अखेर दक्षिण आफ्रिकेच्या सरकारने मंडेला यांची सुटका केली.

**स्वातंत्र्याचा विजय:**

नेल्सन मंडेला यांच्या सुटकेनंतर दक्षिण आफ्रिकेमध्ये वर्णद्वेषाविरुद्धच्या चळवळीने नवे बळ मिळवले. मंडेला यांनी सरकारशी चर्चेतून शांततेचा मार्ग निवडला. सन १९९४ मध्ये दक्षिण आफ्रिकेमध्ये पहिल्यांदाच सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्या त्यामध्ये कृष्णवर्णीय नागरिकांना मतदानाचा हक्क मिळाला. या निवडणुकांमध्ये मंडेला यांचा विजय झाला आणि ते दक्षिण आफ्रिकेचे पहिले कृष्णवर्णीय राष्ट्राध्यक्ष बनले.

**राष्ट्रपतीपद आणि सामाजिक सुधारणा:**

राष्ट्रपतीपद स्वीकारल्यानंतर नेल्सन मंडेला यांनी दक्षिण आफ्रिकेमध्ये सामाजिक, आर्थिक आणि राजकीय सुधारणा करण्यास सुरुवात केली. त्यांनी समाजातील सर्व वर्गांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. वर्णद्वेषामुळे निर्माण झालेल्या तणावाचा अंत करण्यासाठी त्यांनी 'सत्य आणि सुलह आयोग' स्थापन केला. या आयोगाच्या माध्यमातून त्यांनी जनतेला सत्य आणि क्षमेसाठी प्रोत्साहित केले.

**मंडेला यांची धोरणे आणि कार्य:**

नेल्सन मंडेला यांनी दक्षिण आफ्रिकेमध्ये शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि गृहनिर्माण क्षेत्रात सुधारणा केल्या. त्यांनी देशातील दारिद्र्य आणि बेकारीचा सामना करण्यासाठी विविध योजना सुरू केल्या. मंडेला यांच्या नेतृत्वाखाली दक्षिण आफ्रिका आंतरराष्ट्रीय स्तरावर एक मजबूत आणि प्रतिष्ठित देश म्हणून उदयास आला.

**शांततेचा संदेश:**

मंडेला यांच्या शांततेच्या विचारसरणीने जगभरात प्रेरणा दिली. त्यांनी स्वतःच्या आयुष्यात अनेक यातना सहन केल्या, पण त्यांनी कधीही द्वेष आणि हिंसाचाराचा मार्ग स्वीकारला नाही. त्यांच्या सहनशीलतेने आणि क्षमाशीलतेने संपूर्ण जगाला माणुसकीचा संदेश दिला. त्यांना सन १९९३ मध्ये शांततेसाठी नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

**मंडेला यांचा वारसा:**

नेल्सन मंडेला यांच्या संघर्षाचा आणि नेतृत्वाचा वारसा आजही जगभरात कायम आहे. त्यांनी दक्षिण आफ्रिकेमध्ये केवळ स्वातंत्र्य मिळवले नाही, तर त्यांनी जागतिक स्तरावर समानतेचा आणि मानवाधिकारांचा संदेश दिला. त्यांच्या कार्याने जगातील अनेक राष्ट्रांना वसाहतवादाविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली.

नेल्सन मंडेला हे केवळ दक्षिण आफ्रिकेचे नेते नव्हते, तर ते संपूर्ण जगासाठी समानता, स्वातंत्र्य आणि शांततेचे प्रतीक होते. त्यांच्या नेतृत्वाखाली दक्षिण आफ्रिकेने वर्णद्वेषाच्या जोखडातून मुक्तता मिळवली आणि

नव्या युगाची सुरुवात केली. मंडेला यांची कार्यतत्परता आणि धैर्य आजही जगभरातील लोकांना प्रेरित करत आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–२**

अ) रिकाम्या जागा योग्य पर्यायासह भरा.

१. गमाल अब्दुल नासेर यांचा जन्म ............... रोजी झाला.

अ) १५ जानेवारी, १९१८ ब) १८ जुलै, १९१८

क) २६ जानेवारी, १९१९ ड) १२ फेब्रुवारी, १९१८

२. नासेर यांनी इजिप्तच्या स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वाची भूमिका बजावली आणि 'फ्री ऑफिसर्स' नावाची संघटना सन............... मध्ये स्थापन केली.

अ) १९४३ ब) १९५२ क) १९३७ ड) १९४८

३. नासेर यांनी सन १९५६ मध्ये............... कालव्याचे राष्ट्रीयकरण केले.

अ) पनामा ब) सुएझ क) अमासोन ड) नाईल

४. नेल्सन मंडेला यांचा जन्म दक्षिण आफ्रिकेतील म्वेजो येथे............... रोजी झाला.

अ) १८ जुलै, १९१८ ब) १९ फेब्रुवारी, १९२०

क) १५ ऑगस्ट, १९१९ ड) १ मार्च, १९१८

५. सन.............. मध्ये शार्पव्हिल येथे शांततेच्या आंदोलनात पोलिसांनी गोळीबार केला, ज्यामुळे मंडेला यांनी सशस्त्र संघर्षाची भूमिका स्वीकारली.

अ) १९५६ ब) १९६२ क) १९६० ड) १९५२

६. सन.............. मध्ये नेल्सन मंडेला यांनी 'उमखोंतो वे सिझवे' नावाची सशस्त्र गटाची स्थापना केली.

अ) १९५२ ब) १९६१ क) १९४८ ड) १९५०

७. सन १९९४ मध्ये दक्षिण आफ्रिकेमध्ये पहिल्यांदा.............. घेण्यात आल्या, ज्यात नेल्सन मंडेला यांचा विजय झाला.

अ) सार्वत्रिक निवडणुका ब) स्थानिक निवडणुका

क) आंतरराष्ट्रीय निवडणुका ड) संघटनात्मक निवडणुका

ब) जोड्या जुळवून योग्य पर्याय निवडा.

१)

| गट १ | गट २ |
|---|---|
| १) गमाल अब्दुल नासेर | अ. १८ जुलै, १९१८ |
| २) नेल्सन मंडेला | ब. १५ जानेवारी, १९१८ |
| ३) सुवेझ कालवा राष्ट्रीयकरण | क. १९६० |
| ४) 'उमखोंतो वे सिझवे' | ड. १९५६ |

अ) १-ब , २- अ , ३ -क , ४- ड    ब) १-अ , २- ब , ३ -क , ४- ड

क) १-क, २- अ , ३ -ब , ४- ड    ड) १-ब , २- अ , ३ -ड , ४- क

क) योग्य पर्याय निवडा.

विधान १ : नेल्सन मंडेला हे शांतता, न्याय आणि सलोख्याचे प्रतीक म्हणून जगभरात ओळखले जातात.

विधान २ : नासेर हे अरब राष्ट्रवाद, वसाहतवादविरोधी आणि अरब जगतातील स्वातंत्र्य आणि सामाजिक न्यायाच्या संघर्षाचे चिरस्थायी प्रतीक आहेत.

१) पहिले विधान बरोबर, दुसरे विधान चुकीचे.

२) दुसरे विधान बरोबर, पहिले विधान चुकीचे.

३) दोन्ही विधाने बरोबर.

४) दोन्ही विधाने चुकीची

## २.२.३ आशियातील चळवळी आणि नेते– हो ची मिन्ह (व्हिएतनाम), आंग सान स्यू की (बर्मा) :

### २.२.३.१ हो ची मिन्हः व्हिएतनामचा स्वातंत्र्यलढा आणि नेतृत्वः

हो ची मिन्ह हे आशियातील महत्त्वाचे वसाहतवादविरोधी नेते होते. त्यांची लढाई व्हिएतनामच्या स्वातंत्र्यासाठी होती. त्यांनी व्हिएतनामला परकीय सत्ता, विशेषतः फ्रेंच आणि अमेरिकन वसाहतवादापासून मुक्त करण्याचे ध्येय ठेवले. त्यांच्या कर्तृत्वामुळे, केवळ व्हिएतनामच नव्हे तर जगभरातील अनेक राष्ट्रांमध्ये वसाहतवादाविरोधी चळवळींना प्रेरणा मिळाली.

**प्रारंभिक जीवनः**

हो ची मिन्ह यांचा जन्म १९ मे, १८९० रोजी व्हिएतनामच्या न्गुएन राज्यातील एका साध्या कुटुंबात झाला. त्यांचे खरे नाव गुयेन सिंग कुंग होते. लहानपणीच त्यांनी आपल्या देशावरील परकीय सत्ता आणि शोषण पाहिले. हे पाहूनच त्यांच्यात वसाहतवादाविरोधी भावना निर्माण झाली. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी परदेशात जाण्याचा निर्णय घेतला.

**परदेशात शिक्षण आणि विचारसरणी:**

हो ची मिन्ह यांनी फ्रान्स, इंग्लंड, अमेरिका आणि रशिया अशा विविध देशांमध्ये प्रवास केला. त्या काळात ते फ्रेंच वसाहतवादाच्या विरोधातील चळवळींशी संपर्कात आले. त्यांनी फ्रान्समध्ये साम्यवादाचे शिक्षण घेतले आणि तेथील वसाहतवादविरोधी संघर्ष पाहिला. रशियातील बोल्शेविक क्रांतीने त्यांच्यावर मोठा प्रभाव टाकला. त्यांनी ठरवले की व्हिएतनामला स्वतंत्र करण्यासाठी साम्यवाद हा योग्य मार्ग आहे.

**फ्रेंच वसाहतवादाविरुद्ध संघर्ष:**

सन १९३० मध्ये हो ची मिन्ह यांनी 'व्हिएतनाम कम्युनिस्ट पार्टी' ची स्थापना केली. त्यांनी फ्रेंच वसाहतवादाच्या विरोधात संघर्ष सुरू केला. त्यांनी भूमिगत कार्य केले आणि फ्रेंच सरकारच्या विरोधात बंड उभारण्याचे नियोजन केले. त्यांच्या संघटनेत गरीब शेतकरी, कामगार, विद्यार्थी आणि देशभक्तांचा समावेश होता. स्वातंत्र्य, समानता आणि न्याय मिळवणे हे त्यांचे ध्येय होते.

**दुसरे महायुद्ध आणि जपानी आक्रमण:**

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात फ्रेंच सत्ता कमजोर झाली. जपानने व्हिएतनामवर आक्रमण केले आणि तिथे आपले वर्चस्व स्थापन केले. या काळात हो ची मिन्ह यांनी 'व्हिएत मिन्ह' या संघटनेची स्थापना केली. व्हिएत मिन्हने जपानी आणि फ्रेंच दोघांनाही विरोध केला. त्यांनी देशवासीयांना एकत्र आणून स्वातंत्र्यलढा उभारला.

**युद्ध संपल्यानंतर:**

दुसऱ्या महायुद्धानंतर, जपानच्या माघारीनंतर फ्रेंचांनी पुन्हा व्हिएतनामवर सत्ता काबीज करण्याचा प्रयत्न केला. मात्र, हो ची मिन्ह यांचा त्यास प्रखर विरोध होता. २ सप्टेंबर, १९४५ रोजी हो ची मिन्ह यांनी 'व्हिएतनाम डेमोक्रॅटिक रिपब्लिक' ची स्थापना केली आणि फ्रेंच वसाहतवादापासून पूर्ण स्वातंत्र्य घोषित केले.

**पहिले युद्धः**

स्वातंत्र्य घोषणेनंतरही फ्रेंचांनी व्हिएतनामवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे पहिले इंडोचायना युद्ध सुरू झाले. या युद्धात हो ची मिन्ह आणि त्यांच्या अनुयायांनी हिंमतीने लढा दिला. व्हिएतनामच्या जनतेने आणि ग्रामीण भागात शेतकरी यांनी मोठे समर्थन दिले. हा संघर्ष सन १९५४ मध्ये निर्णायक ठरला. डिएन बिएन फूच्या लढाईत फ्रेंचांना पराभवाचा सामना करावा लागला. अखेर जिनिव्हा करारानुसार व्हिएतनामचे विभाजन झाले.

**उत्तर आणि दक्षिण व्हिएतनाम:**

जिनिव्हा करारानंतर व्हिएतनामचे उत्तर व्हिएतनाम (हो ची मिन्ह यांच्या नेतृत्वाखालील) आणि दक्षिण व्हिएतनाम (अमेरिकेच्या समर्थनासह एक वसाहतवादी सत्ता) असे विभाजन झाले. हो ची मिन्ह यांनी उत्तर

व्हिएतनाममध्ये समाजवादी विचारसरणीवर आधारित शासन उभारले. त्यांनी साम्यवादाच्या तत्त्वांवर आधारित विकास धोरण राबवले.

**अमेरिकन हस्तक्षेप आणि व्हिएतनाम युद्धः**

सन १९५५ पासून अमेरिकेने दक्षिण व्हिएतनामला मदत देण्यास सुरुवात केली. अमेरिकन सरकारने दक्षिण व्हिएतनाममध्ये साम्यवादाचा प्रसार रोखण्याचा प्रयत्न केला. यामुळे उत्तर आणि दक्षिण व्हिएतनाममध्ये संघर्ष वाढला. हा संघर्ष पुढे जाऊन व्हिएतनाम युद्धात बदलला.

हो ची मिन्ह यांनी अमेरिकन हस्तक्षेपाचा तीव्र विरोध केला. त्यांच्या मते, हा संघर्ष फक्त व्हिएतनामच्या स्वातंत्र्यासाठी नव्हता, तर देशाच्या एकतेसाठी देखील होता. त्यांनी व्हिएतनामच्या जनतेला प्रेरणा दिली की परकीय सत्तेला विरोध करणे ही त्यांची जबाबदारी आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली उत्तर व्हिएतनामने अमेरिकन हस्तक्षेपाचा सामना केला.

**मृत्यू आणि वारसा:**

२ सप्टेंबर, १९६९ रोजी हो ची मिन्ह यांचे निधन झाले. त्यांनी आयुष्यभर आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी, एकतेसाठी आणि न्यायासाठी संघर्ष केला. त्यांच्या मृत्यूनंतर देखील त्यांची आदर्श विचारसरणी व्हिएतनामच्या जनतेत जिवंत राहिली.

त्यांच्या मृत्यूनंतर, सन १९७५ मध्ये अखेर दक्षिण व्हिएतनामने हार मानली आणि व्हिएतनाम एक स्वतंत्र, एकसंघ राष्ट्र बनले. हो ची मिन्ह यांचे स्वप्न साकार झाले.

हो ची मिन्ह यांचे जीवन आणि कार्य हे वसाहतवादाविरोधी लढ्यातील एक प्रेरणादायी उदाहरण आहे. त्यांनी साम्यवादाच्या तत्त्वांवर आधारित व्हिएतनामच्या स्वातंत्र्याची लढाई लढली आणि अखेर विजय मिळवला. त्यांच्या नेतृत्वामुळे व्हिएतनामला स्वातंत्र्य मिळाले आणि आशियातील इतर राष्ट्रांना वसाहतवादाविरोधी संघर्षात प्रेरणा मिळाली.

**२.२.३.२ आंग सान सू की: म्यानमारच्या स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्त्व विरासतः**

आंग सान सू की म्यानमारच्या (बर्मा) स्वातंत्र्य आणि लोकशाहीसाठी संघर्ष करणाऱ्या महत्त्वाच्या नेत्या आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली म्यानमारमध्ये स्वातंत्र्य, मानवाधिकार, आणि लोकशाही चळवळीची सुरुवात झाली. जगभरात त्यांना शांतता आणि अहिंसेच्या मार्गाने लढणाऱ्या नेत्या म्हणून ओळखले जाते.

**प्रारंभिक जीवन:**

आंग सान सू की यांचा जन्म १९ जून, १९४५ रोजी यांगून येथे झाला. त्यांचे वडील, आंग सान, हे म्यानमारच्या स्वातंत्र्य लढ्यातील प्रमुख नेते होते. त्यांच्या नेतृत्वाखालीच म्यानमारला ब्रिटिश वसाहतवादातून मुक्तता मिळाली. मात्र, आंग सान यांची हत्या झाली तेव्हा सू की केवळ दोन वर्षांच्या

होत्या. त्यांच्या आईने त्यांचे पालनपोषण केले. सू की लहानपणापासूनच शिक्षण आणि विचारांची गोडी घेऊन मोठ्या झाल्या.

**शिक्षण आणि परदेशातील जीवन:**

आंग सान सू की यांनी यांगूनमधून प्राथमिक शिक्षण घेतले. त्यानंतर त्या परदेशी शिक्षणासाठी भारतात गेल्या. दिल्लीत त्यांनी आपले शालेय शिक्षण पूर्ण केले. नंतर त्या ऑक्सफर्ड विद्यापीठात शिकण्यासाठी इंग्लंडला गेल्या. तिथे त्यांनी तत्त्वज्ञान, राजकारण आणि अर्थशास्त्राचे शिक्षण घेतले.

परदेशात राहून त्यांनी विविध देशांतील लोकशाही विचारसरणी आणि चळवळींचा अभ्यास केला. त्यांच्या विचारांवर महात्मा गांधींच्या अहिंसेच्या तत्त्वज्ञानाचा आणि मार्टिन लूथर किंग यांच्या शांततावादी दृष्टिकोनाचा प्रभाव पडला. परदेशात शिक्षण घेतल्यानंतर सू की यांनी संयुक्त राष्ट्रांसाठी काम केले.

**म्यानमारमध्ये परतणे:**

सन १९८८ मध्ये सू की म्यानमारला परतल्या. त्या काळात म्यानमारमध्ये लष्करी सत्ता होती. या सत्तेकडून जनतेवर कठोर अत्याचार चालू होते. लोकशाहीच्या अभावामुळे देशात अस्वस्थता होती. आंग सान सू की यांनी आपल्या वडिलांच्या स्वप्नानुसार लोकशाही प्रस्थापित करण्याचा निर्धार केला.

**राष्ट्रीय लोकशाही लीगची स्थापना:**

सन १९८८ मध्ये आंग सान सू की यांनी 'नॅशनल लीग फॉर डेमोक्रसी' (NLD) या राजकीय पक्षाची स्थापना केली. हा पक्ष लोकशाही, मानवाधिकार, आणि स्वातंत्र्याच्या आधारावर देशाचा विकास करायला इच्छुक होता. त्यांनी अहिंसेच्या मार्गाने लढा देण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या नेतृत्वाखाली लाखो लोकांनी लोकशाहीसाठी आवाज उठवला.

**घरगुती नजरकैद आणि संघर्ष:**

लष्कराने आंग सान सू की यांचा वाढता प्रभाव पाहून त्यांना धोकादायक नेते मानले. त्यामुळे त्यांना सन १९८९ मध्ये घरात नजरकैदेत ठेवण्यात आले. पुढील अनेक वर्षे त्यांनी घरातूनच लढाई सुरू ठेवली. या काळात त्यांना बाहेरच्या जगाशी संपर्क ठेवण्यास मनाई होती. त्यांच्या शांततावादी आणि अहिंसेच्या लढ्याने जगभरात त्यांना आदर मिळवून दिला.

**शांतता नोबेल पुरस्कार:**

आंग सान सू की यांच्या अहिंसेच्या लढ्यामुळे त्यांना सन १९९१ मध्ये शांततेचा नोबेल पुरस्कार देण्यात आला. हा पुरस्कार त्यांनी म्यानमारच्या लोकांना समर्पित केला. त्यांच्या मते, हा लढा केवळ त्यांचा नसून देशाच्या स्वातंत्र्य आणि लोकशाहीसाठी झुंजणाऱ्या जनतेचा होता.

**लष्करी शासनास विरोध:**

लष्कराने आंग सान सू की यांच्या पक्षाला सत्ता मिळू नये म्हणून निवडणुकीत हस्तक्षेप केला. निवडणुका होऊनही लष्कराने सत्ता ताब्यात ठेवली आणि सू की यांना अनेकदा अटकबंदीत ठेवले. लष्कराच्या दबावामुळे त्यांचा संघर्ष दीर्घकाळ चालला, परंतु त्यांनी कधीच अहिंसा सोडली नाही.

**स्वातंत्र्य आणि लोकशाही लढा:**

आंग सान सू की यांनी नेहमीच म्यानमारच्या लोकांसाठी लोकशाही आणि स्वातंत्र्याची मागणी केली. त्यांचे विचार स्पष्ट होते. त्यांना म्यानमारला स्वतंत्र, शांततावादी, आणि समता असणारे राष्ट्र बनवायचे होते. त्यांनी आपल्या वडिलांच्या स्वप्नांप्रमाणे देशाच्या जनतेला लोकशाही विचारसरणीच्या दिशेने नेले.

**सन २०१० नंतरची स्थिती:**

सन २०१० मध्ये आंग सान सू की यांची नजरकैद संपली. त्यानंतर त्यांनी राजकारणात सक्रिय प्रवेश केला. सन २०१५ मध्ये झालेल्या निवडणुकांमध्ये त्यांच्या पक्षाने 'नॅशनल लीग फॉर डेमोक्रसी' (NLD) मोठा विजय मिळवला. आंग सान सू की यांना देशाच्या राजकारणात महत्त्वाचे स्थान मिळाले, परंतु लष्कराने त्यांच्या सत्तेवर अनेक मर्यादा घातल्या.

**रोहिंग्या संकट आणि टीका:**

आंग सान सू की यांचे नेतृत्व अनेक वर्षे आदर्श मानले गेले. मात्र, सन २०१७ मध्ये म्यानमारमध्ये रोहिंग्या मुस्लिमांविरुद्ध झालेल्या अत्याचारांसाठी त्यांना जागतिक पातळीवर टीकेला सामोरे जावे लागले. अनेकांनी त्यांच्यावर आरोप केले की त्यांनी या मुद्द्यावर निष्क्रियता दाखवली. रोहिंग्या संकटामुळे त्यांच्या शांततावादी प्रतिमेला धक्का बसला.

आंग सान सू की यांचे जीवन आणि कार्य हे म्यानमारच्या स्वातंत्र्य आणि लोकशाहीच्या संघर्षाचे प्रतीक आहे. त्यांनी अहिंसा, शांतता, आणि लोकशाही विचारसरणीच्या आधारावर लढा दिला. त्यांच्या नेतृत्वाखाली म्यानमारमध्ये लोकशाहीच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३**

अ) रिकाम्या जागा भरा.

१. हो ची मिन्ह यांचा जन्म............... रोजी व्हिएतनामच्या न्गुएन राज्यातील एका साध्या कुटुंबात झाला.

अ) २ सप्टेंबर, १९४५ ब) १९ मे, १८९०

क) १० डिसेंबर, १९२० ड) १२ एप्रिल, १९५०

२. हो ची मिन्ह यांनी सन १९३० मध्ये............... या पक्षाची स्थापना केली.

अ) नॅशनल लीग फॉर डेमोक्रसी ब) व्हिएतनाम कम्युनिस्ट पार्टी

क) काँग्रेस पक्ष ड) व्हिएत मिन्ह

३. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात हो ची मिन्ह यांनी............... या संघटनेची स्थापना केली.

अ) नॅशनल लीग फॉर डेमोक्रसी ब) व्हिएत मिन्ह

क) व्हिएतनाम कम्युनिस्ट पार्टी ड) नॅशनल सोशलिस्ट पार्टी

४. आंग सान सू की यांच्या वडिलांचे नाव............... होते.

अ) गुयेन सिंग कुंग ब) हो ची मिन्ह क) आंग सान ड) मार्टिन लूथर किंग

५. आंग सान सू की यांनी सन १९८८ मध्ये............... या पक्षाची स्थापना केली.

अ) व्हिएतनाम कम्युनिस्ट पार्टी ब) नॅशनल लीग फॉर डेमोक्रसी

क) नॅशनल सोशलिस्ट पार्टी ड) कम्युनिस्ट पार्टी ऑफ म्यानमार

६. आंग सान सू की यांना सन १९९१ मध्ये............... पुरस्कार मिळाला.

अ) नोबेल शांतता पुरस्कार ब) साहित्य पुरस्कार

क) आंतरराष्ट्रीय मानवाधिकार पुरस्कार ड) रेमन मॅगसेसे पुरस्कार

७. आंग सान सू की यांनी म्यानमारमध्ये ............... चळवळीचे नेतृत्व केले.

अ) समाजवादी ब) साम्यवादी क) लोकशाही ड) वसाहतवादविरोधी

ब) जोड्या जुळवून योग्य पर्याय निवडा.

| गट १ | गट २ |
| --- | --- |
| १) हो ची मिन्ह | अ) व्हिएतनाम कम्युनिस्ट पार्टी |
| २) आंग सान सू की | ब) नॅशनल लीग फॉर डेमोक्रस |
| ३) आंग सान | क) म्यानमार |
| ४) हो ची मिन्ह निधन | ड) २ सप्टेंबर, १९६९ |

अ) १-ब , २- अ , ३ -क , ४- ड ब) १-अ , २- ब , ३ -क , ४- ड

क) १-क, २- अ , ३ -ब , ४- ड ड) १-ब , २- ड , ३ -क , ४- अ

क) योग्य पर्याय निवडा.

विधान १ : हो ची मिन्ह यांच्यावर लोकशाही विचारसरणीचा खूप प्रभाव होता.

विधान २ : सन १९९१ मध्ये, सु की यांना लोकशाही आणि मानवी हक्कांसाठी अहिंसक संघर्षासाठी नोबेल शांतता पुरस्कार देण्यात आला.

१) पहिले विधान बरोबर, दुसरे विधान चुकीचे.

२) दुसरे विधान बरोबर, पहिले विधान चुकीचे.

३) दोन्ही विधाने बरोबर.

४) दोन्ही विधाने चुकीची.

## २.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

- **निर्वसाहतीकरण:** अशी प्रक्रिया ज्याद्वारे वसाहती, वसाहतवादी देशांपासून स्वतंत्र होतात.
- **आत्मनिर्णय:** बाह्य प्रभावाशिवाय स्वतःचे सरकार निवडण्याचा लोकांचा अधिकार.
- **सार्वभौमत्व :** सर्वोच्च सत्ता किंवा अधिकार; राज्याचा स्वतःवर राज्य करण्याचा अधिकार.
१९ व्या शतकात युरोपियन देशांनी आफ्रिका खंडात वसाहतवादी प्रक्रियेतुन आफ्रिकेतील मोठ्या भागावर ताबा मिळवून स्थानिक लोकांना गुलाम बनवले. त्यांनी आफ्रिकेतील नैसर्गिक संसाधनांचे शोषण केले. यामुळे आफ्रिकन समाजावर मोठा अन्याय होऊन लोकांमध्ये असंतोष निर्माण झाला.

**२. वसाहतवादाचा परिणाम:**

वसाहतवादामुळे आफ्रिकन लोकांच्या जीवनावर अनेक नकारात्मक परिणाम घडून आले. त्यांचे सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अधिकार हिरावले गेले. आफ्रिकन लोकांवर कडक नियम लादले

गेले. त्यांना सार्वजनिक ठिकाणी फिरण्याचे, शाळेत जाण्याचे आणि सरकारी नोकरी करण्याचे हक्क नाकारले गेले. यामुळे आफ्रिकेत मोठ्या प्रमाणात असंतोष पसरला. आपले नागरी हक्क मिळवण्यासाठी तेथे नागरी हक्कांच्या चळवळी रुजल्या. तत्पूर्वी बहुतेक आफ्रिकन राष्ट्रे युरोपियन वसाहतींच्या नियंत्रणाखाली होती. ब्रिटन, फ्रान्स, पोर्तुगाल, बेल्जियम आणि इतर युरोपीय शक्तींनी आफ्रिका खंडाचे विभाजन केले. तेथील नैसर्गिक संसाधनांचे शोषण केले आणि स्थानिक लोकसंख्येचा श्रमासाठी वापर केला. वसाहतवादी राजवटींनी निर्माण केलेली जाचक परिस्थिती, वंशवाद, भेदभाव, आर्थिक शोषण आणि स्थानिक संस्कृतींचे उच्चाटन इत्यादी गोष्टी नागरी हक्कांच्या लढ्यांसाठी प्रेरक ठरल्या.

वसाहतींमधील प्रशासनांनी आफ्रिकन समुदायांना उपेक्षित ठेवणारी भेदभावपूर्ण धोरणे आखली. जमिनीच्या वापरावर मर्यादा घातल्या, आर्थिक क्षेत्रातील संधी मर्यादित केल्या. या धोरणांमुळे अनेक आफ्रिकन राष्ट्रांमध्ये प्रतिकाराची मालिका सुरू झाली. शेवटी २० व्या शतकाच्या मध्यंतरी अधिक संघटित नागरी हक्क चळवळीचा पाया रचला गेला.

३. **वर्णभेद** (Apartheid) :

दक्षिण आफ्रिकेत वर्णभेदाची पद्धत सुरु करण्यात आली. या पद्धतीमध्ये अल्पसंख्यांक गोऱ्या लोकांना विशेषाधिकार मिळाले आणि काळ्या लोकांना दडपशाहीचा सामना करावा लागला. काळ्या लोकांना शाळांमध्ये प्रवेश नव्हता, सार्वजनिक ठिकाणी जाण्यास बंदी होती आणि त्यांचे राजकीय हक्क नाकारले जात होते. वर्णभेदाच्या या पद्धतीमुळे दक्षिण आफ्रिकेतील काळ्या लोकांमध्ये असंतोषाची मोठी भावना निर्माण केली.

४. **नागरी हक्क चळवळींची सुरुवात:**

आफ्रिकन लोकांनी वसाहतवाद आणि वर्णभेदाच्या विरोधात नागरी हक्क चळवळी सुरु केल्या. या चळवळींनी लोकांना त्यांच्या अधिकारांसाठी लढण्याची प्रेरणा दिली. अनेक नेत्यांनी या चळवळींचे नेतृत्व केले आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली आफ्रिकन लोकांनी शांतीपूर्ण आंदोलन सुरू केले. घाना, दक्षिण आफ्रिका, नायजेरिया या देशांत नागरी हक्क चळवळी सुरु झाल्या.

५. **नागरी हक्क चळवळींची तत्त्वे (उद्देश) :**

**(१) समानतेचा लढा:** नागरी हक्क चळवळींचा मुख्य उद्देश आफ्रिकन लोकांना समान अधिकार मिळवून देणे हा होता. वर्णभेद आणि वसाहतवादाच्या अन्यायकारक व्यवस्थेविरोधात हा लढा होता. या चळवळींनी आफ्रिकन समाजाला जागरूक केले.

**(२) शांततामय मार्ग:** काही चळवळींनी महात्मा गांधी यांच्या अहिंसा तत्त्वाचा अवलंब केला. शांततेच्या मार्गाने हक्क मिळवण्यासाठी लढण्याचे आवाहन केले. यामुळे अनेक ठिकाणी शांततामय मार्गाने आंदोलने झाली.

**(३) सशस्त्र संघर्ष:** आफ्रिकेतील काही देशांमध्ये परिस्थिती इतकी गंभीर होती की, तेथे सशस्त्र संघर्ष घडून आले. विशेषत: केनियाला स्वातंत्र्य मिळवून देणारी माउ माउ चळवळ हा एक सशस्त्र लढा होता.

### ६. प्रमुख नेते:

आफ्रिकेतील नागरी हक्क चळवळीमध्ये नेल्सन मंडेला, क्वामे नक्रुमाह, ज्युलियस न्येरेरे इत्यादी प्रमुख नेते होते. (विस्ताराने माहिती पुढे दिली आहे.)

### ७. आंतरराष्ट्रीय समर्थन:

आफ्रिकेतील नागरी हक्क चळवळींना आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठा पाठिंबा मिळाला. संयुक्त राष्ट्रसंघाने आफ्रिकेतील नागरी हक्कांच्या चळवळींना पाठिंबा दिला. अनेक आंतरराष्ट्रीय संघटनांनी आफ्रिकन राष्ट्रांना, तेथील जनतेला विविध स्वरूपाची मदत केली.

### ८. नागरी हक्क चळवळींचे परिणाम:

**(१) स्वातंत्र्याची प्राप्ती:** नागरी हक्क चळवळींमुळे अनेक आफ्रिकन देश स्वतंत्र झाले. इ. स. १९६० ते इ. स. १९८० च्या दशकात घाना, नायजेरिया, केनिया, टांझानिया, झांबिया यासारख्या देशांनी वसाहतवादाच्या जोखडातून मुक्त होत आपले स्वातंत्र्य मिळवले.

**(२) वर्णभेद संपुष्ट: दक्षिण आफ्रिकेत वर्णभेद** (Apartheid) पद्धतीचा अखेर इ. स. १९९४ मध्ये अंत झाला. नेल्सन मंडेलांच्या नेतृत्वाखाली दक्षिण आफ्रिकेत एक सर्वसमावेशक लोकशाही राज्य निर्माण झाले.

**(३) आफ्रिकन एकता संघटना:** इ. स. १९६३ मध्ये आफ्रिकन एकता संघटनेची स्थापना झाली. यामुळे आफ्रिकेतील राष्ट्रांमध्ये सहकार्य वाढले आणि आफ्रिकन राष्ट्रांनी परस्पर सहकार्याने विकासाचे धोरण अवलंबले.

### ९. सांस्कृतिक परिवर्तन:

नागरी हक्क चळवळींनी आफ्रिकन समाजाच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनावर मोठा परिणाम केला. आफ्रिकन संस्कृतीला नव्याने ओळख मिळवून दिली.

## आफ्रिकेतील नागरी हक्कांच्या प्रमुख चळवळींचा तपशील:

### १. दक्षिण आफ्रिका : वर्णभेद विरोधी चळवळ:

जागतिक स्तरावर सर्वात जास्त मान्यताप्राप्त नागरी हक्क चळवळ म्हणजे दक्षिण आफ्रिकेतील वर्णभेदाविरुद्धचा संघर्ष होय. आफ्रिकेतील गोऱ्या अल्पसंख्याक सरकारने इ.स. १९४८ ते इ.स. १९९४ या काळात वर्णभेद, वांशिक भेदभावाची पद्धत आफ्रिकेत लागू केली होती.

**आफ्रिकन नॅशनल काँग्रेस** (ANC): दक्षिण आफ्रिकेतील कृष्णवर्णीयांच्या हक्कांसाठी लढा देण्यासाठी इ.स. १९१२ मध्ये आफ्रिकन नॅशनल काँग्रेसची स्थापना करण्यात आली. कालांतराने, आफ्रिकन नॅशनल काँग्रेस (ANC) ही संघटना वर्णभेदविरोधी लढ्यातील आघाडीची संघटना बनली. नेल्सन मंडेला, ऑलिव्हर

टॅम्बो आणि वॉल्टर सिसुलू यांसारख्या प्रमुख व्यक्तींनी लोकांना संघटीत करण्यात आणि आंतरराष्ट्रीय पाठिंबा मिळवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. इ.स. १९६० मध्ये शार्पविले येथे शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करणाऱ्या ६९ आंदोलकांना पोलिसांनी ठार मारले, ही एक महत्त्वपूर्ण घटना होती. यामुळे ANC ने अहिंसक प्रतिकार सोडून आपली लष्करी शाखा उमखोंतो वी सिझवे सुरू केली आणि त्याच्यामार्फत सशस्त्र संघर्षाचा मार्ग स्वीकारला.

**आंतरराष्ट्रीय बहिष्कार आणि निर्बंध:** दक्षिण आफ्रिकेतील नागरी हक्क संघर्षात जागतिक समुदायाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. संयुक्त राष्ट्रांनी दक्षिण आफ्रिकेवर शस्त्रास्त्र निर्बंध लादले आणि जगभरातील असंख्य देश, कार्यकर्ते आणि संघटनांनी दक्षिण आफ्रिकेच्या वस्तूंवर बहिष्कार टाकण्याचे आवाहन केले. कलाकार आणि खेळाडूंनीही दक्षिण आफ्रिकेत प्रदर्शन किंवा स्पर्धा करण्यास नकार देऊन निषेध केला. आर्थिक निर्बंध हे वर्णभेद कमकुवत करण्याचे एक शक्तिशाली साधन बनले.

**वर्णभेद समाप्त करणे:** इ.स. १९८० च्या दशकात, वाढत्या अंतर्गत प्रतिकारामुळे, आंतरराष्ट्रीय दबावामुळे, दक्षिण आफ्रिकेच्या सरकारला आपल्या धोरणांचा पुनर्विचार करण्यास भाग पडले. इ.स. १९९० मध्ये नेल्सन मंडेला यांची तुरुंगातून सुटका झाली. त्यानंतर इ.स. १९९४ मध्ये बहु-वांशिक निवडणुकांमुळे अधिकृतपणे वर्णभेद संपुष्टात आला. नागरी हक्क चळवळीच्या विजयाचे प्रतीक असलेले नेल्सन मंडेला हे दक्षिण आफ्रिकेतील पहिले कृष्णवर्णीय अध्यक्ष बनले.

२. **घाना : स्वातंत्र्य आणि पॅन-आफ्रिकनवादासाठी संघर्ष:**

घाना हे (पूर्वीचे गोल्ड कोस्ट) वसाहती राजवटीपासून स्वातंत्र्य मिळविणाऱ्या पहिल्या आफ्रिकन राष्ट्रांपैकी एक होते. त्याचा नागरी हक्क संघर्ष संपूर्ण आफ्रिका खंडातील वसाहतीकरणाच्या व्यापक लढ्याशी संबंधित आहे.

**क्वामे नकृम्हा आणि कन्व्हेन्शनल पीपल्स पार्टी** (CPP): नकृम्हा हे स्वातंत्र्याच्या लढ्यातील आणि आफ्रिकेच्या एकीकरणाचे समर्थन करणारे एक प्रमुख व्यक्तिमत्व होते. त्यांनी इ.स. १९४९ मध्ये सी.पी.पी.ची स्थापना केली. त्यांनी वसाहतवादी अधिकाऱ्यांशी असहकार करून जनतेला एकत्र केले. त्यांनी ''सकारात्मक कृती'' मोहीम राबवली. यामध्ये संप, बहिष्कार आणि निषेध इ. चा समावेश होता.

**पॅन-आफ्रिकनवाद:** नकृम्हा यांचा दृष्टीकोन व्यापक होता. ते देशाच्या पलीकडे विचार करणारे पॅन-आफ्रिकनवादाचे समर्थक होते. आफ्रिकन देशांनी वसाहतवादी आणि नववसाहतवादी दडपशाहीवर मात करण्यासाठी एकत्र आले पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. इ.स. १९६३ मध्ये ऑर्गनायझेशन ऑफ आफ्रिकन युनिटी (OAU) ची झालेली स्थापना हा नकृम्हा यांच्या मुत्सद्देगिरीचा अंशतः परिणाम होता. इ.स. १९६६ मध्ये सत्तापालट होऊन नकृम्हा यांचे सरकार उलथून टाकण्यात आले. तरीही नागरी हक्क आणि आफ्रिकेतील स्वातंत्र्य चळवळींवर त्यांचा प्रभाव कायम राहिला.

### ३. केनिया : माऊ माऊ उठाव :

केनियामध्ये इ.स. १९५२-१९६० या काळात झालेला माऊ माऊ उठाव ही देशाच्या स्वातंत्र्य आणि नागरी हक्कांसाठी झालेल्या लढ्यातील एक महत्त्वाची घटना होती. माऊ माऊ चळवळ प्रामुख्याने किकुयू लोकांची चळवळ होती. त्यांनी ब्रिटीश वसाहतवादी राजवटी आणि त्याखाली झालेल्या जमिनीच्या बळजबरी अपहरणाविरुद्ध मोठा लढा दिला होता.

**वसाहतवादी दडपशाही आणि जमीन विल्हेवाट:** केनियातील ब्रिटिश वसाहतीवादी सरकारने युरोपियन स्थायिक लोकांसाठी सुपीक जमिनीचा मोठा भूभाग ताब्यात घेतला होता. यामुळे किकुयू लोकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली. त्यांच्यापैकी अनेकांवर कमी वेतनावर मजुरी करण्यासाठी बळजबरी करण्यात आली होती.

**उठाव :** माऊ माऊ उठावाने ब्रिटिशांविरुद्ध गनिमी युद्ध सुरू केले. वसाहतीतील अधिकारी आणि त्यांचे स्थानिक आफ्रिकन सहयोगी यांना लक्ष्य केले. ब्रिटीशांनी क्रूरपणे प्रत्युत्तर दिले. युद्धाबंदी ठेवण्यासाठी छावण्या सुरु केल्या. या छावण्यांमधील हजारो संशयितांचा छळ करण्यात आला किंवा त्यांना ठार मारले गेले. अंदाजे २०,००० पेक्षा जास्त आफ्रिकन लोक मारले गेले. माऊ माऊचा अखेरीस लष्करी पराभव झाला. तरीही ब्रिटीश राजवट जास्त काळ टिकू शकत नाही, हे या उठावाने स्पष्ट केले. इ.स. १९६३ मध्ये केनियाला स्वातंत्र्य मिळाले. जोमो केन्याट्टा हे देशाचे पहिले राष्ट्राध्यक्ष बनले. त्यांना उठावादरम्यान तुरुंगवास भोगावा लागला होता.

### ४. अल्जेरिया : स्वातंत्र्यासाठी युद्ध :

अल्जेरियाची नागरी हक्क चळवळ ही फ्रेंच वसाहतवादी राजवटीपासून स्वातंत्र्य मिळवण्यासाठी झालेली चळवळ होती. इ.स. १९५४ ते इ.स. १९६२ या काळात झालेले अल्जेरियन युद्ध हे आफ्रिकन वसाहतवादाच्या इतिहासातील सर्वात रक्तरंजित संघर्षांपैक एक होते.

**वसाहतवादी शोषण :** अल्जेरियातील फ्रेंच वसाहतवादी राजवट वांशिक भेदभाव, आर्थिक शोषण आणि स्थानिक लोकसंख्येच्या राजकीय हक्कभंगासाठी ओळखली जाते. फ्रेंच लोकांनी अल्जेरियामध्ये मोठ्या संख्येने युरोपियन लोकांना स्थायिक केले होते. या स्थायिकांनी अनेक विशेषाधिकारांचा आनंद लुटला होता. मात्र स्थानिक लोकांना शिक्षणापासून रोजगार आणि राजकीय प्रतिनिधित्वापर्यंत जीवनाच्या जवळजवळ प्रत्येक क्षेत्रात भेदभावाचा सामना करावा लागला.

**नॅशनल लिबरेशन फ्रंट** (NLF) : NLF ही अल्जेरियन स्वातंत्र्याच्या लढ्याचे नेतृत्व करणारी प्रमुख संघटना होती. त्यांनी गनिमी युद्धपद्धतीद्वारे अनेक फ्रेंच सैनिक आणि नागरिकांना लक्ष्य केले होते. प्रत्युत्तरादाखल, फ्रेंच सरकारने बंडाच्या विरोधात कठोर उपाययोजना लागू केल्या. यावेळी केलेल्या छळामुळे व्यापक मानवी हक्कांचे उल्लंघन झाले.

**आंतरराष्ट्रीय सहभाग :** अल्जेरियन युद्धाने आंतरराष्ट्रीय लक्ष वेधून घेतले. NLF ला इतर आफ्रिकन आणि अरब राष्ट्रांकडून तसेच सोव्हिएत युनियन आणि चीनसारख्या समाजवादी देशांकडून पाठिंबा मिळाला. संयुक्त राष्ट्रसंघानेही शांततापूर्ण मार्गाने संघर्षाचे निराकरण करण्याचे आवाहन केले.

**स्वातंत्र्यप्राप्ती :** बऱ्याच वर्षांच्या क्रूर लढाईनंतर इ.स. १९६२ मध्ये युद्धविरामावर सहमती झाली आणि अल्जेरियाला स्वातंत्र्य मिळाले. युद्धामध्ये हजारो अल्जेरियन लोकांना प्राण गमवावे लागले. तरीही अल्जेरियाच्या विजयाने इतर आफ्रिकन देशांना नागरी हक्क आणि स्वातंत्र्यासाठी स्वतःचा संघर्ष सुरू ठेवण्याची प्रेरणा दिली.

### ५. झिम्बाब्वे : मुक्ती संघर्ष :

झिम्बाब्वेची नागरी हक्कांची चळवळ ही गोऱ्या राजवटीविरुद्ध स्वातंत्र्य चळवळ होती. पूर्वी दक्षिणी ऱ्होडेशिया, झिम्बाब्वेवर युरोपियन अल्पसंख्याक असलेल्या स्थायिकांच्या सरकारचे राज्य होते. त्यांनी कृष्णवर्णीय बहुसंख्याकांना राजकीय आणि आर्थिक अधिकार नाकारले होते.

**ऱ्होडेशियन बुश युद्ध (इ.स. १९६४ इ.स. १९७९) :** इयान स्मिथ यांच्या नेतृत्वाखालील गोरे-अल्पसंख्याक सरकार आणि आफ्रिकन बहुसंख्याक यांच्यातील संघर्ष ऱ्होडेशियन बुश युद्ध म्हणून ओळखला जातो. झिम्बाब्वे आफ्रिकन नॅशनल युनियन (ZANU) आणि झिम्बाब्वे आफ्रिकन पीपल्स युनियन (ZAPU) या आफ्रिकन स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करणाऱ्या प्रमुख चळवळी होत्या. त्यांनी ऱ्होडेशियन सरकारविरुद्ध गनिमी युद्ध पुकारले.

**लँकेस्टर हाऊस करार :** अनेक वर्षांच्या संघर्षानंतर आणि आंतरराष्ट्रीय दबावानंतर, लँकेस्टर हाऊस करारावर इ.स. १९७९ मध्ये स्वाक्षरी करण्यात आली. त्यामुळे इ.स. १९८० मध्ये खुल्या वातावरणात निवडणुका झाल्या. रॉबर्ट मुगाबे यांच्या ZANU-PF पक्षाने निवडणुका जिंकल्या आणि झिम्बाब्वेला स्वातंत्र्य मिळाले. मुगाबे पहिले पंतप्रधान बनले. झिम्बाब्वेच्या स्वातंत्र्यलढ्याकडे नागरी हक्कांचा विजय म्हणून पाहिले जात होते. पण मुगाबेच्या राजवटीत राजकीय घडामोडींमध्ये मानवाधिकारांचे उल्लंघन, अयोग्य निवडणूक हाताळणी आणि आर्थिक गैरव्यवस्थापन दिसून आले.

### ६. नायजेरिया : लष्करी नियम आणि वांशिक तणावाविरूद्ध लढा :

नायजेरियाच्या नागरी हक्कांच्या संघर्षांना त्याच्या वैविध्यपूर्ण वांशिक रचना, आर्थिक असमानता आणि लष्करी हुकूमशाहीच्या कालखंडाने आकार दिला. इ.स. १९६० मध्ये ब्रिटनपासून स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नायजेरियाने सत्तापालट, लष्करी राजवटी आणि नागरी संघर्षांचा अनुभव घेतला.

**बायफ्रान युद्ध (इ.स. १९६७ – इ.स. १९७०) :** नायजेरियाच्या इतिहासातील सर्वात लक्षणीय नागरी हक्क चळवळीपैकी एक म्हणजे बायफ्रान युद्ध होय. त्याला नायजेरियन गृहयुद्ध असे देखील म्हटले जाते. आग्नेय भागातील इग्बो लोक आणि उत्तरेकडील हौसा-फुलानी यांच्यातील वांशिक आणि धार्मिक तणावामुळे

हे युद्ध सुरू झाले होते. इग्बोने बियाफ्रान हे स्वतंत्र राज्य वेगळे करण्याचा प्रयत्न केला गेला. त्यामुळे एक क्रूर संघर्ष झाला. या संघर्षामध्ये दहा लाखांहून अधिक लोकांचा मृत्यू झाला.

**लोकशाहीचे संक्रमण :** इ.स. १९९० च्या दशकात, नायजेरियामध्ये लष्करी राजवटीविरुद्ध व्यापक निषेध आणि नागरी प्रतिकार चळवळी झाल्या. कॅम्पेन फॉर डेमोक्रसी आणि मानवाधिकार गट यांसारख्या संस्थांनी नागरी प्रशासन, निष्पक्ष निवडणुका आणि मानवी हक्कांच्या संरक्षणाची मागणी केली. इ.स. १९९९ मध्ये, नायजेरियामध्ये अनेक दशकांच्या लष्करी शासनानंतर लोकशाही सरकार स्थापन झाले. तरीही देशाला जातीय भेदाभेद, भ्रष्टाचार आणि मानवी हक्कांचे उल्लंघन अशा आव्हानांचा सामना करावा लागत आहे.

**मूल्यमापन:**

आफ्रिकेतील नागरी हक्क चळवळींचे महत्त्व खूप मोठे आहे. या चळवळींनी वसाहतवाद, वर्णभेद, आणि अन्यायकारक व्यवस्थेविरुद्ध संघर्ष केला. आफ्रिकन लोकांना मानवी हक्क, समानता आणि स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी या चळवळींनी निर्णायक भूमिका बजावली.

घाना, दक्षिण आफ्रिका आणि नायजेरियासारख्या देशांमध्ये विविध चळवळींनी लोकांना एकत्र आणले. विशेषत: नेल्सन मंडेला, क्वामे नक्रुमाह आणि ज्युलियस न्येरेरे यांसारख्या नेत्यांनी या चळवळींचे नेतृत्व केले. त्यांच्या शांततामय आणि सशस्त्र संघर्षांनी आफ्रिकन समाजात मोठे बदल घडवले.

दक्षिण आफ्रिकेत वर्णभेद व्यवस्थेचा (Apartheid) अंत झाला आणि इ.स. १९९४ मध्ये नेल्सन मंडेला दक्षिण आफ्रिकेचे पहिले काळे राष्ट्राध्यक्ष झाले. यामुळे आफ्रिकेतील लोकशाहीला चालना मिळाली. अनेक आफ्रिकन राष्ट्रांनी स्वातंत्र्य मिळवून आपल्या विकासाचा मार्ग तयार केला.

या चळवळींमुळे आफ्रिकन संस्कृतीला नव्याने महत्त्व प्राप्त झाले. आंतरराष्ट्रीय पातळीवर या चळवळींना पाठिंबा मिळाला. त्यामुळे आफ्रिकन समाजाला अधिक स्थैर्य मिळू शकले. तसेच त्यांचा विकास घडून येण्यास मदत झाली.

नागरी हक्क चळवळी आफ्रिकेतील सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय परिवर्तनाचे प्रमुख साधन ठरल्या. या चळवळींचा वारसा आजही आफ्रिकेतील लोकशाही आणि मानवी हक्कांसाठी प्रेरणा देणारा आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–१**

अ) रिकाम्या जागा भरा (चार पर्यायांसह)

१. आफ्रिकन नॅशनल काँग्रेस (ANC) ची स्थापना इ.स. …………… मध्ये झाली.

अ) १९१२ ब) १९२० क) १९४८ ड) १९९०

२. दक्षिण आफ्रिकेतील शार्पविले हत्याकांड इ. स. …………… या वर्षी घडले.

अ) १९५० ब) १९६० क) १९७० ड) १९८०

३. घानाला वसाहती राजवटीपासून स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या नेत्या.............. यांनी 'सकारात्मक कृती' मोहीम राबवली.

अ) नेल्सन मंडेला ब) क्वामे नकृम्हा क) जोमो केन्याटा ड) ऑलिव्हर टॅम्बो

४. माऊ माऊ उठाव इ.स. ............... या वर्षी सुरू झाला.

अ) १९४० ब) १९५२ क) १९६० ड) १९७०

५. अल्जेरियन स्वातंत्र्याचा लढा इ.स. ............... या वर्षी संपला.

अ) १९५४ ब) १९५८ क) १९६२ ड) १९७५

६. झिम्बाब्वेचा स्वातंत्र्यसंग्राम ............... करारानंतर संपला.

अ) नॉर्मंडी ब) लँकेस्टर हाऊस क) याल्टा ड) जेनेवा

७. नायजेरियातील बायफ्रान युद्ध इ.स. ............... या वर्षी संपले.

अ) १९६० ब) १९६७ क) १९७० ड) १९८०

ब) जोड्या जुळवून योग्य पर्याय निवडा.

| गट १ | गट २ |
|---|---|
| १) घाना | अ. १९६३ |
| २) केनिया | ब. १९६० |
| ३) माऊ माऊ उठाव | क. १९५२ |
| ४) काँगो | ड. १९५७ |

अ) १-ब, २-अ, ३-क, ४-ड ब) १-अ, २-ब, ३-क, ४-ड

क) १-ड, २-अ, ३-ब , ४-क ड) १-ब, २-ड, ३-क, ४-अ

क) योग्य पर्याय निवडा.

विधान १ : अफ्रिकेतील नागरी हक्क चळवळीने १९ व्या शतकाच्या मध्यापासून, संपूर्ण आफ्रिका खंडातील राजकीय आणि सामाजिक संरचनांवर खोलवर प्रभाव टाकला आहे.

विधान २ : अल्जेरियाच्या विजयाने इतर युरोपीय देशांना नागरी हक्क आणि स्वातंत्र्यासाठी स्वतःचा संघर्ष सुरू ठेवण्याची प्रेरणा दिली.

१) पहिले विधान बरोबर, दुसरे विधान चुकीचे.

२) दुसरे विधान बरोबर, पहिले विधान चुकीचे.

३) दोन्ही विधाने बरोबर.

४) दोन्ही विधाने चुकीची.

### ४.२.२ स्त्रीवादी चळवळ : अमेरिका

इ. स. १९९० च्या जनगणनेनुसार अमेरिकेमध्ये स्त्रियांची संख्या पुरुषांच्या संख्येपेक्षा जवळजवळ ६८ लाखाने अधिक भरली आणि तरीसुद्धा त्यांची गणना 'अल्पसंख्याक' केली जाते. ही अमेरिकेतील विसंगतीपूर्ण शोकांतिका आहे. अमेरिकेमध्ये स्त्रियांसंबंधी अतिशय परंपरागत दृष्टिकोन अस्तित्वात होता. विज्ञान तंत्रज्ञानाने प्रगत अशा अमेरिकन राष्ट्राला आपल्या राष्ट्राचा पायाभूत घटक असणाऱ्या स्त्री हक्काच्या नैतिक आणि तितक्याच संवेदनशील प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी २० वे शतक उजाडावे लागले. स्त्रियांचे कार्यक्षेत्र पती, मुल व कुटुंबापर्यंतच मर्यादित करण्यात अमेरिकाही मागे नव्हती. स्त्रियांचे एक व्यक्ती म्हणून अस्तीत्व मान्य करण्यास अमेरिकासुद्धा मागेच पडल्याचे दिसून येते. पुरूषप्रधान व्यवस्थेने स्त्रीला नेहमीच दुय्यम स्थान दिलेले असून सातत्याने स्त्रियांच्या आत्मविश्वासाचे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न केलेला आढळतो. 'स्त्रियांच्या शोषणाला कारणीभूत ठरलेली पुरूषप्रधान व्यवस्था नष्ट करण्याची भाषा स्त्रीवाद करतो.' प्रस्थापित पुरूषप्रधान व्यवस्था नष्ट करून स्त्रियांच्या हक्कांना महत्त्व देणारी आणि स्त्रियांच्या विकासाला वाव देऊन नवसमाजरपनेची मांडणी करणाऱ्या विचारप्रणालीला 'स्त्रीवाद' म्हणतात. मूलतः स्त्रीवाद म्हणजे स्त्रियांच्या हक्कांमध्ये भर घालणारी विचारप्रणाली नसून समाज परिवर्तनाचा मार्ग दाखविणारी आणि परिवर्तनाचा प्रचार आणि प्रसार करणारी विचारधारा आहे. इ. स. १९६० च्या दशकानंतर विविध राष्ट्रांमधील राज्यव्यवस्थांनी सामाजिक चळवळीचा नेमका अर्थ लावताना हे लक्षात आले की स्त्रीवादी विचाराची पार्श्वभूमी व स्त्रीवादाचा प्रवाह खूप जूना व बहुआयामी, बहुमितीय आहे आणि स्त्रीवाद ही एक राजकीय प्रणाली आहे.

**स्त्रीवाद म्हणजे काय?**

स्त्रीवादी अभ्यासक लिंडा यांनी आपल्या 'यू वुमन' या ग्रंथात 'स्त्रीवाद' या शब्दाचा सर्वप्रथम वापर इ. स. १८९० मध्ये केला. एलीन डयूवोयस यांनी इ. स. १९१० मध्ये 'स्त्रीवाद आणि मताधिकार' या विषयावर लिहिलेल्या संशोधन लेखात राजकीय चळवळ या हेतूने स्त्रीवाद हा शब्द वापरला. स्त्रीवाद या शब्दाचा वापर खूप पूर्वीपासून केला जात असला तरी सशक्त विचारधारा म्हणून ही संकल्पना २० व्या शतकात उदयास आली. स्त्रीवाद ही राजकीय प्रणाली आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. स्त्रीयांच्या अधिकारांचा पुरस्कार करणारी स्त्रीवाद ही सर्वसमावेशक विचारसरणी आहे. स्त्रीला आपल्या क्षमता सिद्ध करण्यासाठी समाजाने पुरूषाच्या बरोबरीने संधी उपलव्ध करून दिली पाहिजे, ही स्त्रीवादाची प्रमुख मागणी असून लिंगभेदाधिष्ठीत राजकारणाविरूद्ध संघर्ष करणारी कृतिशिल विचारधारा म्हणजेच स्त्रीवाद होय.

**स्त्रीवादाच्या व्याख्या:–**

'फेमिनिझम' हा मूळ लॅटिन शब्द आहे. फेमिना याचा अर्थ वूमन असून स्त्रियांना त्यांच्या बाईपणामुळे दुय्यमत्व मिळते. जीवनाच्या सर्वच क्षेत्रातील स्त्रीयांचे शोषण आणि दुय्यमत्व नष्ट करणे म्हणजे स्त्रीवाद होय.

१) वेबस्टर शब्दकोषानुसार, ''स्त्रीवाद म्हणजे स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने समान राजकीय अधिकार देणे होय.''

२) तत्वज्ञान शब्दकोशानुसार, ''स्त्रियांच्या हक्कांचे समर्थन करणारा विचार म्हणजे स्त्रीवाद होय.''

३) सिमॉन दि बूव्हा यांच्या मते ''स्त्रीवाद म्हणजे केवळ स्त्री हक्काचे समर्थन नसून स्त्रीची 'स्त्री' म्हणून ओळख करून देणारी आणि स्त्रियांच्या प्रश्नांविषयी समाजामध्ये आस्था विकसीत करणारी विचारधारा आहे.''

एकंदरीतच पुरुषांच्या बरोबरीने समान राजकीय, सामाजिक आणि आर्थिक अधिकार मिळविण्यासाठी चालू असलेला तात्विक संघर्ष म्हणजे स्त्रीवाद होय.

**स्त्रीवादी चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी:–**

जागतिक इतिहासामध्ये प्रारंभीचा टप्पा हा मातृप्रधान कुटुंबव्यवस्थेचा होता. ज्यात स्त्रियांचे स्थान पुरुषांपेक्षा वरचे होते. कृषीसंस्कृतीची स्थापनाच मूळी स्त्रियांनी केली. पुढे 'श्रमविभागणी' मुळे स्त्रियांना दुय्यमत्व बहाल केले आणि धर्मग्रंथांनी तर स्त्रियांच्या अस्तित्वाला उपभोग्य वस्तूच मानले. सरंजामशाही कालखंडामध्ये स्त्रियांच्या व्यक्तिमत्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण करण्यात आले. विज्ञानाच्या उदयातून इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली. त्यातून वसाहतवाद व वसाहतवादातून साम्राज्यवाद उदयाला आला. वर्चस्ववादी सत्तांनी वसाहतवाद व साम्राज्यवादांच्या प्रारंभिक अवस्थेमध्ये स्त्रियांच्या अस्तित्वाला दुय्यम स्थान देण्याचेच धोरण अंगिकारले. मात्र फ्रेंच राज्यक्रांती, स्वातंत्र्य, समता व बंधुतेचा विचार, पहिले महायुद्ध, अमेरिकेतील व जगातील चळवळी या घटनांनी स्त्रीवादाला चालना दिली. स्त्रियांनी आपल्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी स्वतंत्रपणे व सामुहिकपणे प्रयत्न सुरू केले. कामाच्या ठिकाणच्या प्रश्नापासून ते वैयक्तिक प्रश्न याची चर्चा करावयास स्त्रीया पुढे येवू लागल्या.

मेरी वालस्टोन क्रॉफ्ट यांच्या 'दि व्हिंडीकेशन ऑफ द राईटस ऑफ वुमन' या ग्रंथाने महिलांच्या अधिकाराबद्दल सर्वप्रथम आवाज उठवला. हा ग्रंथ म्हणजे स्त्रियांच्या प्रश्नांची वैचारिक मांडणी करणारा पहिला प्रयत्न मानला जातो. पुढे स्त्रियांच्या आर्थिक आणि लैंगिक प्रश्नासंबंधी विस्ताराने मांडणी करण्यात येऊ लागली. स्त्रियांचे दुयमत्व नष्ट करण्यासाठी विविध नाटके, पुस्तके व व्याख्यानांतून ही चळवळ सक्षमपणे पुढे आली.

अमेरिकेत लुसी स्टीन यांनी महिला आंदोलन सुरू केले. इ.स. १८९० नंतर स्त्रियांना मतदानाचा हक्क असावा, या राजकीय मागणीसाठी विविध देशांत चळवळी सुरू झाल्या. इंग्लंडमध्ये मतदान अधिकारासाठी झालेल्या आंदोलनातून स्त्री चळवळीला व्यापक दिशा मिळाली. स्त्रियांच्या महायुद्धातील कार्यामुळे प्रभावित होवून इंग्लंडने त्यांना मतदानाचा अधिकार बहाल केला. इ.स. १९१० मध्ये कोपनहेग येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदेने जगातील स्त्रियांच्या हक्काचे स्मरण करण्यासाठी ८ मार्च हा जागतिक 'महिला दिन' म्हणून साजरा केला जावा, हा ठराव संमत केला.

इ.स. १९२० ते इ.स. १९६० हा स्त्रीवादी चळवळीसाठी प्रतिक्रांतीचा काळ मानला जातो. मात्र इ.स. १९४८ मध्ये युनोने जाहीर केलेल्या मानवी हक्काच्या जाहीरनाम्यामुळे स्त्रियांच्या अधिकाराला वैश्विक मान्यता मिळाली. दुसऱ्या महायुद्धानंतरच खऱ्या अर्थाने स्त्री प्रश्नांचे वैचारिक मांडणी करणारे लेखन खूप मोठया प्रमाणावर प्रसिद्ध होवू लागले. इ.स. १९४५ ते इ.स. १९६० या कालखंडातील स्त्री जीवनाची वैशिष्टये म्हणजे सुखसोई, सुबत्तामध्ये स्त्रीया पुरूषप्रधान संस्कृतीत गुरफटल्याचे दिसून येते.

इ.स. १९६० नंतर नोकरी करणाऱ्या स्त्रियांची संख्या वाढली. स्त्रियांना आपले आत्मभान जाणून घेण्याची संधी मिळाली व पिळवणूकीविरूद्ध संस्थात्मक स्वरूपाचे मोठे गट निर्माण झाले. एलिझाबेथ कँडी व सुसान अँथनी यांच्या प्रेरणेने स्त्रीवादी मुक्तीगट अमेरिकेमध्ये स्थापन झाला. स्त्री शक्तीची दखल घेऊन केनेडी यांनी स्त्रियांच्या दर्जाविषयक पाहणीसाठी आयोग नेमला. बेटी फ्रिडनने 'दी फेमिनिन मिस्टीक' (नारी रहस्य कथा) ग्रंथाद्वारे स्त्रियांचे अस्तित्व व प्रेरणा विकसित केल्या. इ.स. १९६८ साली फ्रान्समधील विद्यार्थी चळवळीत स्त्रियांचा सहभाग होता. इ.स. १९७०-८० या कालखंडात या स्त्रीवादी चळवळीने व्यापक स्वरूप धारण केले. इ.स. १९७५ हे 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणून जाहीर केले गेले. इ.स. १९८० ते इ.स. २०१० हा कालखंड स्त्रीवादी चळवळीच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा ठरला. स्त्रीवादासंदर्भातील गोंधळ दूर होवून स्त्रीवादाचे नव्याने आकलन केले जावू लागले. खऱ्या अर्थाने या चळवळीला अजूनही खूप लांबचा पल्ला गाठावयाचा आहे.

**अमेरिकेतील स्त्री हक्काची चळवळ :-**

स्त्रीवादाचे परंपरागत आणि शरीरशास्त्रीय हे प्रमुख दोन दृष्टीकोन असून परंपरागत दृष्टिकोनातूनच ५० टक्के स्त्रिया सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रांत दुय्यम मानल्या जातात. स्त्री स्वातंत्र्य चळवळीचा अभ्यास करून अभ्यासकांनी प्रमुख सिद्धांत व दृष्टिकोन मांडले ते खालीलप्रमाणे

१. परंपरावादी व सनातनी स्त्रीवाद
२. उदारमतवादी स्त्रीवाद
३. जहाल स्त्रीवाद
४. मार्क्सवादी स्त्रीवाद
५. समाजवादी स्त्रीवाद
६. अस्तित्ववादी स्त्रीवाद
७. कृष्णवर्णीय स्त्रीवाद

या सर्व दृष्टिकोनांची विशेषतः परंपरावादी, मार्क्सवादी, कृष्णवर्णीय व अस्तित्ववादी या प्रमुख सैद्धांतिक स्त्रीवादी तत्त्वज्ञानाची बिजे आपल्याला अमेरिकेतील स्त्री हक्काच्या चळवळीमध्ये सापडतात. पुढारलेल्या अमेरिकेत स्त्री ही गुलामाप्रमाणे पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेच्या कचाट्यात अडकली होती आणि तिला ही जाणीव होण्यासाठी बराच काळ जावा लागला. शैक्षणिक सुविधांमुळे व विविध क्षेत्रांत काम करण्याच्या अनुभवामुळे अमेरिकेत प्रथम मताधिकाराची चळवळ सुरू झाली. इ.स. १८४० च्या लंडन येथील गुलामगिरीविरुद्ध मेळाव्याला अमेरिकन स्त्री प्रतिनिधीही उपस्थित होत्या. मात्र त्यांना उपस्थित राहण्यास मनाई करण्यात आली. इ.स.१९४८ मध्ये एलिझाबेथ कॅडी स्टॅटन यांनी स्त्रियांसाठी मेळावा

भरवला. त्या मेळाव्यात ‘सेनेका फॉल्स जाहीरनामा’ प्रसिद्ध केला. हा स्त्री हक्क चळवळीतला एक महत्त्वाचा जाहीरनामा मानला जातो. सेनेका फॉल्स जाहीरनाम्यामध्ये अमेरिकेच्या स्त्रीवादाच्या प्रश्नाने खूप व्यापक रूप धारण केले. इ.स. १९४० ते इ.स. १९७० या ३० वर्षाचा कालखंडामध्ये नोकरी करणाऱ्या महिलांचे प्रमाण ५० टक्क्यांपर्यंत वाढले. त्यामुळे अमेरीकेमध्ये इ.स. १९६० मध्ये स्त्री चळवळीचा उदय झाला. गुलामगिरीच्या निर्मूलनार्थ व पुरुषप्रधान परंपरेने लादलेले पाश तोडून फेकण्यास स्त्रियांनी मोठ्या संख्येने सहभाग घ्यायला सुरुवात केली. स्त्री श्वेत असो वा कृष्णवर्णीय असो पुरुषांच्या लेखी काहीच किंमत नसल्याचे त्यांच्या लक्षात आल्यामुळे या चळवळीला गती प्राप्त झाली. इ.स. १९६० मध्ये बेटी फ्राईडनच्या नेतृत्वाखाली स्त्रियांची राष्ट्रीय संघटना स्थापन करण्यात आली. या संघटनेला (NOW: National Organization of Women) या नावाने ओळखले जाते. त्यामुळे स्त्री चळवळीस स्त्रीमुक्तीचे रूप आले.

इ.स. १९७० ते इ.स. १९८० च्या दशकामध्ये स्त्री चळवळीने आक्रमक रूप धारण केले. या कालावधीमध्ये एक प्रकारचा जहालपणा या चळवळीला आल्याचे दिसून येते. आत्मसन्मानासाठी प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध चीड व्यक्त करण्यात येऊ लागली. या दशकामध्ये गर्भपात हा स्त्रीचा हक्क आणि अधिकार असून गर्भपाताविरोधी कायदे रद्द करण्याचा आग्रह स्त्री चळवळीने केला. इ.स. १९६० च्या दशकात सन्मान मिळावा, एवढी माफक अपेक्षा असणारी स्त्री चळवळ इ.स. १९८० च्या दशकात उग्र बनली व लैंगिक जीवनावर पूर्णतः स्त्रियांचेच नियंत्रण असण्याची भाषा करू लागली. जनन प्रक्रिया, गर्भपात आणि कुटुंब नियोजन यावर तिचेच नियंत्रण असेल, हा भाव या कालावधीत स्त्री चळवळीने व्यक्त केला. त्याबरोबरच स्त्रीवादी दृष्टिकोनातून बायबलच्या पुनर्लेखनाची मागणी करण्यात आली.

स्त्री चळवळीला प्रतिसाद मिळत असल्यामुळे ही चळवळ वेगाने विकसित होऊ लागली. उदाहरणार्थ इ.स. १९६४ च्या नागरी हक्क कायद्याने वंशलिंगाधारित भेदभावास तिलांजली देण्यात आली. अमेरिकन संघ व राज्याने भेदभाव निर्मूलनार्थ कायदे केले. स्त्रियांच्या गर्भपाताविषयी मागणीस समर्थन देणारा ऐतिहासिक निकाल इ.स. १९७३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिला. स्त्रियांसंदर्भात भेदभाव होतो, असे दिसून आल्याने इ.स. १९८८ मध्ये परराष्ट्रसेवा परीक्षेस सर्वोच्च न्यायालयाने आक्षेप घेतला. मात्र स्त्री चळवळीने केंद्र व राज्य सरकारच्या स्त्री प्रश्नांविषयी नकारात्मक निर्णयांना न्यायालयामध्ये आवाहन देऊन ही चळवळ सुरूच ठेवली.

इ.स. १९६० ते इ.स. १९९० च्या दशकात या चळवळीने आर्थिक क्षेत्रामध्ये जबरदस्त यश मिळवले. या कालावधीत नोकरीमध्ये स्त्रियांचा दुपटीने सहभाग होता. काही क्षेत्रांमध्ये स्त्रियांची संख्या पुरुषांपेक्षा जास्त होती, परंपरेने पुरुषांकरिता राखीव असलेल्या इंजिनियरिंग, कायदा, आर्किटेक्ट इत्यादी क्षेत्रात स्त्रियांनी सहज प्रवेश केला. याच कालावधीत स्त्री न्यायाधीश व वकिलांची संख्या पाच टक्क्यांपासून चौदा टक्क्यांवर गेली. आर्किटेक्टसची संख्या आठ टक्क्यांपर्यंत तर पी.एच. डी. धारक स्त्रीयांची संख्या तिप्पट वाढली. स्त्रियांची प्रशासनामध्ये १५ टक्क्यांवरून ३० टक्क्यांपर्यंत वृद्धी झाली. इ.स. १९७४ मध्ये स्त्रियांनी प्रथमच मर्चंट नेव्हीत प्रवेश केला. त्याबरोबरच लष्कर, पोलीस, अग्निशामक दल या पुरुषी क्षेत्रांतही यशस्वी सहभाग नोंदविला. इ.स. १९९१ च्या आखाती युद्धामध्ये तर स्त्रिया प्रत्यक्ष युद्धभूमीवर लढल्या. मुष्टीयुद्धाच्या

खेळात यशस्वी झाल्या. इ.स. १९८३ मध्ये सॅली राईड अंतरीक्ष यानातून उड्डाण करणारी पहिली स्त्री ठरली. इ.स. १९८९ मध्ये बिशप होण्याचा मान प्रथमच स्त्रीला मिळाला. बार्बरा हॅरीस ही पहिली कृष्णवर्णीय स्त्री बिशप बनली.

नागरी हक्क धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये स्त्रियांचा अंतर्भाव असल्यामुळे स्त्री चळवळीचा सखोल प्रभाव अमेरिकन प्रशासनावर पडल्याचे दिसून येते. स्त्री चळवळीला प्रत्यक्ष राजकीय सहभागाची जाणीव निर्माण झाली आणि अमेरिकेच्या इतिहासामध्ये प्रथमच डेमोक्रेटीक पक्षातर्फे उपाध्यक्ष पदासाठी उमेदवारी देण्यात आली. इ.स. १९६० च्या अमेरिकेतील स्त्री चळवळीवर खरे तर लैंगिक प्रश्नांचा खूप मोठा प्रभाव होता. पुरुषाच्या ढोंगी, अप्पलपोटी, स्वैराचारी वृत्तीचा निषेध लैंगिक कृतीतून व्यक्त झाला. इ.स. १९७० ते इ.स. १९८० च्या दशकांमध्ये विवाह संस्थेवरील, त्याच्या पावित्र्यावरील स्त्री चळवळीचा विश्वास हळूहळू कमी होऊ लागला. उदाहरणार्थ, इ.स. १९८० मध्ये अविवाहित जोडप्यांची संख्या अकरा लाखाच्या आसपास गेली. तर इ.स. १९६० ते इ.स. १९८० च्या दरम्यान घटस्फोटाचे प्रमाण प्रचंड वाढले. इ.स. १९७० ते इ.स. १९९० या कालावधीत एकच बालक असणाऱ्या कुटुंबांची संख्या ४० लक्षावरून ८० लक्ष एवढी झाली. स्त्रियांच्या नोकरीचे प्रमाण वाढले असले तरी मूल होवू न देण्याची प्रवृत्ती वाढली, लग्नाचे प्रमाण घसरले, घटस्फोटित विभक्त कुटुंबांची संख्याही वाढल्याचे दिसून येते. पर्यायाने अमेरिकेतील कुटुंब व्यवस्था मोडकळीस येऊ लागली. याबरोबरच अविवाहित माता, बालमाता, दारिद्र्य, गुन्हेगारी यांचेही दुष्टचक्र स्त्रीवादी चळवळी दरम्यान सुरूच होते.

स्त्रीवादी चळवळ ही श्वेतवर्णीय व कृष्णवर्णीय स्त्रियांची चळवळ होती. या चळवळीचा मुख्य उद्देश सामाजिक सुधारणेबरोबरच सामाजिक क्रांती हा होता. वांशिक व लैंगिक अत्याचारापासून मुक्ती, आर्थिक सक्षमतेबरोबरच राजकारणात सहभाग ही मूलभूत वैशिष्ट्ये या चळवळीमध्ये अस्तित्वात होती. कृष्णवर्णीय स्त्रीवादी चळवळ तर वरील घटकांना पायाभूत मानते. कारण नाविन्याचा लवलेशही त्यांच्या जीवनामध्ये नव्हता. ॲलिस वॉकर या कृष्णवर्णीय स्त्रीवादाचा उल्लेख Feminist ऐवजी Womanist असा करतात. या कालखंडातील स्त्रीवादी चळवळीचे स्वरूप जहालवादी होते. बेटी फ्रायडनने कुटुंबाची तुलना स्त्रीचा मानसिक छळ करणाऱ्या तुरुंगाशी केली. अमेरिका आणि आफ्रिकेतील निग्रोंमध्ये जागृती घडून आल्यानंतर कृष्णवर्णीय स्त्रीवादाचा उदय झाला. ॲलिस वॉकर, पॉल मार्शल, रोमी मॉरिइस, वार्बरा स्मिथ व मेरी हेनॉन ह्या स्त्रीवादाच्या प्रमुख पुरस्कर्त्या होत्या. एवढे सतत प्रयत्न व संघर्ष करूनही अमेरिकेमध्ये महिलांना मतदानाचा अधिकार देण्यासाठी इ.स. १९२० हे वर्ष उजाडावे लागले. १९ वी घटनादुरुस्ती करून अमेरिकेने महिलांना मतदानाचा अधिकार दिला. अमेरिकेतील ओहिआ राज्यात ओ बर्लिन कॉलेजमध्ये स्त्रियांना प्रवेश देण्यात आला. माउंट एलीओक फिमेल सेमिनरी ही स्त्रियांसाठी असलेली संस्था सुरू करण्यात आली. १९ व्या शतकाच्या अखेरीस स्त्रियांना सहशिक्षण उपलब्ध झाले. मिसिसिपी राज्यामध्ये विवाहित स्त्रियांना खाजगी मालमत्ता संपादन करण्याचा कायदा सर्वप्रथम मंजूर करण्यात आला.

अमेरिकेमध्ये कृष्णवर्णीय स्त्रीवादाची मांडणी करण्यात आली. कृष्णवर्णीय स्त्रीवादाची मांडणी प्रथम इ.स. १९७७ मध्ये बार्बरा स्मिथ यांनी Towards a Black Feminism नामक पुस्तकातून केली. त्यानंतर

हा विचार पुढे वेल हुक्स, विलिस यांनी विकसित केला. स्त्रियांच्या जीवनावर लिंगभेदाचा परिणाम होत असतो. त्याचबरोबर वर्ण, वर्गीय स्थान आणि वांशिक गटाचा परिणाम होत असतो. या आधारावर कृष्णवर्णीय स्त्रियांचे जगणे नियंत्रित केले जाते. याची फारसी जाणीव श्वेत किंवा गौरवर्णीय स्त्रियांना नसते. त्यामुळे गौरवणीय स्त्रियांबरोबर वावरताना कृष्णवर्णीय स्त्रियांना उपरेपणा जाणवतो.

अमेरिकन स्त्रीवादी चळवळीचे परिणाम :-

१. स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळाला.

२. स्त्रियांच्या राजकीय सहभागामध्ये वाढ झाली.

३. सार्वजनिक जीवनात स्त्रियांचा प्रवेश सुकर झाला.

४. स्त्री शिक्षण व स्त्री जागृती यात वाढ झाली.

५. स्त्रियांना कायदेशीर संरक्षण मिळाले.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–२**

अ) रिकाम्या जागा भरा.

१. जागतिक इतिहासामध्ये प्रारंभीचा टप्पा ......... कुटुंबव्यवस्थेचा होता.

अ) पितृप्रधान ब) मातृप्रधान क) एकल कुटुंब ड) संयुक्त कुटुंब

२. स्त्रियांनी कृषीसंस्कृतीचा उगम ........... केला.

अ) औद्योगिक क्रांतीनंतर ब) श्रमविभागणीपूर्वी

क) सरंजामशाहीच्या काळात ड) फ्रेंच राज्यक्रांतीनंतर

३. मेरी वालस्टोन क्रॉफ्ट यांचा ............ हा ग्रंथ महिलांच्या अधिकारांबद्दल पहिला आवाज उठवतो.

अ) द फेमिनिन मिस्टीक ब) सेनेका फॉल्स जाहीरनामा

क) दि व्हिंडीकेशन ऑफ द राईटस ऑफ वुमन ड) महिला अधिकार घोषणा

४. इंग्लंडमध्ये महिलांना मतदानाचा अधिकार इ. स. ......... मध्ये मिळाला.

अ) १८९० ब) १९१० क) १९४५ ड) १९२०

५. आंतरराष्ट्रीय महिला दिन ............ रोजी साजरा करण्याचा ठराव झाला.

अ) ८ मार्च ब) १५ एप्रिल क) २७ जून ड) १ मे

६. ''दी फेमिनिन मिस्टीक'' हा ग्रंथ .......... यांनी लिहिला.

अ) एलिझाबेथ कँडी ब) लुसी स्टीन क) मेरी वालस्टोन क्रॉफ्ट ड) बेटी फ्रिडन

७. इ.स. १९२० च्या दशकात अमेरिकेतील स्त्री चळवळीला ........... चालना मिळाली.

अ) मताधिकार चळवळीमुळे ब) औद्योगिक क्रांतीमुळे

क) साम्राज्यवादामुळे ड) वैज्ञानिक क्रांतीमुळे

ब) जोड्या जुळवून योग्य पर्याय निवडा.

| गट १ (देश) | गट २ (मताधिकार) |
|---|---|
| १) इंग्लंड | अ. १९१० |
| २) अमेरिका | ब. १९२० |
| ३) भारत | क. १९४७ |
| ४) पाकिस्तान | ड. १९४७ |

अ) १-ब, २-अ, ३-क, ४- ड ब) १-अ, २-ब, ३-क, ४-ड

क) १-ड, २-अ, ३-ब, ४- क ड) १-ब, २-ड, ३-क, ४-अ

क) योग्य पर्याय निवडा.

विधान १ : इ.स. १९१० मध्ये कोपनहेगन येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदेने जगातील स्त्रियांच्या हक्काचे स्मरण करण्यासाठी ८ मार्च हा जागतिक 'महिला दिन' म्हणून साजरा केला जावा, हा ठराव संमत केला.

विधान २ : प्रस्थापित पुरूषप्रधान व्यवस्था नष्ट करून स्त्रियांच्या हक्कांना महत्त्व देणारी आणि स्त्रियांच्या विकासाला वाव देणारी, नवसमाजरचेनची मांडणी करणाऱ्या विचारप्रणालीला 'स्त्रीवाद' म्हणतात.

१) पहिले विधान बरोबर, दुसरे विधान चुकीचे

२) दुसरे विधान बरोबर, पहिले विधान चुकीचे

३) दोन्ही विधाने बरोबर

४) दोन्ही विधाने चुकीची

### ४.२.३ सांस्कृतिक बदल : संगीत (पॉप, डिस्को, हिप – हॉप), चित्रपट (ब्लॉक बस्टर), पोशाखशैली मार्दवतेकडून उच्छृंखलतेकडे (Elegance to boldness) :

संगीत, चित्रपट आणि पोशाखशैलीमधील सांस्कृतिक बदलांचा गेल्या शतकात जागतिक समाजावर खोलवर परिणाम झाला आहे. पॉप, डिस्को आणि हिप–हॉप सारख्या नवीन संगीत शैलींच्या उदयापासून ते ब्लॉकबस्टर सिनेमासह चित्रपट उद्योगाच्या परिवर्तनापर्यंत आणि पोशाखशैलीमधील मार्दवतेकडून उच्छृंखलतेपर्यंत सामाजिक बदल प्रतिबिंबित आणि प्रभावित केले. अभिव्यक्तीच्या या बदलत्या शैलींनी केवळ वैयक्तिक ओळखच बनवली, असे नाही, तर जागतिक चळवळी, बदलते कल आणि विचारधारांमध्येही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

**संगीत : पॉप पासून डिस्को आणि हिप–हॉप पर्यंत:**

संगीत ही नेहमीच एक महत्त्वपूर्ण सांस्कृतिक ओळख राहिली आहे. ती सामाजिक मूल्यांना आकार देण्यास आणि प्रतिबिंबित करण्यास मदत करते. गेल्या शतकात, तीन संगीत शैलींनी–पॉप, डिस्को आणि हिप–हॉपने जागतिक संस्कृतीला प्रभावित केले आहे.

**पॉप संगीत:**

इ.स. १९५० आणि इ.स. १९६० च्या दशकात पॉप म्युझिक, रॉक 'एन' रोल, जॅझ आणि पारंपारिक लोकप्रिय संगीत प्रकारांनी लोक खूप प्रभावित झाले. एल्विस प्रेस्ली, द बीटल्स आणि मायकेल जॅक्सन सारखे कलाकार या शैलींना आकार देण्यात आघाडीवर होते. त्यामध्ये आकर्षक धून, प्रवेशयोग्य गीत आणि मास अपील (मोठा समूह) यांचे मिश्रण होते. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात आर्थिक समृद्धीमुळे माध्यमांचा अधिक वापर होऊ लागला. त्यावेळी पॉप संगीत हे त्या काळातील युवा संस्कृतीच्या अभिव्यक्तीचे माध्यम बनले. इ.स. १९८० आणि इ.स. १९९० च्या दशकात MTV आणि संगीत चित्रफितींचा प्रसार झाला. त्यामुळे जागतिक संस्कृतीत पॉप संगीताचे स्थान आणखी मजबूत झाले. पॉप संगीताच्या दृश्य प्रस्तुतीमुळे कलाकारांना मोठी प्रसिद्धी मिळाली. मॅडोनाच्या सादरीकरणापासून ते मायकेल जॅक्सनच्या आयकॉनिक ''थ्रिलर'' म्युझिक व्हिडिओपर्यंत पॉप संगीताने क्रांती केली.

पॉप संगीताकडे अनेकदा हलकेफुलके मनोरंजन म्हणून पाहिले जात असताना, त्याचे खोलवर सामाजिक परिणाम घडून आले. हे सांस्कृतिक देवाणघेवाण करण्यासाठीचे एक व्यासपीठ म्हणून उदयास आले. संगीतातील विविध प्रवाहांना एकत्र आणण्यामध्ये आणि वांशिक आणि सांस्कृतिक अडथळे दूर करण्यामध्ये पॉप संगीत प्रभावी ठरले. उदाहरणार्थ, इ.स. १९६० च्या दशकात मोटाउनने द सुप्रिम्स आणि मार्विन गे सारख्या आफ्रिकन अमेरिकन कलाकारांना मुख्य प्रवाहातील संगीतासाठी प्रोत्साहन देऊन अमेरिकेमधील वांशिक फूट कमी करण्यात मदत केली. अलीकडच्या काही वर्षांत पॉप संगीताच्या आंतरराष्ट्रीय प्रभावामधुन के–पॉप संगीत जागतिक प्रसिद्धीस येत आहे.

**डिस्को:**

डिस्को इ. स. १९७० च्या दशकात एक नृत्यशैली म्हणून उदयास आले. न्यूयॉर्क सारख्या शहरांच्या क्लब सीनमध्ये रुजलेली ही नृत्यशैली सुरुवातीला उपेक्षित समुदायांमध्ये, विशेषतः आफ्रिकन अमेरिकन, लॅटिनो आणि समलैंगिक (LGBTQ+) समुदायांमध्ये लोकप्रिय होती. सामाजिक दडपशाहीच्या पार्श्वभूमीवर डिस्कोच्या थीम स्वातंत्र्य आणि अभिव्यक्तीची इच्छा प्रतिबिंबित करतात. ''आय विल सर्वाइव्ह'' सारखी हिट गाणी सशक्तीकरणाचे गीत बनली. डिस्को नाइटक्लब्ज आणि वाढत्या नृत्यांच्या दृश्यांमुळे नवीन सामाजिक जागा निर्माण झाल्या, जिथे लोक अभिव्यक्त होऊ शकतात. एकूणच हे वातावरण इ. स. १९७० च्या दशकातील राजकीय आणि आर्थिक अशांततेच्या अगदी उलट आहे. तथापि, डिस्कोला देखील विरोधाचा सामना करावा लागला. इ. स. १९७९ मधील कुप्रसिद्ध ''डिस्को डिमॉलिशन नाईट'' मध्ये विरोधाचे टोक गाठले गेले. यावेळी शिकागोमधील बेसबॉल गेममध्ये डिस्को रेकॉर्ड नष्ट करण्यात आल्या. डिस्कोच्या समीक्षकांनी असा युक्तिवाद केला की ते वरवरचे आणि अत्याधिक व्यावसायीकरण होते. परंतु त्याचे सखोल कारण होमोफोबिया आणि वर्णद्वेष हेच होते. कारण डिस्कोकडे अल्पसंख्याक आणि समलैंगिक (LGBTQ+) समुदायांनी स्वीकारलेली एक शैली म्हणून पाहिले जात होते.

इ. स. १९८० च्या दशकात डिस्कोची मुख्य प्रवाहातील लोकप्रियता कमी होत गेली. अलीकडे जगभरात वाढत असलेल्या इलेक्ट्रॉनिक नृत्य संगीत (EDM) आणि क्लब संस्कृतीचा पाया डिस्को या नृत्यशैलीने घातला आहे. डिस्को संगीताचा व्यापक सांस्कृतिक चळवळींवर कायमचा प्रभाव पडला आहे.

**हिप-हॉप:**

इ.स. १९७० च्या दशकात उपेक्षित आफ्रिकन-अमेरिकन आणि लॅटिन समुदायांसाठी अभिव्यक्तीचा एक प्रकार म्हणून न्यूयॉर्क येथे हिप-हॉपचा उदय झाला. यात केवळ संगीतच नाही तर एक व्यापक सांस्कृतिक चळवळ देखील समाविष्ट आहे. हिप-हॉप आपल्या मूळच्या स्वरुपासून जलदगतीने विकसित होत जाऊन लोकप्रिय झाले. ते गरिबी, हिंसा आणि पद्धतशीर वर्णद्वेष या विषयांना अधोरेखित करत जागतिक प्रेरणास्त्रोत बनले. ग्रँडमास्टर फ्लॅश, रन-डीएमसी आणि नंतरच्या तुपॅक शकूर, द नॉटोरियस बी.आय.जी. आणि जे-झेड सारख्या कलाकारांनी हिप-हॉपचा प्रभावी वापर केला.

इ.स. १९९० आणि इ.स. २००० च्या दशकात, हिप-हॉपने मुख्य प्रवाहात प्रवेश केला. एमिनेम, कान्ये वेस्ट आणि ड्रेक सारख्या कलाकारांची नावे घरोघरी घेतली जातात. हिप-हॉपचा प्रभाव संगीत, पोशाखशैली, भाषा आणि राजकारण यांच्या पलीकडे विस्तारला आहे. ही ऐक्य आणि विभाजन या दोन्हीसाठी एक शक्ती आहे. कधीकधी त्याच्या हिंसक किंवा चुकीच्या शब्दांच्या वापरासाठी टीका केली जाते. हिप-हॉपचा वापर प्रामाणिकपणा आणि सांस्कृतिक प्रासंगिकता व्यक्त करण्यासाठी देखील केला जातो. आज, हिप-हॉप हा एक जागतिक प्रवाह आहे, ज्यामध्ये जगभरातील कलाकारांनी त्यांचे स्वतःचे अनुभव प्रतिबिंबित आणि रूपांतरित करण्यासाठी या शैलीचा वापर केला. न्यूयॉर्कच्या रस्त्यांपासून पॅरिसच्या

उपनगरापर्यंत आणि लागोसच्या झोपडपट्ट्यांपर्यंत हिप-हॉप सामाजिक भाष्य आणि कलात्मक अभिव्यक्तीसाठीचे एक माध्यम बनले.

**चित्रपट : ब्लॉकबस्टरचा काळ :**

गेल्या शतकात चित्रपट उद्योगात नाट्यमय बदल घडून आले आहेत. ब्लॉकबस्टर चित्रपटाच्या उदयानंतर ते आधुनिक चित्रपटसृष्टीचे एक निश्चित वैशिष्ट्य बनले आहे. सुरुवातीचा चित्रपट हा लघुपट स्वरुपाचा आणि कलात्मक अभिव्यक्तीवर केंद्रित होता. इ.स. १९७० च्या दशकात मनोरंजनाचा एक नवीन प्रकार म्हणून मोठ्या प्रमाणात ब्लॉकबस्टरचा उदय झाला.

**ब्लॉकबस्टरचा उदय:**

''ब्लॉकबस्टर'' या शब्दाचा उगम इ.स. १९७० च्या दशकात स्टीव्हन स्पीलबर्गच्या जॉज (Jaws) (इ.स. १९७५) आणि जॉर्ज लुकासच्या स्टार वॉर्स (इ.स. १९७७) सारख्या चित्रपटांमधून झाला. या चित्रपटांनी प्रचंड आर्थिक यश मिळाले आणि मोठ्या प्रमाणात प्रेक्षकांना आकर्षित केले. या चित्रपटांनी नाटक, स्पेशल इफेक्ट्स आणि सार्वत्रिक आवाहन यावर लक्ष केंद्रित करून चित्रपट उद्योगासाठी एक नवीन मानक स्थापित केले. त्यांनी ''उन्हाळ्यातील ब्लॉकबस्टर'' ची संकल्पना अंमलात आणली. स्टुडिओ शाळेच्या सुट्ट्यांचा आणि मोठ्या संख्येच्या प्रेक्षकांच्या प्रतिसादाचा फायदा घेण्यासाठी उन्हाळ्याच्या महिन्यांत त्यांचे सर्वाधिक चित्रपट प्रदर्शित करत.

प्रेक्षकांना आकर्षित करण्यासाठी ब्लॉकबस्टर अनेकदा संस्मरणीय पात्रे आणि प्रभावी व्हिज्युअल इफेक्ट्सवर अवलंबून असतात. त्यांच्यावर कधीकधी टीका केली जाते. असे असले तरी जागतिक संस्कृतीला आकार देण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. ज्युरासिक पार्क (इ.स. १९९३), द अॅव्हेंजर्स मालिका (इ.स. २०१२-इ.स. २०१९) आणि अवतार (इ.स. २००९) यांसारख्या चित्रपटांनी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून इमर्सिव्ह सिनेमॅटिक अनुभव निर्माण करण्यासाठी चित्रपटनिर्मितीचा पुढचा स्तर गाठला आणि चित्रपटनिर्मितीच्या कक्षा रुंदावल्या आहेत.

**सांस्कृतिक प्रभाव :**

ब्लॉकबस्टर चित्रपटांनी केवळ चित्रपट बनवण्याच्या आणि मार्केटिंगच्या पद्धतीतच क्रांती केली नाही तर जागतिक संस्कृतीवरही त्याचा खोल प्रभाव पडला आहे. हे चित्रपट बहुधा सांस्कृतिक प्रतिनिधित्वासाठी माध्यम म्हणून काम करतात आणि कल्पना, नियम आणि मूल्यांची सीमा ओलांडून प्रसार करण्यास अनुमती देतात. उदाहरणार्थ, मार्वल सिनेमॅटिक युनिव्हर्स (MCU) ने जगभरातील लाखो चाहत्यांसाठी एक सामायिक सांस्कृतिक अनुभव तयार केला आहे. सुपरहिरो आणि त्यांच्या नैतिक दुविधा दैनंदिन संभाषणांचा भाग बनवला आहे. शिवाय ब्लॉकबस्टर्सनी जागतिक चित्रपट म्हणजे काय हे पुन्हा परिभाषित करण्यास मदत केली आहे. हॉलीवूडचे वर्चस्व असतानाही, जगातील इतर भागांमध्ये ब्लॉकबस्टर चित्रपटांची निर्मिती होत

आहे. भारतातील बॉलीवूड आणि चीनमधील चित्रपट उद्योग ही त्याची उदाहरणे होत. हे चित्रपट, अनेकदा ब्लॉकबस्टर फॉर्म्युल्याचे पालन करत स्थानिक, सांस्कृतिक घटक जागतिक पटलावर आणतात.

**टीका आणि आव्हाने:**

लोकप्रियता असूनही, जागतिक सिनेमाच्या एकसंघीकरणात योगदान दिल्याबद्दल ब्लॉकबस्टर्स चित्रपटांना टीकेचा सामना करावा लागला. काहींचे म्हणणे आहे की भव्य प्रमाणावर निर्मितीकडे लक्ष केंद्रित केल्यामुळे लहान, अधिक प्रायोगिक चित्रपट निर्मितींमध्ये घट झाली. याव्यतिरिक्त, ब्लॉकबस्टर मॉडेलमधील फ्रँचायझी आणि सिक्वेलच्या वर्चस्वामुळे आधुनिक सिनेमात मौलिकतेचा अभाव जाणवत असल्याबद्दल चिंता व्यक्त होत आहे. तथापि, ब्लॉकबस्टर चित्रपट बॉक्स ऑफिसवर वर्चस्व गाजवत आहेत आणि जागतिक संस्कृतीवरील त्यांचा प्रभाव कमी होण्याची चिन्हे दिसत नाहीत. तंत्रज्ञान जसजसे पुढे जात आहे, तसतसे अधिक प्रभावी आणि परस्परसंवादी क्षमता असणाऱ्या ब्लॉकबस्टर चित्रपटांची निर्मिती वाढत आहे.

**पोशाखशैली : मार्दवतेकडून उच्छृंखलतेकडे** (Elegance to boldness)

२० व्या शतकात पोशाखशैलीमध्ये नाट्यमय बदल होत गेले. त्यातून सामाजिक मूल्ये, लिंग भूमिका आणि आत्म-अभिव्यक्तीमधील बदल दर्शविले गेले. पूर्वीच्या दशकांतील अभिजातपणा आणि संयमातून अलीकडच्या काळात उच्छृंखलतेकडे होणाऱ्या संक्रमणातून महत्त्वपूर्ण सांस्कृतिक बदल दिसून येतो.

**मार्दवता आणि संयम:**

इ.स. १९२० च्या दशकात ''फ्लॅपर'' लुकचा उदय झाला. याकाळात महिलांनी अधिक समकालीन पोशाख स्वीकारला. कारण त्यांना अधिक सामाजिक स्वातंत्र्य मिळाले. तथापि, औचित्य आणि नम्रतेवर भर देत, पोशाखशैली अजूनही मोठ्या प्रमाणात वर्ग आणि लिंग मानदंडांद्वारे निर्धारित केली जात होती.

**सन १९६० आणि त्यानंतर:**

इ.स. १९६० च्या दशकाने त्या काळातील सामाजिक आणि राजकीय उलथापालथ दर्शविणाऱ्या ठळक, बंडखोर शैलीच्या उदयासह पोशाखशैलीमध्ये एक नवे वळण निर्माण केले. तरुण-चालित प्रतिसंस्कृती चळवळीने मागील दशकांतील पुराणमतवादी पोशाखशैलीचे मानदंड नाकारले. त्याऐवजी अधिक धाडसी आणि प्रायोगिक स्वरूप स्वीकारले. मेरी क्वांटने लोकप्रिय केलेला मिनीस्कर्ट महिला सशक्तीकरण आणि लैंगिक मुक्तीचे प्रतीक बनला.

इ.स. १९७० आणि इ.स. १९८० च्या दशकात, डिस्को संस्कृती, पॉप आणि नंतर हिप-हॉपने उठावदार, अर्थपूर्ण आणि अनेकदा विध्वंसक अशा नवीन शैली सादर केल्या. पोशाखशैलीने त्याच्या कक्षा रुंदावणे सुरूच ठेवले. इ.स. १९८० चे दशक हे चंगळवादीवृत्ती आणि त्याच्या अतिरेकासाठी ओळखले गेले.

**मूल्यमापन:**

सामाजिक आणि सांस्कृतिक बदलांमध्ये संगीत, चित्रपट आणि पोशाखशैली या तिन्ही क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण बदल घडून आले. इ.स. १९५० ते इ.स. १९९१ या कालखंडात या तीन क्षेत्रांत सांस्कृतिक क्रांती अनुभवायला मिळाली.

**संगीत:**

पॉप, डिस्को आणि हिप-हॉप यासारख्या संगीत प्रकारांनी प्रेक्षकांना अक्षरशः वेड लावले. पॉप संगीताने तरुणांना एक नवीन आवाज दिला. मायकेल जॅक्सनसारख्या कलाकारांनी पॉप संस्कृतीला नवा चेहरा दिला. डिस्को संगीताने इ.स. १९७० च्या दशकात पार्टी संस्कृतीला चालना दिली. नृत्य आणि चमकदार रोषणाईमुळे डिस्को क्लब लोकप्रिय झाले. इ.स. १९८० च्या दशकात हिप-हॉप आणि रॅप संगीताने सामाजिक समस्यांवर आवाज उठवला. गरिबांचे जीवन, वर्णभेद, आणि शोषण या विषयांवर आधारित हिप-हॉपने समाजाला विचार करायला भाग पाडले.

**चित्रपट:**

या काळात ब्लॉकबस्टर चित्रपट मोठ्या प्रमाणात तयार झाले. प्रेक्षकांनी अशा चित्रपटांना प्रचंड प्रतिसाद दिला. हॉलीवूडने या काळात जगभरातील सिनेसृष्टीवर वर्चस्व गाजवले. चित्रपट तंत्रज्ञानातही प्रगती झाली. स्पेशल इफेक्ट्स आणि ॲनिमेशन यांचा वापर वाढला. चित्रपट केवळ मनोरंजनाचे साधन राहिले नाही, तर ते समाजावर प्रभाव टाकणारे माध्यम बनले.

**पोशाखशैली:**

याच काळात पोशाखशैलीमध्येही बदल दिसून आले. इ.स. १९५० च्या दशकात पेहेरावाबाबत साधेपणावर भर होता, परंतु इ.स. १९८० पर्यंत पोशाखशैलीत अधिक उठावदार आणि आकर्षक बदल झाले. महिला आणि पुरुष दोघांनीही पोषाखाबाबत अधिक प्रयोगशीलता दाखवली. रंगीबेरंगी कपडे, मोठे जॅकेट्स, आणि आधुनिक पद्धतीचे अलंकार या काळात लोकप्रिय झाले. यामुळे व्यक्तिमत्व अधिक प्रभावी दिसू लागले.

संगीत, चित्रपट आणि पोशाखशैली या तिन्ही क्षेत्रांतील बदलांनी समाजावर मोठा परिणाम घडवून आणला.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-३**

अ) रिकाम्या जागा योग्य पर्यायासह भरा.

१) पॉप संगीताची लोकप्रियता इ.स. च्या ........ दशकामध्ये सर्वाधिक होती.

अ) १९२० ब) १९५० क) १९७० ड) १९९०

२) मायकेल जॅक्सनचा आयकॉनिक म्युझिक व्हिडिओ .........हा आहे.

अ) आय विल सर्वाइव्ह ब) स्टेइंग अलाइव

क) थ्रिलर ड) ब्लॉकबस्टर

३) मोटाउन रेकॉर्डने मुख्य प्रवाहातील संगीतात .............. या कलाकारांना प्रोत्साहन दिले.

अ) एल्विस प्रेस्ली आणि मॅडोना ब) मार्विन गे आणि द सुप्रिम्स

क) द बीटल्स आणि मायकल जॅक्सन ड) कान्ये वेस्ट आणि ड्रेक

४) डिस्को संगीत प्रामुख्याने इ.स. च्या ........ दशकात उदयास आले.

अ) १९६० ब) १९७० क) १९८० ड) १९९०

५) ''आय विल सर्वाइव्ह'' हे गाणे ........ या संगीत प्रकाराशी संबंधित आहे.

अ) पॉप ब) हिप-हॉप क) डिस्को ड) ब्लॉकबस्टर

६) हिप-हॉप संगीताचा उदय ......... समुदायांमध्ये झाला.

अ) आफ्रिकन-अमेरिकन आणि लॅटिनो ब) युरोपियन आणि आशियाई

क) ऑस्ट्रेलियन आणि आफ्रिकन ड) भारतीय आणि मलेशियन

७) हिप-हॉपच्या प्रवर्तकांमध्ये ......... कलाकार समाविष्ट आहे.

अ) एल्विस प्रेस्ली ब) मॅडोना क) ग्रँडमास्टर फ्लॅश ड) मायकेल जॅक्सन

८) ''डिस्को डिमॉलिशन नाईट'' ........ या शहरात घडली.

अ) न्यूयॉर्क ब) शिकागो क) लॉस एंजेलिस ड) लंडन

९) ब्लॉकबस्टर चित्रपट इ.स. च्या ......... या दशकात उदयास आले.

अ) १९५० ब) १९७० क) १९९० ड) २०००

१०) ''स्टार वॉर्स'' आणि ''जॉज'' सारख्या चित्रपटांना ........ म्हणतात.

अ) छोट्या पडद्यावरील चित्रपट ब) ब्लॉकबस्टर

क) माहितीपट ड) कार्टून चित्रपट

ब) जोड्या जुळवून योग्य पर्याय निवडा.

| गट १ | गट २ |
|---|---|
| १) मायकेल जॅक्सन | अ. ग्रँडमास्टर फ्लॅश |
| २) हिप-हॉप | ब. थ्रिलर |

३) डिस्को डिमॉलिशन नाईट — क. डिस्को

४) आय विल सर्वाइव्ह — ड. शिकागो

अ) १-ब, २- अ, ३ -ड, ४-क — ब) १-अ, २-ब, ३-क, ४-ड

क) १-ड, २- अ, ३ -ब, ४-क — ड) १-ब, २-ड, ३-क, ४-अ

क) योग्य पर्याय निवडा.

विधान १ : इ.स. १८७० च्या दशकात मोठ्या प्रमाणात मनोरंजनाचा एक नवीन प्रकार म्हणून ब्लॉकबस्टर चित्रपटाचा उदय झाला.

विधान २ : ''ब्लॉकबस्टर'' या शब्दाचा उगम इ.स. १९७० च्या दशकात स्टीव्हन स्पीलबर्गच्या जॉज (इ.स. १९७५) आणि जॉर्ज लुकासच्या स्टार वॉर्स (इ.स. १९७७) सारख्या चित्रपटांमधून झाला.

१) पहिले विधान बरोबर, दुसरे विधान चुकीचे

२) दुसरे विधान बरोबर, पहिले विधान चुकीचे

३) दोन्ही विधाने बरोबर

४) दोन्ही विधाने चुकीची

## ४.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

१. **निर्वसाहतीकरण :** राष्ट्रांना वसाहती शक्तींपासून स्वातंत्र्य मिळाले. या प्रक्रियेद्वारे राजकीय आणि सामाजिक संरचनांमध्ये लक्षणीय बदल झाले.

२. **वंशभेद :** दक्षिण आफ्रिकेमध्ये लागू करण्यात आलेली वांशिक अलगीकरण आणि भेदभावाची व्यवस्था, जी अंतर्गत प्रतिकार आणि आंतरराष्ट्रीय दबाव यांच्या संयोगाने नष्ट करण्यात आली.

३. **फेमिनिझम :** अमेरिकेमधील एक सामाजिक आणि राजकीय चळवळ जी महिलांचे हक्क आणि लैंगिक समानतेचा पुरस्कार करते, पारंपारिक लैंगिक भूमिकांना आव्हान देते आणि जीवनाच्या विविध क्षेत्रांत सुधारणांसाठी प्रयत्न करते.

४. **ब्लॉकबस्टर :** उच्च-बजेट, व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी चित्रपटांचे वर्णन करण्यासाठी वापरला जाणारा एक शब्द, जो जागतिक चित्रपटसृष्टीमध्ये एक प्रभावी शक्ती बनला आहे. त्याचे वैशिष्ट्य त्यांच्या मास अपील आणि व्यापक मार्केटिंगमध्ये आहे.

५. **पॉप संस्कृती :** इ. स. १९५० च्या दशकात उदयास आलेली व्यापक लोकप्रिय संगीतशैली.

६. **हिप-हॉप :** इ. स. १९७० च्या दशकात ब्रॉन्क्स, न्यूयॉर्कमध्ये उगम पावणारी एक सांस्कृतिक चळवळ, ज्यामध्ये संगीत, नृत्य आणि कला प्रकारांचा समावेश आहे. याद्वारे गीत आणि शैलीदार अभिव्यक्तीद्वारे सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यात आले आहे.

७. **होमोफोबिया :** समलिंगी व्यक्तींबद्दल असणारा द्वेष.

८. **तरुण-चालित प्रतिसंस्कृती चळवळ** (Youth Driven Counter Culture movment) : एक अशी चळवळ जी तरुणांच्या विचारधारेवर आणि त्यांच्या सक्रियतेवर आधारित आहे. या चळवळीमध्ये सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय बदल घडवण्यासाठी तरुणांचा सहभाग महत्वाचा असतो.

## ३.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-१

अ) रिकाम्या जागा योग्य पर्यायासह भरा.

१. अ) १९१२ २. ब) १९६० ३. ब) कामे नकुम्हा ४. ब) १९५२

५. क) १९६२ ६. ब) लँकेस्टर हाऊस ७. क) १९७०

ब) जोड्या जुळवून योग्य पर्याय निवडा.

ड) १-ब, २-ड, ३-क, ४-अ

क) दोन्ही विधाने चुकीची

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-२

अ) रिकाम्या जागा योग्य पर्यायासह भरा.

१. ब) मातृप्रधान २. ब) श्रमविभागणीपूर्वी

३. क) दि व्हिंडीकेशन ऑफ द राईटस ऑफ वुमन ४. ब) १९१०

५. अ) ८ मार्च ६. ड) बेटी फ्रिडन

७. अ) मताधिकार चळवळीमुळे

ब) जोड्या जुळवून योग्य पर्याय निवडा.

ब) १-अ, २-ब, ३-क, ४-ड

क) दोन्ही विधाने बरोबर.

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - ३

अ) रिकाम्या जागा योग्य पर्यायासह भरा.

१) ब) १९५० २) क) थ्रिलर ३) ब) मार्विन गे आणि द सुप्रिम्स

४) ब) १९७० ५) क) डिस्को ६) अ) आफ्रिकन-अमेरिकन आणि लॅटिनो

७) क) ग्रँडमास्टर फ्लॅश ८) ब) शिकागो ९) ब) १९७० १०) ब) ब्लॉकबस्टर

ब) जोड्या जुळवून योग्य पर्याय निवडा.

अ) १-ब, २-अ, ३-ड, ४-क

क) दुसरे विधान बरोबर, पहिले विधान चुकीचे.

## ४.५ सारांश

इ.स. १९५० ते इ.स. १९९१ या कालावधीत जगभरात अनेक सामाजिक आणि सांस्कृतिक बदल घडले, समाजाला आकार दिला गेला आणि भावी पिढ्यांवर प्रभाव पडला. आफ्रिकेत, नागरी हक्क चळवळी उदयास आल्या. त्यामुळे अनेक देशांचे निर्वसाहतीकरण झाले आणि दक्षिण आफ्रिकेतील वर्णभेदाचा अंत झाला. वांशिक भेदभाव, दडपशाही आणि वसाहतवादी वर्चस्वाविरुद्धच्या लढ्याने या चळवळींना चालना मिळाली. त्यामुळे नवीन राजकीय परिस्थिती निर्माण झाली आणि आफ्रिकन ओळख आणि स्वातंत्र्याचा उदय झाला.

युनायटेड स्टेट्समध्ये पारंपारिक लिंग भूमिकांना आव्हान देत आणि स्त्रियांच्या हक्कांचा पुरस्कार करत स्त्रीवादी चळवळीला यावेळी लक्षणीय गती मिळाली. समान वेतन, पुनरुत्पादक अधिकार आणि राजकीय प्रतिनिधित्वासाठी महिला सक्षमीकरण कायदे आणि धोरणांवर कायमस्वरूपी प्रभाव निर्माण करण्यासाठी लिंगाधारीत सामाजिक प्रतीकांना आकार दिला गेला.

सांस्कृतिकदृष्ट्या, जगाने संगीत, चित्रपट आणि पोशाखशैलीमध्ये क्रांती अनुभवली. पॉप, डिस्को आणि हिप-हॉप संगीत हे परिभाषित शैली बनले. त्यांनी तरुणांची ओळख निर्माण केली आणि सामाजिक भाष्य करण्यासाठी नवीन व्यासपीठ प्रदान केले. ब्लॉकबस्टर चित्रपटांनी मनोरंजन उद्योगाचा कायापालट केला. उच्च-बजेट चित्रपटनिर्मितीने जागतिक प्रेक्षकांना आकर्षित केले. पोशाखशैलीने मोहक, पुराणमतवादी शैलींपासून ठळक ते प्रायोगिक ट्रेंडमध्ये लक्षणीय बदल केला. तो व्यक्तिवाद आणि स्वातंत्र्याच्या दिशेने व्यापक सामाजिक बदल प्रतिबिंबित करतो. एकत्रितपणे, या सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळींनी नवी जागतिक ओळख पुन्हा अधोरेखित करत आधुनिक युगासाठी पाया घातला.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय.

**अ) टिपा लिहा.**

१. केनियातील माउ माउ उठाव

२. झिम्बाब्वेमधील मुक्ती संघर्ष

३. अमेरिकन स्त्रीवादी चळवळीचे परिणाम

४. पोशाखशैलीतील परिवर्तन

ब) थोडक्यात उत्तरे लिहा.

१) अल्जेरीयातील स्वातंत्र्ययुद्धाविषयी सविस्तर माहिती लिहा.

२) स्त्रीवाद म्हणजे काय? स्त्रीवादी चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी विशद करा.

३) घानामधील नागरी हक्क चळवळीचा आढावा घ्या.

४) ब्लॉकबस्टर चित्रपट म्हणजे काय? ब्लॉकबस्टर चित्रपटांचा सांस्कृतिक प्रभाव विशद करा.

क) दीर्घोत्तरी प्रश्न.

१. आफ्रिकेतील वर्णभेद विरोधी चळवळीची माहिती लिहा.

२. अमेरिकेतील स्त्रीवादी चळवळीचा आढावा घ्या.

३. 'पॉप' व 'डिस्को' या संगीतशैलींचा सविस्तर आढावा घ्या.

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके.

१. आठवले सदाशिव, आधुनिक जग, ओरीएंट लॉगमन लिमिटेड.

२. बापट दिवाकर, मार्टिन ल्युथर किंग, लोकवाङ्मय गृह, १९८३

३. बापट दिवाकर, नेल्सन मंडेला, साकेत प्रकाशन प्रा.लि., औरंगाबाद, २००६

४. बोरसे सदानंद, मंडेला, राजहंस प्रकाशन, १९९०

५. भिडे ग.ल., आधुनिक जगाचा इतिहास, अनिरुद्ध पब्लिशिंग हाउस, पुणे, २००६

६. जोशी पी. जी., आधुनिक जग, विद्या प्रकाशन, नागपूर, २०००

७. हेन्री हेलर, शीतयुद्ध व नवसाम्राज्यवाद जागतिक इतिहास (अनु. मेढी शिरीष), सामाजिक विज्ञान केंद्र, ठाणे.

८. कदम य. ना., समकालीन आधुनिक जग, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००१

९. कऱ्हाडे शंकर, मार्टिन ल्युथर किंग, साकेत प्रकाशन प्रा.लि., औरंगाबाद, २०१०

१०. कोठेकर शांता व वैद्य सुमन, आधुनिक जग-२, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर

११. कोलारकर श. गो., आधुनिक जगाचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९१

१२. Hobsbawm, Eric, The Age of Extremes: The Short Twentieth Century, 1914-1991. Vintage Books, 1994.

१३. Friedman, Thomas L. The Lexus and the Olive Tree: Understanding Globalization. Farrar, Straus and Giroux, 1999.

१४. Gaddis, John Lewis, The Cold War: A New History. Penguin Books, 2006

१५. McWilliams, Wayne C., आणि Piotrowski, Harry, The World Since 1945: A History of International *Relations*, Lynne Rienner Publishers, 2014

१६. Baylis, John., Smith, Steve., आणि Owens, Patricia, The Globalization of World Politics: An Introduction to International *Relations*, Oxford University Press, 2011

१७. Judt, Tony, Postwar: A History of Europe Since 1945, Penguin Books, 2005


❑❑❑